ड८०८

औ/१७५

हिंदु व मुसलमानांत
होणारे तंटे.

# आणि मुसलमानांत होणारे तंटे

## व

## ते बंद करण्याविषयीं

## विनंति.



किंमत ५ आणे.

# हिंदु व मुसलमानांत होणारे तंटे
## व
## ते बंद करण्याविषयीं विनंति.

हें पुस्तक,

**काशीनाथ त्रिंबक खरे**

ह्यांनीं लिहिलें

तें

**मुंबईंत,**

**जावजी दादाजी यांच्या**

"निर्णयसागर" छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

(ह्या पुस्तकासंबंधीं सर्व हक्क पुस्तककर्त्यानें सन १८६७
च्या २५ व्या आक्टाप्रमाणें रजिस्टर करून
आपणाकडे ठेविले आहेत.)

सन १८९५.

किंमत ५ आणे.

# अनुक्रमणिका.


| विषय. | | पृष्ठ. |
| --- | --- | --- |
| भाग पहिला. | प्रस्तावलेख .... .... .... | १ |
| भाग दुसरा. | शहाणे हिंदु व मुसलमान लोक परस्परांशीं पूर्वीं कसे वागत होते, व हल्लींही कसे वागत आहेत. .... | ४ |
| भाग तिसरा. | दंग्याची संक्षिप्त हकीगत, व त्याच्या परिणामांचीं जुनीं व नवीं उदाहरणें. | २९ |
| भाग चौथा. | हिंदु व मुसलमान लोक परस्परांशीं दांडगाई व मारामाऱ्या वगैरे करितात, त्यापासून कोणास कांहीं लाभ होतो किंवा हानि होते? .... .... | ८३ |
| भाग पांचवा. | विनंति .... .... .... .... | ९७ |

# हिंदु आणि मुसलमानांत होणारे तंटे व ते बंद करण्याविषयीं विनंति.

## भाग पहिला.

### प्रस्तावलेख.

आपल्या ह्या हिंदुस्थान देशांत सध्या हिंदु व मुसलमानांत तंटे उपस्थित करून मोठाल्या मारामाऱ्या व कोठें क्वचित खूनही करण्याचें वेड माजलें आहे. त्यामुळें उभयपक्षांचीहीं मोठी हानि होत आहे, असें प्रत्यक्ष दिसत असतां त्याची शांति होण्याचें अद्याप कोठें कांहींच लक्षण दिसत नसून, उलट असलीं नाशकारक कृत्यें करण्याचें साहस लोकांमध्यें मोठ्या आवेशानें वाढत आहे; हें पाहून फार वाईट वाटतें. कारण हिंदु व मुसलमान ह्यांचे धर्म भिन्न आहेत तरी, दोन्ही धर्मांच्या लोकांची स्थिति सध्यां एकसारखी आहे, ह्मणजे दोन्ही धर्म एकाच राजछत्राखालची प्रजा आहे. गेल्या सातआठशें वर्षांपासून मुसलमान लोक हिंदुस्थानांत आले, व तेव्हांपासून ते या देशांत राहूं लागले. यामुळें त्यांच्या पोटांत जाणारें अन्न, पाणी व हवा हीं आर्यभूमातेपासून त्यांस प्राप्त होत आहेत, यामुळें त्यांच्या आंगांत उत्पन्न होणारीं हाडें, मांस व रक्त हीं आर्यभूमातेच्या दुधापासूनच बनत आहेत, हें सर्व लोक क-

बूल करतील. ह्मणून हिंदु लोक जशीं आर्यभूमातेचीं लेंकरें, त्याचप्रमाणें मुसलमान लोकही आर्यभूमातेचीं लेंकरेंच होतात. यासंबंधानें पाहिलें तर हिंदु व मुसलमान हीं दोन्ही सख्खीं भावंडें होतात. एका आईच्या पोटचीं मुलें स्वभावानें, गुणानें व मतानें सगळीं सारखींच निपजतात असा नियम नाहीं. कारण जितक्या मूर्ति तितक्या प्रकृति असावयाच्या. त्याप्रमाणें हिंदु आणि मुसलमान यांचीं धर्ममतें, आचार व आहार हे भिन्न आहेत. ह्मणून तितक्यापुरतें परस्परांनीं एकमेकांपासून खुशाल पृथक् राहावें, त्याबद्दल कोणाची तक्रार नाहीं. पारशी, यहूदी व क्रिश्चन लोक ह्यांचींही मुसलमानांप्रमाणेंच धर्ममतें, आचार आणि आहार हीं हिंदु लोकांपेक्षां भिन्न असून तेही या देशांतलेच रहिवासी झाले आहेत. त्यांचा आणि हिंदूंचा जेवढ्या गोष्टींत भिन्न भाव आहे, तितक्यापुरते हिंदूंशीं ते पृथक्पणें वागून बाकीच्या व्यावहारिक सर्व गोष्टींत ते हिंदु लोकांशीं एकोपा ठेवून सलोख्यानें वागतात. त्याप्रमाणें मुसलमान बांधवांनींही हिंदु लोकांशीं जितक्या गोष्टींत भिन्नपणा आहे तेवढ्या शिवायकरून बाकीच्या व्यावहारिक सर्व गोष्टींत हिंदूंशीं तुटक न राहतां एकोप्यानें वागावें हें रास्त आहे. असला, कांहीं गोष्टींत भिन्नपणा, व बाकीच्या सर्व गोष्टींत एकोपा, हा प्रत्यक्ष हिंदु लोकांच्या अनेक जातींत दृष्टीस पडतो. पहा, ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, स्मार्त व वीरवैष्णव, इत्यादि सर्व जाती हिंदुधर्मी आहेत. त्याचप्रमाणें लिंगाइत व जैन असून त्यांचीं धर्ममतें व जाती भिन्न असल्यामुळें त्या परस्परांचा एकमेकांशीं अन्नव्यवहार व

बेटीव्यवहार होत नाहीं. तथापि एवढ्या भिन्नतेशिवाय इतर एकंदर व्यवहारांत एकमेकांचा परस्परांशीं कोणत्याही गोष्टींत भिन्नभाव किंवा विरोध बिलकूल असत नाहीं. ते सर्व लोक एकमेकांशीं सलोख्यानें वागून बंधुप्रेमास उचित अशा ममतेनें एकजुटीनें चालतात. ही गोष्ट आमचे प्रियकर मुसलमान बांधव पूर्णपणें जाणत आहेत. ही केवळ एकधर्मी लोकांची गोष्ट आहे. पण वर सांगितलेले पारशी, यहूदी व क्रिश्चन बांधवांचा मुसलमान बांधवांप्रमाणेंच सर्व प्रकार असून त्यांचा हिंदु लोकांशीं आजवर कधीं तंटाबखेडा झाला नाहीं. पण त्यांचें व हिंदूंचें अनेक व्यावहारिक गोष्टींत सख्यच वाढत आहे. त्यायोगानें होणाऱ्या आनंदाचा उपभोग ते उभयतां यथेच्छ घेत आहेत. आमचे मुसलमान बांधव ही गोष्ट चांगली समजतात. असली प्रत्यक्ष व उघड घडणारी बिना प्रत्यक्ष डोळ्यांनीं पाहत असून आमचे मुसलमान बांधव अद्याप उमजत नाहींत यास काय ह्मणावें? दुर्दैव दोघांचें!!! असो. प्राचीनकालीं हिंदु व मुसलमान लोकांमध्यें वागणूक कशी होत होती, व अद्याप देखील कित्येक ठिकाणीं हिंदु व मुसलमान हे एकमेकांशीं कसे वागत आहेत, व त्यायोगानें परस्परांच्या व्यवहारांत सौकर्य येऊन उभयपक्षीं कसकसे लाभ होत आहेत, हें प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखवितों. ह्मणजे त्यावरून आमच्या प्रियकर मुसलमान बांधवांची खात्री होईल.

---

## भाग दुसरा.

### शहाणे हिंदु व मुसलमान लोक परस्परांशीं पूर्वी कसे वागत होते, व हल्लींही कसे वागत आहेत.

या देशांत मुसलमान लोकांचें राज्य स्थापन झाल्यावर प्रत्यक्ष दिल्लीच्या हुजूरदरबारांत व त्या राज्यांतील बाहेरगांवच्या अनेक ठिकाणीं हिंदु लोक लायकीप्रमाणें लहान मोठ्या अनेक हुद्यांवर नेमले जात, व त्यांचे हातून सरकारी कामेंही प्रामाणिकपणानें व बिनचुक अशीं होत असत.

अकबर नामें बाहशाहा दिल्लीच्या गादीवर पूर्वीं होऊन गेला. त्याच्या शहाणपणाच्या व निस्पृहतेच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. त्यानें कोणत्याही धर्माचा तिरस्कार केला नाहीं, व परधर्मी लोकांवर जुलूम करून मुसलमानी धर्मांत ओढून आणण्याचें साहसही केलें नाहीं. हिंदु लोकांवर त्याची फार मेहरबानी असे. त्याच्या कारकीर्दींत लष्करी व मुलकी कामांत मोठाल्या हुद्यांवर हिंदु लोक असत. 'राजा तोडरमल्ल' या नांवाचा हिंदु गृहस्थ हा जमाबंदी खात्यावर मुख्याधिकारी असून त्यानें जमिनीची मोजणी करून तिचे दरही ठरविले अशी प्रसिद्धि आहे. 'ऐन–ई–अकबारी'[1] ह्या नांवाच्या फारशी ग्रंथांत याबद्दल खुलासेवार वर्णन आहे. अकबरानें मोठ्या नीतीनें राज्यकारभार चालवून सर्व रयतेचा व इतर सर्व लोकांचा दुवा मिळविला. तो मरून गेल्यास बराच काळ लोटून गेला तरी अद्याप त्याची कीर्ति नष्ट न होतां ती अजरामर होऊन राहिली आहे, ही गोष्ट आमचे मुसलमान बांधव पूर्णपणें जाणत आहेत.

---

१ अकबराच्या कारकीर्दीचे नियम.

सध्यां ह्या हिंदुस्थान देशांत सर्वांत श्रेष्ठ असें संस्थान हैदराबादच्या निजाम सरकारचें आहे. तें राज्य मुसलमान धर्मबांधवांकडे असून तेथें पूर्वींपासून हिंदु लोकांस मोठाले हुद्दे मिळत असत, व अद्यापही मिळत आहेत. पूर्वीं कोणीएक मध्व वीरवैष्णव ब्राह्मण, चंदूलाल हे कायस्थ हिंदु, व विठ्ठल सुंदर या नांवाचे इलिचपूर येथील राहणारे यजुर्वेदी ब्राह्मण, हे सर्व अनुक्रमें निजाम सरकारचे दिवाण होते. पूर्वीं पेशवाईत साडेतीन शहाणे ह्मणून जे प्रसिद्ध असत त्यांपैकीं विठ्ठल सुंदर हे एक पुरुष होत. सख्या[1], देवा[2], विठ्ठला[3], ही ह्मण प्रसिद्धच आहे. ह्मणजे, हे तिघे एकेक शहाणे, आणि अर्धा शहाणा नानाफडणवीस[4]. व्यंकण्णा व मादण्णा जात ब्राह्मण, व राय रायबहादुर जात ब्राह्मण हे अनुक्रमें निजाम सरकारच्या राज्यांत जमाबंदी खात्यावरील प्रमुख (दफ्तरदार) होते. ह्या सर्व लोकांस मोठाल्या नक्त नेमणुका व लक्षावधि रुपयांचे मुलूख दिले होते ते अद्याप त्यांच्या वंशजांकडे चालले आहेत. निजाम सरकारच्या राज्यांतील शेतकरी व व्यापारी वगैरे, बहुतेक हिंदुधर्मी असून त्यांजवर कोणत्याही प्रकारें जुलमजबरी होत नाहीं. हिंदूंच्या देवस्थानखर्चास नक्त नेमणुका, व ब्राह्मण

---

१ सखाराम बापू बोकील देशस्थ ब्राह्मण मौजे हिवरें ता० पुरंदर जिल्हा पुणें येथील कुळकरणी असून पेशव्यांचा कारभारी होता. २ देवाजीपंत चोरघडे यजुर्वेदी ब्राह्मण हा नागपूरकर भोंसल्यांकडून पुण्यांत पेशव्यांकडे वकील असे. ३ विठ्ठल सुंदर हे यजुर्वेदी ब्राह्मण निजामाचे दिवाण होते. ४ बाळाजी जनार्दन भानु हा कोंकणस्थ ब्राह्मण पेशव्यांचा फडणवीस व कारभारी होता.

वगैरे गरीब हिंदु लोकांस इनामगांव, इनामजमिनी, व वर्षासनें करून दिलेलीं अद्याप चालू आहेत. सध्यां निजाम सरकारच्या राज्यांत मामलेदार, कलेक्टर, कमिशनर, जमीनमोजणीकडील सुप्रिन्टेन्डेन्ट, व करोडगिरीकडील[१] वरिष्ठ अधिकारी, हे व दफ्तरदार इत्यादी अनेक खात्यांवर मोठाले हुद्देदार बहुतेक हिंदुच असतात. यावरून, शहाणे मुसलमान लोक हिंदूंचा द्वेष किंवा त्यांच्याशीं वैरभाव न धरितां सलोख्यानें व बंधुप्रीतीनें वागतात, हें चांगलें सिद्ध होत आहे.

प्राचीन मराठ्यांच्या राजकारकीर्दींत व पेशवाईंत देखील मुसलमान बांधवांशीं हिंदु लोकांचा द्वेष किंवा विरोध नव्हता. इब्राहीमखान गारदी हे मुसलमानधर्मी असून पेशवेसरकारचे पदरीं शिंदेहोळकरांच्या बरोबरीचे फौजबंद सरदार होते. त्यांजकडे सरंजामी मुलूखही मोठा होता. त्यांचे वंशज हल्लीं पुण्यांत नवाब अलिमर्दानखान साहेब आहेत त्यांस विचारावें, ह्मणजे खात्री होईल. वायव्यप्रांतांत बांद्याचे नवाब हे मुसलमान असून त्यांजकडे पुष्कळ मुलूख देऊन पहिले बाजीराव पेशवे यांनीं त्यांची स्थापना केली. तें संस्थान लार्ड डालहौसी साहेबांच्या कारकीर्दीपर्यंत त्यांच्या वंशजांकडे चालत होतें. जावरा हे मुसलमानी संस्थान राजपुताना—माळवा रेलवे लायनीवर रतलामच्या जवळ आहे. तें होळकर सरकारांनीं स्थापन केलें. जावरा संस्थानचे पूर्वज होळकर सरकारच्या पदरीं स्वारांवरील रिसालदार होते. त्यांच्या ताब्यांतील सैन्याच्या खर्चास अकरा लक्षांचा मुलूख होळकर सरकारांनीं नेमून दिला होता.

१ जकातीचें खातें.

तोच मुलूख पुढें त्यांस देऊन होळकर सरकारांनीं त्यांस आपले मांडलिक केलें. तें संस्थान १८९८ इ. सालापर्यंत होळकरांच्या मांडलिकांपैकीं एक होतें. पण त्यानंतर इंग्रज सरकारानें त्यास स्वतंत्र बनवून तें एजन्ट गवरनर जनरल सेंन्ट्रल इंडिया यांच्या ताब्यांत दिलें आहे. हल्लीं त्या संस्थानच्या गादीवर जे पुरुष आहेत ते तरुण असून फार हुशार व हिंदु जातीवर फार प्रेम करणारे आहेत असें कळतें. पुणें शहर ज्या ठिकाणीं वसलें आहे, तेथें पूर्वीं जंगल होतें, तें पहिले बाजीराव पेशवे यांनीं तोडून जागा साफ केली, आणि त्या ठिकाणीं पुणें शहर वसविलें. आज पुणें शहरांत मुसलमानी धर्माच्या अनेक मशिदी उभ्या दिसत आहेत, त्या, पेशवे सरकारच्या मनांत मुसलमानी देवस्थानांचा व मुसलमान बांधवांचा द्वेषभाव असता तर उभ्या राहिल्या असत्या का? व त्यानंतर दुसऱ्या पेशव्यांच्या कारकीर्दींत सुद्धां मुसलमानी धर्माचीं अनेक देवस्थानें स्थापन झालीं, त्यांच्या खर्चास नेमणुकी करून देण्यांत आल्या, (त्यांपैकीं अद्याप पुष्कळ चालू आहेत.) त्या तरी मिळाल्या असत्या का? ह्याचा प्रियकर मुसलमान बांधवांनींच विचार करावा. पुण्यांत गणपतीबद्दल मेळा निघाला त्याच्यापुढील मंजुळ वाद्यांनीं पुण्यांतील नागझरीवरील दारूवाल्याच्या पुलाजवळच्या मशिदींतल्या व जवळपासच्या ज्या मुसलमानी धर्मभक्तांस संताप येऊन मारामारी करण्याचा आवेश आला, त्यांनीं आपल्या शेजारच्या न्याहालपेठेंतील रास्त्यांच्या वाड्यांत जाऊन पाठीमागच्या बागेंत पहावें ह्मणजे तेथें कै० आनंदराव दादासाहेब रास्ते यांनीं शंभर वर्षांपूर्वीं

वाडा बांधला त्याच वेळीं 'राजेबागसर' या नांवानें पिराची स्थापना करून दर्गाही बांधला आहे असें दिसून येईल त्या पिरापुढें रास्त्यांच्या वाड्यांतून दररोज चिराखबत्ती अद्याप लागत आहे. तसेंच रास्त्यांचे वाड्यावरून गोसावीपुऱ्याकडे सडक वळते त्या कोंपऱ्यावर वाड्यास लागूनच मुसलमानी धर्माचा एक दर्गा आहे. ती जागा रास्त्यांची असून त्यांत निमाज पढण्याच्या वेळीं हातपाय धुण्याकरितां मुसलमान लोकांस पाणी लागतें तें मिळावें ह्मणून रास्त्यांनींच दर्ग्यांत विहीर बांधून दिली आहे. याप्रमाणें पुण्यांत व इतर अनेक ठिकाणीं हिंदु लोक मुसलमानी धर्माचा पूर्वीपासून सन्मान राखीत होते व अद्यापही राखीत आहेत असें शोधून पाहणाऱ्या मुसलमान बांधवांस दिसून येईल.

बाहेरठिकाणीं वेडेपणानें हिंदु लोकांशीं तंटेबखेडे करण्याची आग पेटूं लागली, तरी पुण्याच्या शहाण्या व हिताहित जाणणाऱ्या दूरदृष्टि मुसलमान बांधवांनीं आपलें चित्त व्यग्र न होऊं देतां स्वस्थ ठेवलें होतें. पण शके १८१६ तल्या आषाढ शुद्ध दशमीच्या दिवशीं ज्ञानोबाची आळंदीहून, व तुकारामबावाची देहूहून, अशा दोन्ही पालख्या सालाबादप्रमाणें पंढरपुरास जातांना पुण्यांत मुक्कामास आल्या. आणि दरसाल ज्या रस्त्यानें जेथें उतरण्यास जाण्याचा नियम आहे तेथें जात असतां त्या वेळीं पुण्यांत कली, भूत किंवा पिशाच्य एकदम उद्भवून त्यानें आमच्या प्रियकर मुसलमान बांधवांस घेरलें. तेव्हांपासून त्यांचीं मनें बिचकलीं. त्यानंतर नागपंचमीच्या दिवशीं मातीच्या भव्य नागोबाला पाहून तीं अधिकच भडकलीं.

आणि गणेशचतुर्थीच्या गणपतीच्या उत्सवानें तर त्यांच्या बिचकलेल्या मनांची वृत्ति अधिकच बळावून त्यांच्या संतापास मोठ्या जोराची भरती आली. समुद्राला अंवसेपुनवेच्या ताणास मागें पुढें मिळून पांच सहा दिवस मोठ्या जोराची भरती येते, हें समुद्रकांठीं राहाणाऱ्या आबालवृद्धांस माहीत आहे. पुण्यांत समुद्र नाहीं ह्मणून नागझरीच्या किनाऱ्याजवळ आमच्या मुसलमान बांधवांच्या चंचल झालेल्या मनास भाद्रपद शुद्ध पौर्णिमा जवळ आल्यामुळें रागाची भरती आली. तिच्या कोपिष्ठ लाटा हिंदूंवर आपटून त्यांजवर करडीकमान धरण्याचें आमच्या मुसलमान बांधवांस स्फुरण आलें. त्या आवेशांत त्यांनीं हिंदूंवरच काय, पण आपल्या पायांवर देखील दगड मारून घेतले. त्यायोगानें कांहीं लोकांस घायाळ होऊन कृतकर्माचें प्रायश्चित्त घेण्यास दवाखान्यांत जावें लागलें. हें आमचे मुसलमान बांधव समजत नाहींत का? समजतात. पण उमजत नाहींत. हें त्यांचें व बिचाऱ्या हिंदु लोकांचेंही मोठेंच दुर्दैव आहे, असें ह्मणावें लागतें.

सध्यां कोल्हापूरचे छत्रपती महाराज, दक्षिण महाराष्ट्रांतील पटवर्धन वगैरे संस्थानिक, शिंदे, होळकर, गाइकवाड, रेव्याचे राजे, काठेवाडांतील सर्व संस्थानिक व राजपुतान्यांतील सर्व हिंदु राजे व रजवाडे, ह्यांच्या रियासतींत मुसलमान लोकांचा द्वेष न करितां त्यांस लायकीप्रमाणें लहान मोठे सर्व प्रकारचे हुद्दे मिळत आहेत, व त्या त्या हुद्यांच्या मानाप्रमाणें मुसलमान लोकांचा हिंदु लोकांच्या बरोबरीनें सन्मानही होत आहे. विशेष आनंदाच्या प्रसंगीं किंवा द-

सऱ्याच्या दिवशीं मोठ्या वैभवानिशीं शिंदेसरकारची स्वारी बाहेर निघाली ह्मणजे खासा स्वारी हत्तीवर अंबारींत किंवा हौद्यांत बसते. त्या वेळीं खाशांच्या पाठीमागें अत्यंत विश्वासूपणानें बसण्याचा मान महादजीबावांच्या वेळेपासून आमच्या मुसलमान बंधूंस मिळाला, तो अद्याप त्यांजकडे चालत आहे. त्या हुद्यास 'खवासखान' असें ह्मणतात. दुसरें अगदीं ताजें व फार सुप्रसिद्ध असें उदाहरण बडोद्यांत घडलें तें सर्वश्रुतच आहे. खा. बा. काजी शेख शाबुद्दीन साहेब ह्यांचे गुण व लायकी जाणून हल्लीं गादीवर असलेले गाइकवाड सयाजीराव महाराज यांनीं काजी साहेबांस आपल्या मुख्य दिवाणगिरीची जागा दिली. तें काम काजी साहेबांनीं सात आठ वर्षें अत्युत्तम रीतीनें चालवून बडोद्याच्या राज्यांत मोठी वाहावा मिळविली. गाइकवाड सरकार हिंदु असून त्यांच्या मनांत मुसलमानांचा द्वेष असता तर ते आपल्या राज्यांतील सर्वांत श्रेष्ठ, मोठ्या विश्वासाची, पुष्कळ पगाराची, व परमसन्मानाची, अशी दिवाणगिरीची जागा मुसलमान गृहस्थास देते का? ह्या प्रश्नाचें उत्तर आमच्या मुसलमान बंधूंनीं निःपक्षपातानें द्यावें. ह्मणजे हिंदु लोक मुसलमानांचे वैरी आहेत किंवा खरे हितचिंतक आहेत हें त्यांच्याच तोंडानें ठरेल. परमेश्वरकृपेनें काजी साहेब हयात असून ते पुण्यास किंवा मुंबईस असतात. त्यांजकडे आमच्या मुसलमान बांधवांनीं जाऊन विचारावें ह्मणजे बडोद्यास व इतर ठिकाणीं काजी साहेबांशीं व दुसऱ्या मुसलमान बंधूंशीं हिंदु लोक द्वेषानें वागले किंवा मित्रत्वानें वागले हें स्पष्ट कळून येईल, मग त्यांची खातरी होण्यास उशीर लागणार नाहीं.

हिंदु लोक मुसलमान बंधूंशीं कसे वागतात हें वरील उदाहरणांनीं दाखविलें, त्याचप्रमाणें शहाणे व विचारी मुसलमान लोक हिंदूंशीं कसे वागत होते, व प्रस्तुत कसे वागत आहेत हेंही दाखवितों. त्यांपैकीं अकबर बादशहा दिल्लीच्या गादीवर असतां हिंदूंशीं त्याची वागणूक कशी होती व हैदराबादच्या निजाम सरकारची हिंदूंशीं पूर्वीं वागणूक कशी होती व हल्लीं कशी आहे तें वर दाखविलेंच आहे. आतां, औरंगजेबाची गोष्ट सांगतों. ह्या बादशहाच्या वेळीं मुसलमान लोकांची हिंदु धर्मावर व हिंदु लोकांवर वक्रदृष्टी असल्यामुळें शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी यास औरंगजेबानें ठार मारलें, आणि त्याची बायको येसूबाई, व मुलगा शिवाजी (शाहू) हा पांच सहा वर्षांचा लहान असतां त्या मायलेंकरांस कैद करून आपल्याबरोबर दिल्लीस नेऊन त्यानें आपल्या जनानखान्यांत त्यांस ठेविलें. औरंगजेब बादशहा हा पुष्कळ शिकलेला व शहाणा होता, पण तो मानी व क्रोधी असल्यामुळें रागाच्या तावांत सांपडल्यावर त्यास अनन्वित कृत्यें करण्याची खोड लागली होती. तरी तो रागाच्या व क्रोधाच्या नाठ्याळ घोड्यावरून खालीं उतरला ह्मणजे मग तो चांगला शुद्धीवर येत असे. अशा स्थितींत येऊन विचार करीत बसला ह्मणजे कधीं कधीं त्यास कृतकर्मांचा पश्चात्तापही होई. त्या वेळीं तो जीं कामें करी, तीं मोठीं तारीफ करण्याजोगीं चांगलीं होत असत. त्यानें संभाजीचा अति क्रूरपणानें वध केला होता तरी त्याच्या बायकोस व मुलास त्यानें बिलकुल छळिलें नाहीं. त्यानें त्या उभयतांस आपल्या राणीच्या स्वाधीन करून

तिच्या तैनातीच्या माणसांकडून त्या मायलेंकरांचा संभाळ करविला. बादशहाच्या मर्जीचा कल बरा दिसतांच त्याची राणी व कन्या (बेगम) या दोघी संभाजीच्या अनाथ व दुःखसमुद्रांत पडलेल्या बायकोचें शांतवन करूं लागल्या, आणि तिच्या एकुलत्या एक मुलावर अतिशय प्रेम करून त्याचेही बहुत लाड करूं लागल्या. अशा सदयतेनें त्या दीन अनाथांचा परामर्श होऊं लागल्यामुळें औरंगजेबास फार समाधान वाटे. ह्मणूनच तो शाहूवर अधिकाधिक प्रीति करून त्याचें मोठ्या प्रेमानें चोज पुरवूं लागला. औरंगजेब शिवाजी महाराजांस 'चोर' ह्मणत असे. तेंच नांव संभाजीचे मुलाचें असल्यामुळें औरंगजेब त्यास 'चोर' नव्हे 'साव' असें विनोदानें ह्मणे. यामुळें पुढें त्याचाच थोडा फेरफार होऊन शाहू असें नांव प्रसिद्धीस आलें. येसूबाई व शाहू दिल्लीमध्यें बादशहाच्या अटकेंत होतीं तरी त्यांजवर औरंगजेबाचा, त्याच्या राणीचा व राजकन्येचा लोभ फार जडल्यामुळें त्यांच्या सुखाची वृद्धि होत चालली. त्यांस हवी ती वस्तु मिळत असे, व इच्छेनुरूप वागण्यास प्रतिबंध नसे. बादशहानें शाहूला विद्या शिकण्याची सोय करून दिली, त्याचप्रमाणें घोड्यावर बसणें, तालीमबाजीच्या कसरती व पट्टा खेळण्यास शिकणें व धनुर्विद्या व निशाण मारणें इत्यादि अनेक प्रकारच्या युद्धकलाही शिकण्याच्या सोई करून दिल्या. व मनास वाटेल तेव्हां शिकारीस जाण्याचीही शाहूला मोकळीक मिळाली. याप्रमाणें राजपुत्रास आवश्यक अशा सर्वप्रकारच्या विद्या व कला संपादन करण्याच्या सर्व सोई बादशहानें शाहूस करून दिल्या

त्या योगानें तो आपल्या वयाच्या मानानें शहाणा व युद्ध-कलानिपुण होत चालला. आधींच फार देखणा असून तो आपल्या भर उमेदींत येत चालल्यामुळें शाहूचें रूप अत्यंत मनोहर दिसूं लागलें. त्यामुळें बादशहाची व त्याच्या दरबारांतील प्रधानादि प्रमुख मुसलमान अधिकाऱ्यांची त्याजवर कृपा वाढत चालली. शाहू बराच वयांत आल्यावर त्याच्या राणीच्या व कन्येच्या विनंतीवरून बादशहाच्याच पदरच्या एका मोठ्या मराठी मानकऱ्याच्या मुलीशीं शाहूचें लग्न करून दिलें. अशा रीतीनें सत्रा वर्षें शाहूचें दिल्लींत राहणें झालें. नंतर तो राज्य करण्यास लायक झाला असें दिसून आल्यावरून दक्षिणेंत जाऊन आपल्या बापाचें राज्य करण्याची दिल्ली दरबारांतून शाहूस मोकळीक मिळाली. पण दिल्लीपदबादशहाशीं कोणत्याही प्रकारें विरुद्ध न वागतां आपलें राज्य करावें, अशी अट ठेविली होती. त्याप्रमाणें शाहू भरंवशानें वागतो कीं नाहीं ही खात्री होईपर्यंत त्याची आई व बायको ह्या दोघींस 'ओलीस' ठेविल्या होत्या. अशा अटीनें शाहूची दिल्लीहून सुटका झाल्यावर तो एकटाच थोड्याशा इतमामानें दक्षिणेंत आला. आणि शिवाजीच्या व संभाजीच्या वेळचे जे लोक शेष राहिले होते, त्यांस अनुकूल करून घेऊन त्यांच्या साह्यानें त्यानें साताऱ्यास मराठ्यांची गादी स्थापन केली. अशाप्रकारें शाहूस राज्य मिळाल्यावर त्याची व्यवस्था वगैरे लावण्यास बराच काळ लागला. त्याची बायको व आई ह्या दिल्लीच्या अटकेंतून सुटल्या नव्हत्या, यामुळें शाहू फार काळजी करीत असे. पण दिल्लीस जाऊन ते-

थल्या दरबारांतून त्यांची सुटका करून आणण्याजोगा चतुर, विश्वासू व हिंमतीचा असा मनुष्य त्यास कोणी दिसेना, त्यामुळें त्याला कांहींच गोड वाटेनासें झालें. ह्या कामास योग्य असा मनुष्य ध्यानांत आणतांआणतां बाळाजी विश्वनाथ, आडनांव भट, (ह्यासच पहिला पेशवा ह्मणतात) हा पुरुष शाहूच्या मनांत भरला. नंतर लागलीच त्यानें त्यास ह्या कामगिरीवर पाठविण्याची योजना करण्याचें ठरविलें. 'तूं दिल्लीस जाऊन ही कामगिरी बजावून येशील का?' असें शाहूमहाराजांनीं बाळाजीपंतास विचारिलें. तेव्हां मोठ्या उत्साहानें व धैर्यानें त्यानें सांगितलें कीं, सरकारची आज्ञा होईल तर हीच कामगिरी काय, पण याहून अति बिकट अशी सरकारची कामगिरी करण्यास हा गरीब सेवक सिद्ध आहे, स्वामीचरणांच्या कृपेनें काळासही न भितां हा सेवक सरकारच्या कार्यांत यश मिळवून येईल. हें उमेदीचें भाषण ऐकून महाराजांस फार संतोष झाला. नंतर लौकरच महाराजांनीं बाळाजीपंतास पेशवाईचीं वस्त्रें देऊन मोठ्या इतमामानें १९००० फौज बरोबर देऊन त्याची दिल्लीकडे रवानगी केली. बाळाजीपंत महाराजांचा इमानी चाकर असल्यामुळें त्यानें मराठ्यांच्या गादीची सेवा एकनिष्ठपणें केली. बाळाजीपंत दिल्लीस जाऊन पोंचण्याच्या अगोदरच औरंगजेब बादशहा मरण पावला होता. बाळाजी दिल्लीस जाऊन पोंचल्यावर पाहतो तों तेथें बेबंदशाही माजली आहे असें दिसून आलें. यामुळें महाराजांच्या मातुश्रीची व राणीची सुटका होण्यासाठीं फार प्रयास करावे लागले. बाळाजी मोठा धूर्त व रंग दिसेल तसा वागणारा असल्यामुळें राज्यकारस्थानें कशीं उकलावीं हें तो पूर्ण जाणत असे. त्यानें

प्रयत्नानें औरंगजेबाची कन्या बेगम साहेब यांजकडे धोरण बांधून उभयतां बायांची सुटका करून घेण्याचें काम चांगलें रंगास आणिलें. एवढेंच करून तो राहिला नाहीं. ह्या वेळीं त्यानें मराठी राज्यास लाभदायक अशी आणखी एक गोष्ट संपादन केली. बेगम साहेब व दिल्लीचें बहुतेक दरबार आपल्या मुठींत आलें आहे हें पाहून योग्य प्रसंगीं त्यांस बाळाजीपंतानें विनंती केली कीं, 'आपण कृपा करून शाहूमहाराजांस कारागृहांतून सोडिलें आणि राज्यावरही बसविलें, पण त्यांच्या हातीं बहुत वर्षं राज्य नसल्यामुळें त्या मुलखांत फार अव्यवस्था झाली आहे. त्राता नसल्यामुळें अंदाधुंदी माजून पुष्कळ ठिकाणची वस्ती उठून गेली आहे, आणि यामुळें राज्यांतील फार मोठा जमिनीचा भाग ओसाड पडला आहे. अशा स्थितींत शाहूमहाराजांस वसूल कोठून येणार? आपल्या कृपेनें शाहूमहाराज दक्षिणेंतील राज्यावर बसले खरे, पण खर्चास पुरेसें उत्पन्न नसल्यामुळें ते फार संकटांत व हालांत पडले आहेत. आपण दयाळूपणानें त्यांच्या खर्चास पुरेसें आणखी कांहीं उत्पन्न करून दिल्यास त्यांचा गुजारा होईल. नाहीं तर त्यांस पराकाष्ठेचें दुःख सोसावें लागेल! याप्रमाणें बाळाजीनें अति-लीनतेनें केलेली विनंती ऐकून बेगम साहेबांस व तेथें हजर असलेल्या दरबारी मुत्सद्यांस शाहूची दया येऊन त्यांचीं मनें द्रवलीं. तेव्हां शाहूच्या खर्चास मदत होण्याजोगें उत्पन्न कोठें व काय द्यावें ह्याचा विचार व खल त्यांच्यांत सुरू झाला. शेवटीं, दक्षिणेंतील निजामाच्या सहा सुभ्यांवर कांहीं ठिकाणीं चौथाई ह्मणजे जमीनवसु-

लीच्या बेरजेवर $\frac{1}{4}$ एक चतुर्थांस, व कांहीं ठिकाणीं सरदेशमुखी ह्मणजे $\frac{1}{10}$ एक दशांश, व कांहींवर साहोत्रा ह्मणजे $\frac{1}{16}$ एक षोडशांश असे हक्क दरसाल शाहूमहाराजांस देण्याचें ठरवून त्या हक्काच्या सनदाही लिहून त्या बाळाजीपंताच्या पदरीं टाकिल्या. याप्रमाणें स्वामिकार्यांत बाळाजीपंतास यश आल्यामुळें मोठा आनंद झाला. नंतर त्यानें शाहूमहाराजांच्या मातुश्रीस व राणीस आपल्या ताब्यांत घेऊन दिल्ली शहराबाहेर जेथें त्याची छावणी होती तेथें नेऊन त्यांस सुरक्षित ठेविलें, आणि आपली निघण्याची तयारी केली. बाळाजीनें जे नवे हक्क संपादन केले होते ते तेथल्या कित्येक विरुद्धपक्षाच्या लोकांस मानवले नाहींत. ह्मणून, बाळाजीपंत सनदा घेऊन दिल्लीच्या बाहेर निघून जाऊं लागला ह्मणजे मारेकऱ्यांच्या हातून त्याचा घात करवून त्याजवळच्या सनदा हिसकून घेण्याची त्यांनीं मसलत केली. नानाफडणिसाचा पूर्वज बाळाजी महादेव भानू हा बाळाजीपंताबरोबर दिल्लीस गेला होता. त्याला ही दुष्ट मसलत समजली तेव्हां त्यानें ती लागलीच बाळाजीपंतास सांगितली. यामुळें त्या उभयतांस मोठी काळजी उत्पन्न झाली, ती निवारण करण्याचा उपाय आतां काय करावा ह्याचा दोघांनीं विचार करितां करितां भानूनें असें सांगितलें कीं, यांतून सुरक्षितपणें निभावून जाण्यास मला एकच उपाय दिसतो, तो हा कीं, तूं फकिराचा वेष घे, सनदा झोळींत घाल, आणि भीक मागत मागत दिल्ली शहराच्या बाहेर पडून आपल्या छावणींत जा. तेथें गेल्यावर लागलीच बायांना घेऊन दक्षिणेंत चालता हो. होईल तितक्या सावधगिरीनें वागून फार जलदीनें मजला मारीत

दूर गेल्यावर मला खबर दे. ह्मणजे मग मी तुझा पोषाक धारण करून तुझ्या इतमामानें तूंच बाहेर जात आहेस अशा-थाटानें दिल्लींतून बाहेर जाण्यास निघेन. त्या वेळीं मी दैव-योगानें सुरक्षित निभावून आल्यास जलदीनें तुला येऊन गांठीन. पण कदाचित् दुर्दैवानें माझा घात झाला तरी कांहीं चिंता नाहीं. कारण स्वामिकार्याची सर्व सिद्धि मिळवून तूं साताऱ्यास जाऊन पोंचशीलच. स्वामिकार्याच्या सिद्ध्यर्थ माझा प्राण गेला तरी पुण्यच आहे. मी मेलों तरी माझ्यामागें माझ्या कुटुंबाचा तूं चांगला प्रतिपाळ करशील असा मला भरंवसा आहे. याकरितां आतां विलंब न लावतां लौकर ऊठ, तयारी कर. उशीर झाल्यास स्वामिकार्याची हानि होईल. ही त्या एकनिष्ठ स्वामिभक्तानें जिवावर उदार होण्याची मसल-त दिली, ती भयंकर असल्यामुळें तिला बाळाजी प्रथम रु-कार देईना, पण ह्याखेरीज दुसरा चांगला उपायच दिसेना, यामुळें निरुपाय होऊन मोठ्या कष्टानें तें साहस करण्यास बा-ळाजी कबूल झाला. मग लागलीच संध्याकाळच्या वेळीं त्यानें फकिराचा वेष घेतला, हक्कांच्या सनदा झोळींत घा-तल्या, आणि तो भीक मागत मागत युक्तीनें दिल्ली शहराच्या बाहेर पडून आपल्या छावणींत जाऊन सुरक्षित पोंचला नंतर लागलीच कुच करून तो सर्व मंडळीसह अति त्वरेनें पण साव-धगिरी ठेवून मोठाल्या मजला मारीत दक्षिणेकडे बऱ्याच मजला गेला. नंतर संकेताप्रमाणें आपल्या फडणीस मित्रास त्यानें खबर पाठविली. ती त्यास पोंचतांच तो बाळाजीपंताचा पोषाक धारण करून त्याच्या सर्व इतमामाच्या थाटानें दिल्ली शहराच्या बाहेर जाऊं लागला. तेव्हां टपत बसलेल्या मारेकऱ्यांनीं हा

बाळाजीपंतच आहे अशा समजुतीनें त्या स्वामिसेवानिष्ठ फडणीस पुरुषाचा रस्त्यांत घात करून त्यास ठार मारिलें. ह्या स्वामिकार्यनिष्ठ स्वदेशभक्तानें आपल्या प्राणाचा बळी देऊन ही किती मोठी कामगिरी बजाविली हें वाचणाऱ्यांनीं ध्यानांत धरावें. ही गोष्ट अत्यंत प्रशंसनीय असल्यामुळें येथें सांगितली. तथापि यांतून प्रस्तुत आपणास प्राचीनकाळचे शहाणे मुसलमान लोक हिंदूंशीं सदय अंतःकरणानें वागून त्यांचा सांभाळ करीत होते, एवढेंच तात्पर्य घ्यावयाचें आहे. वर सांगितलेले तिन्ही हक्क निजाम सरकारच्या मुलखांतून पेशवाईअखेर मराठ्यांकडे चालत होते. त्या हक्कांपैकीं साहोत्रा अमलाचा कांहीं भाग भोरकर पंत सचीवांस दिलेला होता, तो त्यांजकडे अद्याप चालत असून त्याचा वसूल दरसाल सचीव साहेबांस निजाम सरकारांतून मिळत असतो.

वायव्य प्रांतांतील अलीगड जिल्ह्यांत सर सय्यद अहमद या मुसलमान उदार गृहस्थांनीं मुसलमान जातीच्या लोकांत विद्येचा प्रसार व्हावा ह्मणून कॉलेज स्थापिलें आहे. त्यांत हिंदु लोकांच्या मुलांस शिकण्याचा प्रतिबंध ठेविला नाहीं. यामुळें हिंदुलोकांचीं बहुत मुलें तेथें विद्याभ्यास करून ज्ञानसंपादन करीत आहेत, हें आमच्या मुसलमान बांधवांनीं ध्यानांत ठेवावें.

पुण्यांत फर्ग्यूसन कॉलेज, न्यू इंग्लिश स्कूल, नेटिव्ह इन्स्टिट्यूशन इत्यादि खासगी शाळा, मुंबईंत अनेक खासगी शाळा, त्याचप्रमाणें बेळगांव, धारवाड, सातारा, अहमदनगर, नाशिक व नागपूर इत्यादि ठिकाणींही विद्येच्या वृद्ध्यर्थ हिंदु लोकांनीं खासगी विद्यालयें स्थापिलीं आहेत. त्या सर्वांत

मुसलमान जातीच्या विद्यार्थ्यांस शिकण्याची मोकळीक असल्यामुळें मुसलमान बांधवांचीं अनेक मुलें शिकत आहेत. आलीकडे पुण्यांतील न्यू इंग्लिश स्कुलास नवीन सुधारणेच्या अनेक सोईनीं परिपूर्ण असें एक बोर्डिंग जोडलें आहे. त्यांत देखील मुसलमान विद्यार्थ्यांस प्रतिबंध नाहीं. ह्मणून मुसलमान जातीचे अनेक विद्यार्थी तेथें जाऊन रहातात, आणि मोठ्या आनंदानें विद्याभ्यास करितात. हें मुसलमान बांधवांनीं मुद्दाम जाऊन पहावें ह्मणजे 'चक्षुर्वैसत्यं' याप्रमाणें त्यांची खात्री होईल.

बडोद्यांत गायकवाड सरकाराकडून दानधर्म फार होतो, तेथें दररोज हिंदु लोकांस खिचडी (कोरडा शिधा) मिळते. त्याचप्रमाणें मुसलमान जातीच्या लोकांस शिजविलेल्या अन्नाचा धर्म दररोज मिळतो. त्याखेरीज प्रत्येक एकादशीच्या दिवशीं मुसलमान जातीच्या लोकांस दरमाणशीं नक्त चार आणे मिळतात. त्यास 'ग्यारमी' असें ह्मणतात. हा मुसलमानांस मिळणारा धर्मादाय कैलासवासी खंडेराव महाराजांनीं चालू केला, तो अद्याप अखंड चालत आहे. मक्केतील मुसलमान धर्माच्या कबरेवर ठेवण्याकरितां १० लक्ष रुपये किंमतीची रत्नजडित चादर खंडेराव महाराजांनीं तयार करविली होती, ती तयार झाल्यावर खंडेराव महाराज अकस्मात् वारले. यामुळें पुढें ती मक्केस गेली कीं नाहीं हें कळत नाहीं. तथापि, मुसलमान लोकांविषयीं व त्यांच्या देवस्थानांविषयीं हिंदु लोकांत भक्तिभाव किती आहे हें या गोष्टीवरून स्पष्ट दिसून येईल. हें उदाहरण आमच्या प्रियकर मुसलमान बांधवांनीं अत्यंत विचार करण्यासारखें आहे.

काठेवाडांत जुनागड या नांवाचें मोठें संस्थान मुसलमान घराण्याकडे चालत आहे. तेथील दिवाणगिरीच्या जाग्यावर रा. ब. हरीभाई देसाई लेवा पाटीदार हे हिंदु गृहस्थ असून खेडा जिल्ह्यांतील नडियाद शहरचे राहणारे आहेत. त्यांजवर जुनागडचे नबाब साहेबांचा पूर्ण विश्वास आहे. ते दिवाणगिरीचें काम उत्तम रीतीनें चालवीत असल्यामुळें त्या सरकारचें उत्पन्न पुष्कळ वाढत आहे, ही गोष्ट मुसलमान बांधवांनीं विचारांत घेण्याजोगी आहे.

वरील सर्व उदाहरणें राजकीय संबंधाचीं आहेत. पण साधारण व्यवहारांत पाहिलें तरी हिंदु व मुसलमान हे परस्परांशीं सख्यत्वानें वागतात असें दिसून येईल. मुंबई शहरांत व्यापाराची उलाढाल फार चालते. यामुळें तेथल्या बाजारांत मेमण, खोजे, कच्छी व बोहरी इत्यादि मुसलमान धर्मी लोकांचा भरणा मोठा आहे. त्यांच्या दुकानीं मेथे (कारकून) हिंदु गुजराथी लोक असतात, असें शोध करून पाहणारांस दिसून येईल. तेथल्या शेट लोकांचा मेथाजींवर पूर्ण भरंवसा असल्यामुळें हजारों रुपये त्यांचे हातीं असतात. तरी लबाडी न करितां मेथाजी आपल्या धन्यांशीं फार विश्वासूपणानें वागून त्यांच्याशीं नेकीनें राहतात असें स्पष्ट दिसण्याजोगें आहे.

मुसलमान जातीचे कित्येक गरीब फकीर लोक खैरात मागण्याकरितां हिंदु लोकांचे दारोदार जाऊन त्यांस दुवा देऊन खैरात मागतात. तेव्हां त्यांचा तिरस्कार न करितां हिंदु लोक त्यांस यथाशक्ति पैसा, धान्य, लत्ताकपडा अथवा रोटी देतात. असला धर्मादाय शहरोशहरीं व गांवोगांवीं हिंदु

लोकांकडून नेहमीं होत असतो. यावरून, श्रीमंतापासून गरी-
बापर्यंत सर्व हिंदु लोक मुसलमान लोकांचा व त्यांच्या
धर्माचा तिरस्कार न करितां त्यांजवळ सन्मानपूर्वक व दया-
शील अंतःकरणानें वागतात, असें होत आहे. ही गोष्ट सा-
धारण आहे तरी सर्वत्र ठिकाणीं घडत असल्यामुळें पाहिजे
त्या जागीं तपासून पाहणारांस दिसून येणारी आहे. ह्मणून
आमच्या मुसलमान बांधवांनीं त्याचा अवश्यमेव विचार करावा.

आतां यापेक्षां अधिक श्रेष्ठ असेंही उदाहरण पहा—मु-
सलमानांच्या देवस्थानास (पिरांस) हिंदु लोक भजतात,
त्यांची पूजा करितात, त्यांला नवस करितात व त्यांला कंदुरी
देतात. दर गुरुवारीं त्याला खेटे घालतात. मोहरमांतील
डोल्यांस मलिदा देऊन त्याचे भक्त (फकीर) बनतात. फ-
किराचें स्पष्ट चिन्ह दाखविण्याकरितां कफन्या व नाडे धा-
रण करितात. त्यांच्या डोल्यांपुढें धूप जाळतात. अबीर,
रेवड्या व खारका उधळतात. डोले थंडे होण्यास जाऊं ला-
गले ह्मणजे रस्त्यानें त्यांच्यापुढें हसन, हुसेन व अल्ला या
नांवांचें मोठ्यानें भजन करून फार प्रेमानें नाचतात. पा-
ण्याचे हेल आणून रस्त्यांत डोल्यांपुढें रिचवितात. कित्येक
हिंदु डोले करितात, व त्या प्रीत्यर्थ मोठाले खर्च करितात.
हिंदुस्थानच्या सर्व भागांत श्रीमान् व गरीब हिंदु लोक म-
नोभावेंकरून मुसलमानी धर्माच्या देवाची मोठ्या भक्तीनें
सेवा करितात, हें मुसलमान बांधवांनीं पहावें.

सन १८६४ सालीं मक्केची यात्रा करून मुसलमान
लोक मुंबईस परत येत होते, त्यांचें गलबत मुंबई बंदरानजीक
येण्याचे संधीस अतिशय मोठें वादळ होऊन दर्या खवळला,

त्यामुळें गलबत आडमार्गानें भडकलें, आणि ब्याकबेच्या समोर दर्यांत खडक आहे त्याच्या सांपटींत जाऊन अडकलें. तेणेंकरून गलबतास मागें किंवा पुढें जातां येईना. खांबाशीं बांधून ठेवल्याप्रमाणें त्याची जखडबंदी झाली. पाण्याच्या मोठाल्या लाटा उसळून त्या गलबतावर जोरानें आदळूं लागल्या. अशा अनेक भयंकर संकटांनीं घेरल्यामुळें आतां लौकरच गलबत बुडून जाईल, किंवा फुटून त्याचे तुकडे तुकडे होतील, अशी खलाशी लोकांस भीति वाटली. गरीब बिचाऱ्या भाविक मुसलमान यात्रेकरू लोकांचे जीव समुद्रार्पण होणार असें पाहून सर्व लोक घाबरले. ह्या घातक स्थळीं गलबत सांपडलें तर दगा होतो, हें मुंबईंत सर्वप्रसिद्ध आहे. त्या ठिकाणीं उतारू लोकांनीं भरलेलें गलबत फसलें आहे, अशी शहरांत बातमी पसरतांच ब्याकबेवर हजारों लोकांची गर्दी जमली. त्या संकटांत पडलेल्या लोकांचे जीव कसे वांचवावे ह्याची वाटाघाट सुरू झाली. शेवटीं एका उदार भाटे जातीच्या गृहस्थानें आपल्या पदरचे एक हजार रुपये बक्षीस देण्यास काढले. आणि तेथें जे पडाववाले जमले होते त्यांस जाहीर केलें कीं जो कोणी धैर्यानें जाऊन त्या गलबतास दोर बांधून येईल त्यास हे एक हजार रुपये बक्षीस मिळतील. एवढें मोठें बक्षीस लाविलें होतें तरी त्या भयंकर रूप धारण केलेल्या दर्यांत उडी घालण्याची कोणाची छाती होईना, पण त्या बक्षीस लावलेल्या द्रव्याच्या आशेनें पडाववाले गलबताकडे जाण्याच्या प्रयत्नास लागले. त्यांतील एका हिंमतबहाद्दरानें मोठ्या प्रयासानें जाऊन त्यास दोर बांधला. आणि त्यावरील कांहीं उतारू आपल्या पडावांत घेऊन त्यांस

सुरक्षितपणें किनाऱ्यावर आणून पोंचविलें. त्या वेळीं मोठ्या जयजयकारानें बक्षिसाची रक्कम त्यास अर्पण करून शिवाय गौरवार्थ त्याला चांगला पोषाखही दिला. बांधलेल्या दोराच्या आधारानें गलबताजवळ जाण्याची पडाववाल्यांस सोय झाल्यामुळें त्यांस धीर येऊन हिंमत वाढली. शिवाय आणखी एका भाटे गृहस्थानें असें जाहीर केलें कीं, 'त्या गलबतावरील उतारू लोकांचे प्राण वांचवून त्यांस किनाऱ्यावर सुरक्षित आणून पोंचविणारांस प्रत्येक उतारूमागें दोन रुपये याप्रमाणें मी बक्षीस देईन.' हें ऐकतांच बहुत पडाववाले गलबताकडे धांवले. आणि आपल्या शक्तीप्रमाणें उतारूंस पडावांत घेऊन त्यांना किनाऱ्यावर आणून पोंचविण्याचा क्रम त्यांनीं सुरू केला. द्रव्याच्या लालचीनें व एकमेकांच्या ईर्षेनें पडाववाल्यांनीं त्वरा करून थोडक्या वेळांत सर्व उतारूंस किनाऱ्यावर आणून पोंचविलें. बहुत दिवसांच्या प्रवासामुळें त्या उतारूंपैकीं बहुतेक लोक भुकेनें व्याकुळ होऊन पडले होते, व कित्येक वस्त्रें नसल्यामुळें थंडीनें कुडकुडत होते. हें पाहून आमच्या उदार भाटे लोकांस फार दया आली. तेव्हां लागलीच एकानें विलंब न लावतां धांवत जाऊन हारेच्याहारे रोट्या आणल्या, आणि त्या सर्वांस वांटल्या. दुसऱ्या एकानें तेथें कापडाचे अनेक गठ्ठे आणून सोडले आणि वस्त्रें दिलीं. तिसऱ्यानें त्या लोकांस राहण्याकरितां सोइस्कर जागा पाहून ती भाड्यानें घेतली आणि तेथें राहण्यास येण्याबद्दल त्या सर्व लोकांस निमंत्रण केलें. चौथ्यानें शेंकडों गाड्या, रेकले व घोड्यांच्या बग्या वगैरे वाहनें आणून त्यांत लोकांस बस-

विलें, आणि नेमलेल्या जागीं नेऊन पोंचतें केलें. राहण्याच्या ठिकाणीं सर्वांच्या खाण्यापिण्याची चांगली सोय अगोदरच करून ठेविली होती. याप्रमाणें हिंदु लोकांनीं आपल्या मुसलमान बांधवांस संकटकाळीं साह्य केलें, हें सुज्ञ मुसलमान बांधव ध्यानांत धरतीलच.

वर दिलेल्या उदाहरणांवरून आमचे मुसलमान बांधव दुराग्रह सोडून शांतपणें विचार करतील तर समजूतदार हिंदु व मुसलमान लोक पूर्वीं परस्परांशीं कसे वागत होते व आजही कसे वागत आहेत, हें दिसून येण्याजोगें आहे. असें असतां सध्यां दुराग्रहास पेटून हिंदु व मुसलमान लोक परस्परांशीं तंटे व मारामाऱ्या करितात. त्या योगानें उभयतांस कांहीं लाभ होतो, किंवा हानि होते, ह्याचा विचार आतां लोकांपुढें ठेवितों, त्याकडे उभयतांनीं लक्ष द्यावें, अशी हात जोडून विनंति आहे.

हिंदु लोक मुसलमानधर्माच्या देवाची भक्ति करितात, त्याचप्रमाणें कित्येक मुसलमान बांधव हिंदु लोकांच्या देवाची भक्ति करतात अशीं उदाहरणें आहेत. कबीर व त्याचा पुत्र कमाल हे दोन्ही पुरुष मुसलमान होते, ते काशी क्षेत्रीं रहात असत. कबीर हा पूर्ण रामभक्त होता. त्यानें परोपकारार्थ भक्तिभावानें जनांस बोध करण्याच्या हेतूनें अनेक कविता केल्या, त्यांत पदें फार आहेत. त्यांची अद्यापि प्रसिद्धि आहे. त्याच्या बोधानें लोकांस उपरती होऊन जे त्याचे अनुयायी झाले, त्यांनीं एक स्वतंत्र पंथच स्थापिला, त्यास कबीरपंथ असें ह्मणतात. कबीरपंथाचे लोक मुंबई, पुणें व नागपूर वगैरे ठिकाणीं बहुत आढळतात. दुसरें उदाहरण, मुनींद्र

स्वामीचा शिष्य शहामुनी मुसलमान असून त्यानें 'सिद्धांतबोध' या नांवाचा वेदांतविषयावर ओंवीबद्ध उत्कृष्ट ग्रंथ लिहिला, तो शके सत्राशेंत मौजे चांबळी, तालुके पुरंदर, जिल्हा पुणे येथें समाप्त केला. ह्या पुस्तकाचे अध्याय ५० असून तो शके १७९२ सालीं मुंबईतील गणपत कृष्णाजी यांच्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाला आहे. हा ग्रंथ फार सुलभ असून मोठा मार्मिक असल्यामुळें वाचणारांनीं त्याचें एकवेळ तरी अवलोकन करावें अशी विनंति आहे.

---

## भाग तिसरा.

### दंग्याची संक्षिप्त हकीगत, व त्याच्या परिणामांचीं जुनीं व नवीं उदाहरणें.

प्रस्तुत हिंदु व मुसलमानांमध्यें तेड पडून माजलेला कलह राजकीय नाहीं. त्यास कित्येक लोक धर्माचें स्वरूप देतात, पण वास्तविक पाहिलें तर त्यांत धर्माचाही कांहीं संबंध दिसत नाहीं. उत्तर हिंदुस्थानांत अनेक ठिकाणीं हिंदु मुसलमानांत तंटे होऊन मारामाऱ्या होतात, असें ऐकत होतों, तरी ती गोष्ट एकदेशीय असल्यामुळें त्याची विशेष चौकशी व चर्चा करण्याचें प्रयोजन नव्हतें. पण त्या दुष्ट कलहाग्नीच्या ठिणग्या दक्षिणेकडे वळून दुर्दैवानें मुंबई इलाख्यांत अनेक ठिकाणीं चेतूं लागल्यामुळें लोकांच्या स्वस्थतेचा भंग होत चालला आहे. ह्या दुष्ट आगीचा अधीक भडका न होऊं देतां त्याची शांती करावी असे प्रयत्न करणें हें हिंदु व मुसलमान लोकांस व सरकार व सरकारी अधिकारी यांसही अत्यंत इष्ट आहे. असें असतां ह्या उभय

जातीमध्यें इकडे कलह माजल्यास दीड वर्ष झालें. इतक्या कालांत ८।१० गांवीं लहान मोठे १२।१४ वेळ तंटे होऊन मारामाऱ्या व कांहीं खूनही झाले. तरी त्याच्या शमनाच्या खऱ्या उपायांची गोष्ट कोणीच बोलत नाहीं, हें महदाश्चर्य आहे. पहिल्या प्रथम काठेवाडांतील जुनागड संस्थानांतल्या प्रभासपट्टण ह्या गांवीं मोहरमांतील ताजे मिरविण्याच्या वेळीं तंटा उपस्थित झाला. तेव्हां ताजे थंडे करण्यास अमुक रस्त्यानें न्यावे, असा सरकारी हुकूम असतां त्यांची पायमल्ली करून ते दुसऱ्या भलत्याच रस्त्यानें नेले. तेव्हां पोलीस हरकत करूं लागल्यामुळें त्यांस मुसलमानांकडून खरपूस मार मिळाला. हिंदु लोकांची तर त्यांनीं खूपच कुंदी काढली.

त्या गर्दीत हिंदूंच्या देवालयांत शिरून पुष्कळ नाश केला. आणि तेथल्या पुजारी वगैरे हिंदु लोकांचे खूनही पाडले असें ऐकतों. ह्या घोर कृत्यास आरंभ १८९३ सालच्या मोहरमांत झाला. त्या गोष्टीस एक दोन महिने लोटले नाहींत तोंच मुंबईस मुसलमानांनीं दीन गाजविण्याची सुरवात केली. यामुळें त्या मोठ्या व्यापारी शहराचें पुष्कळ नुकसान झालें. व कांहीं लोकांस जबर मार बसून कांहीं लोकांची प्राणहानिही झाली असें ह्मणतात. शांतता करण्यास झटणाऱ्या कांहीं पोलिसच्या लोकांस मार मिळून दुखापतीही झाल्या. तेथें सतत तीन दिवस हा दंगा चालला होता. दंग्यांत धुमाकूळ घालणाऱ्या लोकांस पोलिसानें पकडलें, त्या आरोपींची संख्या सुमारें दोन हजारांजवळजवळ झाली. इतक्या आरोपींस न्याय होईपर्यंत अडकावून ठेवण्यास मुंब-

ईच्या व ठाण्याच्या तुरुंगांतील जागाही पुरेनाशी झाली. तेथला दंगा जरा शांत झाल्यावर धरलेल्या आरोपींची चौकशी होऊन शेंकडों लोकांस शिक्षा मिळाल्या. मुंबईच्या दंग्याची व आरोपींच्या चौकशीची परिसमाप्ति होते न होते, इतक्यांत नाशिक जिल्ह्यांतील येवलें गांवीं दंगा माजला. तेथें त्यांनीं हिंदूचें देवालय जाळलें, व बाजारांतील व्यापाऱ्यांचीं दुकानें फोडलीं आणि त्यांतील मालाचा पुष्कळ खराबा केला. त्या दांडगाईबद्दल पोलिसाची धरपकड सुरू झाली, त्यामध्यें तेथले अब्रूदार, धनाढ्य व प्रतिष्ठित असे हिंदु लोक पकडले गेले. त्यांना सेशनकोर्टांत चौकशीकरतां उभें केलें, पण पुरावा नसल्यामुळें सेशनकोर्टानें आरोपी सोडून दिले. त्या कामांत वकील व बारिस्टर वगैरे लोक आणावे लागल्यामुळें लोकांस हजारों रुपये खर्च करावा लागला. येवल्याचें प्रकरण संपतें न संपतें इतक्यांत खानदेशांतील रावेर, व कुलाबा जिल्ह्यांतील पेण ह्या गांवीं दंगे माजले. पेणेस तर उद्भवलेल्या दंग्यास कारण अती अल्प होतें. रोगाची सांत बंद होण्याकरितां हिंदुलोकांनीं आपल्या एका देवालयांत अनुष्ठान केलें. त्याच्या समाप्तीच्या अंतीं अन्नाचा बळी काढावा लागतो; त्याप्रमाणें काढलेला अन्नाचा बळी नेहमींच्या वहिवाटीप्रमाणें मिरवत नेऊन गांववसाहतीच्या बाहेर ठेवण्याकरितां चालविला. तेव्हां मुसलमान लोक मोठ्या जमावानें हातांत काठ्या घेऊन रस्त्यांत आडवे आले. इतकेंच करून ते थांबले नाहींत. बळी जाण्याच्या भररस्त्यावर पोलीस अधिकाऱ्यांच्या व माजिस्ट्रेटच्या देखत एक गाय आडवी पाडून तेथें

तिचा गळा कापण्याची त्यांनीं अगदीं तयारी केली. गाईची मान तोडण्याकरितां धार पाजविलेला सुरा हातांत घेऊन खाटीक तिच्या मानेजवळ येऊन उभा राहिला. तो आतां तिच्या मानेवर सुऱ्याचा घाव मारणार असें पाहून तेथें जमलेल्या गर्दींतून बंधुभाई कासार गृहस्थ पुढें सरसावला, आणि तो गाईच्या मानेवर आडवा पडून त्यानें खाटकास व सर्व मुसलमान मंडळीस विनंती केली कीं,—गाय आह्मां सर्व हिंदूस पूज्य आहे, असें असतां आह्मां सर्व हिंदूंच्या देखत निष्कारण तिचा गळा कापून तुह्मी प्राण घेणार त्यापेक्षां अगोदर माझा प्राण घ्या, आणि मग पाहिजे तें करा. असें त्याचें निग्रहाचें भाषण व धारिष्ठ पाहून मुसलमान लोक व तो मारेकरी खाटीक चपापले. तेव्हां तेथें हजर असलेल्या माजिस्ट्रेट साहेबांनीं व पोलीसच्या अमलदारांनीं त्या क्रूरकर्माचा निषेध केला. आणि हिंदु लोकांस समजून सांगून तो बळी दुसऱ्या रस्त्यानें नेऊन गांवाबाहेर टाकविला. ह्या गोष्टीस अल्पकाळ लोटला नाहीं तोंच पुणें जिल्ह्यांतील मावळ तालुक्यांत दाभाड्याच्या तळेगांवांतील मुसलमान लोकांनीं कांहीं कारण उकरून तंटा माजविण्याचा घाट घातला होता. पण तेथील हशमभाई शिकलगार या वृद्ध मुसलमानानें व पोलीसच्या अधिकाऱ्यांनीं दंगे करूं इच्छिणाऱ्या मुसलमान भाईंस बोध करून शांत केलें. त्या वेळीं त्या वृद्ध व शहाण्या मुसलमान गृहस्थानें केलेला उपदेश फार बोधपर आहे. तो आपल्या मुसलमान बांधवांस ह्मणाला:—"भाईहो तुह्मी नसत्या कुरापती काढून हिंदु लोकांशीं भांडण्याचा व मारामारी करण्याचा हेतु धरिला आहे, पण या कृतीचा दूरवर

विचार करून पाहिलात का? अहो, ह्या प्रदेशांत आपणा मुसलमानांची जात अति अल्प आहे. पण हिंदु जातीचा भरणा आपल्या मुसलमान जातीहून दसपट किंवा वीसपट देखील जास्त होईल. एवढ्या मोठ्या समाजावर आपण चढाई करून गेलों आणि दांडगाई सुरू केली तर सर्व हिंदूंपुढें आपला निभाव लागेल का? हिंदुलोक सौम्य असल्यामुळें दांडगाईस प्रवृत्त होत नाहींत हें फार उत्तम आहे. पण ते अभिमानास पडून तुमच्याशीं दांडगावा करण्यास उभे राहिले तर एका क्षणांत तुमचा धुव्वा उडवून देतील. हें तुह्मी नाहीं का जाणत? हिंदुलोक शांतवृत्तीचे असल्यामुळें आडमार्गांत शिरून निकरानें सामन्यास उभे राहून लठ्ठालठ्ठी करीत नाहींत हें बरें आहे. पण तसलें साहस न करितां त्यांनीं युक्तीचा प्रयोग योजून तुह्मांस वांकविण्याचें मनांत आणिल्यास क्षणांत तुह्मांस ते मेंढ्या करून सोडतील. त्यांनीं तुमच्याशीं कोणत्याही प्रकारें व्यवहार करण्याचें बंद केलें तर तुमची वाट काय होईल? ह्याचा कांहीं तरी विचार केलात का? हा प्रयोग पेणच्या हिंदु लोकांनीं एकदिलानें सुरू करतांच तेथले मुसलमान शुद्धीवर आले. आणि पुनः दांडगाई न करण्याचें कबूल करून त्यांनीं हिंदुलोकांस वचनें दिलीं. हिंदूंनीं तसला प्रयोग तुह्मांवर केल्यास तुह्मी सर्व प्रकारें नाडले जाल. कारण त्यांचा भरणा फार मोठा असल्यामुळें सर्व कामांत हिंदुलोक आहेतच. शेतकरी, दुकानदार, सावकार, सोनार, कासार, लोहार, सुतार, साळी, माळी, कुंभार, महार व चांभार यांच्या सर्व उद्योगांत पाहिलें तरी हिंदुलोकच आहेत. इतक्या सर्व व्य-

वहारी लोकांनीं तुमच्याच वाईट कृतीमुळें सर्व प्रकारचे व्यवहार तुमच्याशीं बंद केल्यास तुह्मी सर्व प्रकारीं अडचणींत पडून तुह्मांला उपाशीं मरण्याची पाळी येईल. यास्तव तुह्मीं आपल्याच हिताचा मागला पुढला नीट विचार करून वागाल तर तुमचें कल्याण होईल. आणि तसें न करितां हट्टास पेटून मूर्खपणानें आडमार्गांत शिराल तर तुमच्या पायांत कांटे मोडतील, व तुमचा फार नाश होईल यांत संशय नाहीं. बाबांनो, पाण्यांत राहून माशाशीं व मगराशीं वैर केल्यास ते देखील वैऱ्याचा घात करितात. मग हिंदुलोक तर शहाणीं माणसेंच आहेत. हिंदूंच्या देशांत तुह्मांला राहणें असेल तर हिंदूंशीं वैर न करितां त्यांच्याशीं गोडीगुलाबीनेंच वागा. उगीच कोणीं चढ देऊन तुह्मांस दांडगाई करण्याची दुष्ट मसलत दिली तर त्या भरंवशावर राहून फसूं नका. कारण दाणें टाकून कोंबड्या लढविणारे लोक केवळ मौज पाहाणारे असतात, पण लढाई करणाऱ्यांतून एखादा कोंबडा मेला तर ह्या तमासगिरांचें काय जाणार? मरणाऱ्याची सागोती करून खायाला ते तयारच. हें तुह्मी कसें नाहीं समजत? उगीच भरीं भरून हूडपणा करूं नका. मीं तुमच्या हिताची गोष्ट सांगितली त्याबद्दल राग न मानितां स्वस्थ चित्तानें नीट विचार करा. तुह्मांस चिथावणारे लोक फार लबाड व स्वार्थसाधु आहेत. त्यांच्या नादीं न लागतां त्यांची संगत सोडा. मी तुमचा जातभाई असून हितचिंतक आहें. तुह्मी उमेदीच्या ताठ्यांत राहून हिंदूंशीं मगरूरीनें वागण्याची किंवा त्यांच्याशीं तंटेबखेडे करून मारामारी किंवा शिवीगाळ करण्याची गोष्ट मनांत सुद्धां आणूं

नका. तसें करण्यांत फार तोटा होणार आहे. आपण त्यांच्या ताटांत किंवा ते आपल्या तगारींत बसून एके ठिकाणीं जेवीत नाहीं, त्याचप्रमाणें आपल्या मुली त्यांच्याकडे किंवा त्यांच्या आपल्याकडे देत घेत नाहीं. असल्या भेदाबद्दल तुह्मी त्यांजवर किंवा ते तुमच्यावर रुसत नाहींत हें ठीकच आहे. पण अन्नव्यवहार व बेटीव्यवहाराशिवाय इतर सर्व गोष्टींत परस्परांची एकमेकांस पावलोपावलीं गरज लागणार. असें असून जर आपण हिंदूशीं चुरशीनें वागलों तर उभयतांनाही अडचण पडेल. या जगांतला व्यवहार कसा चालतो आपल्या सुखाची वृद्धि व दुःखाची निवृत्ति करण्यास मुख्यत्वें कोणतें तत्व ध्यानांत धरून चाललें पाहिजे, ह्याचा अंमळ खोल विचार करून पाहिल्यास असें दिसून येतें कीं, सर्व मनुष्यांनीं एकमेकांशीं वैरभाव न धरितां प्रेमानें व प्रामाणिकपणानें वागून आपलें काम करावें. कोणाशीं विरोध करूं नये. मोठाले धनाढ्य सावकार किंवा राजे लोक आपणाहून फार सुखी असे वाटत असतील, पण सूक्ष्म विचार करून पाहिलें तर तुमच्या देखील लक्ष्यांत येईल कीं, हा केवळ भ्रम आहे. राजांचें व सावकारांचें खरें थोरपण गरीब लोकांवर अवलंबून आहे. त्यांच्या आंगावरच्या भर्जरी पोशाखावर किंवा रत्नजडित अलंकारावर नाहीं. कल्पना करा कीं मनुष्यें एकमेकांशीं भांडून परस्परांवर रुसलीं, आणि सर्वांनीं असा बेत केला कीं, मला जें लागेल तें मी स्वतः करीन, दुसऱ्याचें साह्य कदापि घेणार नाहीं. त्याचप्रमाणें दुसऱ्याचें काम तिळभर सुद्धां करणार नाहीं. मी स्वतंत्र आहें. मी कोणाचाही चाकर नाहीं. अशा भ्रामक विचारांनीं

फुगून आपआपल्या कुऱ्यांत सर्वच माणसें वागूं लागलीं तर त्याचा परिणाम काय होईल? सर्वत्र संकट व नाश. असला दुष्टभाव मनुष्याच्या मनांत कधींच उद्भवूं नये, असेंच मी इच्छितों. पण आपल्या शहाणपणाच्या घमेंडींत राहून चव-ड्यावर ऐटीनें चालणारी अशी कांहीं उमेदवार मंडळी आहे, त्यांच्या समजुतीकरितां सांगतों कीं, वर सांगितल्याप्रमाणें सर्व मनुष्यांची एकमेकांवर रुसवारुसवी होऊन गडी तुटली आणि जो तो केवळ आपल्यासाठींच खपणार, दुसऱ्याक-रितां वालाग्र झिजणार नाहीं अशी फारकत झाली, तर एका घटकेंत काय मौज होईल ती पहा—आई तान्ह्या पोराला पाजणें बंद करील, बायको नवऱ्याचें काम ऐकणार नाहीं, थोरांच्या घरचे चाकर नोकर, यजमानाकरितां इकडची काडी तिकडे करणार नाहींत, राजाची पालखी वाहणारे भोई जा-गच्या जागीं बसून राहतील, राजाचे हुजरे, शिपाई, व इ-तर सेवाचाकरी करणारे सर्व लोक आपलीं कामें तिळभर सुद्धां करीतनासे होतील. आचारी स्वयंपाक न करितां स्वस्थ बसेल. बाजारांतले दुकानदार आपआपलीं दुकानें बंद क-रून टाकतील. रेलगाडी हाकणारा ड्रायव्हर एन्जिनाला शिवणार सुद्धां नाहीं. इत्यादि सर्वप्रकारें मनुष्यांची एकमे-कांपासून फ्रांटाफूट झाल्यास ही दुनया चालणार नाहीं, बु-डेल. यःकश्चित् मीठ हा पदार्थ सर्वत्रांस लागतो, पण तो सगळ्या ठिकाणीं पिकत नाहीं. त्याची उत्पत्ती समुद्राचे पा-ण्यापासून होते व कांहीं ठिकाणीं त्याचे डोंगर व खाणी आहेत. आतां वर कल्पना केल्याप्रमाणें माणसें रुसलीं

आणि एकमेकांचा व्यवहार अगदीं बंद झाला तर मीठ येण्याचें बंद होईल. त्याचप्रमाणें सर्व पदार्थ मिळणें बंद झालें तर राजापासून रंकापर्यंत सर्वांचे व्यापार व उद्योग बंद पडतील. तेणेंकरून सर्वांस फार अडचणींत पडावें लागेल, ह्यांत संशय नाहीं. आपण सर्व मनुष्यें परस्परांशीं गोडीनें राहून आपल्याच स्वहिताकरितां साक्षात् व परंपरेनें एकमेकांच्या उपयोगीं पडतों, ह्मणून सर्वांच्या गरजा भागताहेत, व सुखाची वृद्धि होऊन दुःखाची निवृत्ति होत आहे. पशुपक्ष्यांपेक्षां आपणा मनुष्यांस सुख जास्त होतें ह्याचें मुख्य कारण हेंच आहे कीं, आपणास ज्ञान आहे. त्याच्या योगानें सलोख्यानें वागून आपण एकमेकांच्या फार उपयोगीं पडतों. ह्मणून आह्मांस सुख जास्त होतें, व तसें त्या अज्ञान पशुपक्ष्यांदिकांस करितां येण्याचें सामर्थ्य व शक्यता नाहीं, ह्मणून त्यांचें सुख मर्यादित झालें आहे. पण मनुष्याचें तसें नाहीं. ज्ञानबलानें तो शहाणा होऊन जसजसा दुसऱ्याच्या अधिकाधिक उपयोगीं पडतो आहे, तसतशी त्याच्या सुखाची वृद्धीच होत आहे. पन्नास वर्षांपूर्वी रेलगाडी व तारायंत्र ह्या देशांत नव्हतें तेव्हां दूर ठिकाणची बातमी कळण्यास व लांबचा प्रवास करण्यास फार काळ व अधिक श्रम लागत. पण शहाण्या व उद्योगी माणसांनीं खोटा अभिमान टाकून दुसऱ्याच्या उपयोगीं पडण्याच्या निश्चयानें केवळ अवतारच घेतला. त्या योगानें दुसऱ्याही मनुष्यांची तशी वृत्ति होत गेली. असा संघ वाढतां वाढतां एकलकोंडेपणाची व केवळ स्वार्थाची बुद्धि वाढली होती ती नष्ट होऊन परोपकारबुद्धीचा जोर झाल्यामुळें रेलवे, तारायंत्र, व

गिरण्या इत्यादिकांसारखे मोठाले कारखाने उदयास येऊं लागले. व त्या मानानें सर्व मनुष्यांचीं दुःखें व अडचणी कमी कमी होऊन सुखाची अभिवृद्धि होऊं लागली. पन्नास किंवा शंभर वर्षांपूर्वीं पुण्याहून किंवा मुंबईहून काशीस अथवा रामेश्वरास जाऊन परत येण्यास कमींतकमी सहा महिने तरी लागत. पण आज मनुष्यांत परोपकारबुद्धि वाढून तीं एकमेकांच्या साह्यार्थ सत्कृत्यें करण्यास मनोभावानें झटत आहेत. त्या योगानें रेलगाडी, पोष्टाची उत्कृष्ट व्यवस्था, व तारायंत्र गिरण्या इत्यादिकांची समृद्धि होत आहे. व त्यामुळें सुखही वाढतच आहे. आज काशीस किंवा रामेश्वरास जाऊन परत आपल्या गांवीं येण्यास ८।१० दिवस पुरतात. एक पैशाच्या कार्डावर लिहिलेला क्षेमसमाचार रामेश्वराहून पेशावरास ह्मणजे दोन हजार मैलांवर ६ वे दिवशीं पोंचतो. फार जरूरीच्या प्रसंगीं एकदोन रुपये खर्च केले ह्मणजे हिंदुस्थानच्या एका टोंकापासून पाहिजे तितक्या या देशांतील दूर अंतरावर ८ तासांत बातमी जाऊन पोंचते. हें फळ कशाचें? एकमेकांवर रुसण्यारागावण्याचें किंवा मूर्खपणानें मारामारी करण्याचें? एकमेकांवर रुसण्याचें नव्हे, तर खऱ्या प्रेमानें मनुष्यमात्राचें कल्याण व्हावें या बुद्धीनें केलेल्या श्रमाचें हें फल होय. सर्व मनुष्यांनीं एकमेकांशीं फार सलोख्यानें व सचोटीनें वागून एकंदर मनुष्यजातीच्या सुखवृद्ध्यर्थ झटण्याचा निश्चय केल्यास आज ज्या काय सोई दिसतात, त्यांच्या शतपट जास्त सोई वाढून मनुष्यांच्या सुखवृद्धींत फार मोठी भर पडेल. स्वर्गसुख येथेंच प्राप्त होईल हें सर्व मनांत आणा. उगीच भ्रमांत पडून हिंदूंशीं आजवर संपा-

दिलेला स्नेह तोडून आपल्यास होत असलेल्या सुखांत विष कालवूं नका. यांतच मौज आहे. तुह्मी कितीही नाहीं नाहीं ह्मटलें तरी हिंदु व मुसलमान हे उभयतां आपण एका देशांत राहतों, एका भूमातेचें अन्न खातों, यामुळें भावंडेंच आहोंत. तेव्हां ते आणि आपण कितीही भांडलों तरी आज नाहीं तर उद्यां एक होऊंच. पण माझें ह्मणणें असें आहे कीं, युरोपांतले देश व अमेरिका हे भूभाग या हिंदुस्थान देशापासून हजारों कोस लांब आहेत, तरी व्यवहाराच्या योगानें जो एकमेकांस उपयोग होत आहे तो फार सुखकर झाला आहे. कांहीं कारणानें तो व्यवहार बंद पडल्यास आज आमचा केवढा घोटाळा होईल तो पहा. आज रॉक ऑइल (चिमणीचें तेल) हें रशिया व अमेरिका येथून इकडे लक्षावधि रुपयांचें येतें, त्या योगानें आपली फार मोठी सोय झाली आहे. त्याचप्रमाणें यःकश्चित् दिवेसळ्या ह्या युरोपांतील स्वीडन, नार्वे, इंग्लंड व आशियांतील जपान इत्यादि ठिकाणांहून आपलेकडे येतात, त्यामुळें हुकमी उजेड एक पैशांत आपल्यास पाहिजे तेव्हां व हवा त्या वेळीं करतां येतो. पण कांहीं कारणानें हा व्यवहार कांहीं काल बंद पडला तर आपले किती हाल होतील हें मनांत आणा. तात्पर्य राजापासून रंकापर्यंत मनुष्यमात्रानें गर्व न धरितां एकमेकांशीं सौजन्यानें वागून परस्परांच्या उपयोगीं पडावें ह्मणजे एकमेकांचें कल्याण होईल. आणि तसें न करितां मूर्खपणानें एकमेकांवर रुसून फुगून वैरभाव धरिल्यास सर्वस्वीं हानि होईल यांत संशय नाहीं. हें सर्व मनांत वागवून लोकांशीं खऱ्या प्रेमानें वागून परस्परांच्या सुखवृद्धींत भर घाला हेंच

तुमच्या कल्याणास उत्कृष्ट नौकेप्रमाणें साधन होईल." हा मुसलमान गृहस्थ खेडेगांवांत रहात असून गरीब स्थितींत आहे. त्यानें बहुतकाल शिकून बी. ए. किंवा एम. ए. अशा मोठ्या पदव्या मिळविलेल्या नाहींत, तथापि अनुभवज्ञानाच्या बलानें आपल्या बांधवांसच नव्हे, पण एकंदर मनुष्यमात्रांस केलेला बोध फार स्तुत्य आहे. 'जरि उकिरड्यांत पडला मळला न हिरा तथापि सामान्य' ह्या मयूरोक्तीप्रमाणें शहाणपण कोणाच्याही मनांतलें असो त्याचा उपयोग प्रसंगीं सारखाच होतो. ह्या थोर पुरुषाची मी मनोभावानें स्तुति करतों. वरील उपदेश ऐकून तळेगांवचे हुरळलेले मुसलमान बांधव थंड झाले.

त्यानंतर पुणें शहरांत व सातारा जिल्ह्यांतील वांई ह्या गावीं अल्प कारणावरून हिंदुमुसलमानांत कटकट झाली त्याबद्दल वांईच्या अब्रूदार तेरा हिंदूंस साताऱ्च्या असिस्टंट माजिस्ट्रेट साहेबांनीं २१।२१ दिवसांची तुरुंगाच्या कैदेची शिक्षा दिली. पुण्यास झालेल्या तंट्यांपैकीं नागपंचमीच्या दिवशीं नागोबाचा गाडा प्रसिद्ध रस्त्यावर उभा करून रस्ता अडविला, व पोलीसचा हुकूम अमान्य केला असे चार्ज ठेवून बऱ्याच लोकांस दंडाची शिक्षा पुणे सिटी माजिस्ट्रेटांनीं दिली. भाद्रपदमासीं गणपतीचा मेळा दारूवाल्याच्या पुलावरून रास्त्याच्या वाड्यांत जात किंवा येत असतां, हिंदु मुसलमान लोकांत झालेल्या तंट्यांत १३ असामी सेशन कमिट केले होते त्यांजवर पुरावा न झाल्यामुळें सेशन जज्जसाहेबांनीं त्यांस सोडूनदिलें दुसरा खटला श्रीमंत तात्यासाहेब नातूंवर करून त्यासही सेशन कोर्टांत उभे केले होतें. पण

त्यांजवर आणलेला पुरावा फार कच्चा व बनावट दिसल्यामुळें त्यांस कोर्टानें सोडून दिलें. तिसरा खटला घोटवडेकर, भट, व रंगारी या तीन गृहस्थांवर करून तोही सेशनकोर्टापुढें नेला होता. त्यांतही पुराव्याच्या न्यूनतेमुळें न्यायमूर्ती जज्ज साहेबांनीं अरोपींस निर्दोषी ठरवून सोडून दिलें. एका बढायाच्या गणपतीची मूर्ती मुसलमानांनीं फोडली असून त्याजवरच खटला करून त्यास १८ महिन्यांची शिक्षा कँटोन्मेंट माजिस्ट्रेटांनीं दिली होती, पण अपिलांत निर्दोषी ठरून तो सुटला. याप्रमाणें पुण्यांतील तंट्याची समाप्ती झाली. सोलापूर शहरांतील हिंदूंचे एका देवालयांत भजन करीत असतां वाद्यें वाजलीं ह्मणून मुसलमानबांधवांचें पित्त खवळून ते तंटा करण्यास प्रवृत्त झाले. असे अनेक ठिकाणीं क्षुल्लक कारणांवरून तंटे उद्भवूं लागले. सर्व ठिकाणीं दंग्यास आरंभ बहुधा मुसलमानांकडून होतो असें बाहेर आलें आहे. आजवर जे तंटे झाले त्यांचें मूळ पाहिलें तर हिंदूंच्या मिरवणुकींत मुसलमानांच्या कबरस्थानाजवळ किंवा मशिदीजवळ हिंदूंनीं वाद्यें वाजविलीं अशा सबबी पुढें करून दंगे सुरू झाले. येवल्यास हिंदूंच्या देवळांत मांसाचे तुकडे टाकून रक्ताचे शिंतोडे दिले. त्याचप्रमाणें मुसलमानांच्या मशिदींत कोणी डुकर मारून टाकलें. असें निमित्त सांगून दंगे उसळले. मुंबईत आलीकडे एक लहानसा दंगा झाला. त्यास कारण एका आगरी जातीच्या हिंदु स्त्रियेचें प्रेत स्मशानांत नेतांना त्या प्रेतापुढें भजन करीत तें एका मशिदीवरून नेलें, एवढ्याच कारणावरून तेथें दंग्याची सुरवात झाली. तात्पर्य अती अल्प कारणें दाखवून मुसलमान बांधवांनींच बहुतेक

ठिकाणीं दंग्यास आरंभ केला असें दिसून येतें, ही गोष्ट ध्यानांत धरण्याजोगी आहे.

दंगे करणारे लोक तरी कोणत्या प्रकारचे असतात त्याचा बारीक विचार केला तर त्यांत बहुधा उद्योगी, व्यापारी, शहाणे, अब्रूदार व प्रतिष्ठित असे लोक प्रायः नसतात. दंगा माजविणारे लोक निरुद्योगी, आळशी, माथेफिरू, स्वच्छंदी, दरिद्री, व बेपर्वाईनें वागणारे असेच बहुतकरून असतात असें दिसून येतें. असले अज्ञानी व मूर्ख लोक दंग्यांत शिरून धुमाकूळ घालूं लागले ह्मणजे बेफाम होऊन मनःपूत वागून निर्धास्तपणें अनन्वित आचरणें करूं लागतात. अशा प्रसंगीं त्यांस उत्तेजन देणारे कळीचे नारद जवळ असले तर दंगे करणारांस शांत न करितां अधिक भर देऊन चढीस लावितात. यामुळें त्यांस जास्त चेव येऊन दांडगाई करण्याचें अधिकाधिक स्फुरण चढतें. अशा प्रकारें मत्त होऊन मुसलमान लोक हिंदूंवर घसरले ह्मणजे आपला बचाव करण्याकरितां हिंदु पळून जातात, किंवा दंग्याचे जागीं उभे राहून त्यांचा मार चुकविण्याचा प्रयत्न करितात. तथापि हिंदूंत साहस कमी, शांतता जास्त, आणि दुसऱ्या जिवास उपद्रव देण्यांत व कोणत्याही प्राण्याची हत्या करण्यांत महापातक आहे, अशी सर्वत्र दृढ समजूत असल्यामुळें ते नेटानें दांडगाईस प्रवृत्त न होतां बहुधा मागें सरतात, किंवा पळून जातात असें आढळून येतें. तथापि एका हातानें टाळी वाजत नाहीं. टाळी वाजण्यास अधिक उण्या प्रमाणानें तरी दोन्ही हातांचा उपयोग व संयोग होतो, तेव्हांच टाळीचा ध्वनि उमटतो हें कबूल आहे. दंगा उपस्थित करणारे व तो जास्त

माजविणारे लोक कोणत्याही जातीचे असले तरी दंगे करणारांस दंग्याच्या योगानें कांहीं लाभ होतो किंवा हानि होते हा विचार उभय पक्षांनींही केलाच पाहिजे. कारण आपण सदासर्वकाळ जे जे उद्योग करितों ते सगळे लाभाच्या आशेनें. आपण केलेल्या श्रमानें व उद्योगानें आपली हानि व्हावी असें कोणी इच्छित व चिंतित नाहीं. व तशा उद्देशानें कोणी उद्योगही करीत नाहीं. मनुष्य शहाणा असो किंवा अडाणी असो, आपल्या उद्योगानें हानि न होतां लाभच व्हावा अशी एकंदर मनुष्यमात्राची इच्छा असते, हें सर्वांस कबूल आहे. यास्तव आपणास ह्या दंग्याच्या उद्योगानें कोणता व किती लाभ होतो हें मुख्यत्वें शोधून तें दंगेखोरांचे पुढें ठेविलें पाहिजे, ह्मणजे त्यांचे डोळे चांगले उघडतील.

दुर्बळांचें राज्य हिरावून घेऊन आपल्यास लाभ करून घेण्याचे हेतूनें लोभी राजे मोठाल्या लढाया उभारतात. त्यांत क्वचित् प्रसंगीं जय मिळतो किंवा समयीं हानिही होते. पण एकंदरीनें पाहिलें असतां लढाईच्या योगानें दोन्ही पक्षांचा नाश फार होतो. तंट्याचे योगानें आजवर कोणाचें बरें झालें नाहीं असें इतिहास सांगतो. एखाद्या घरांत भावाभावांमध्यें तंटा माजला ह्मणजे तर दोघांचीही फार नुकसानी होऊन उभयतांत वैर वाढतें, असें पुष्कळ ठिकाणीं अनुभवास आलें आहे. कौरव आणि पांडव हे बांधव असून राज्याची वांटणी घेण्याच्या निमित्तानें एकमेकांशीं भांडून हातघाईवर आले. सामोपचारानें आपसांत तंटा मिटवावा ह्मणून शहाणे लोकांनीं मध्यस्ती करून पुष्कळ प्रयत्न व बोध केला, पण समजूत पडून तंटा मिटेना. यामुळें शेवटीं

दोन्ही पक्ष युद्धास प्रवृत्त झाले. एकीकडे पांडव आणि दुसरीकडे कौरव आपापलीं मोठालीं सैन्यें घेऊन रणांत आले, दोन्ही पक्षांकडे रणधीर शूर व युद्धकलानिपुण असे महान् पराक्रमी योद्धे येऊन लढण्यास उभे राहिले. दिल्ली शहराच्या आसपास 'कुरुक्षेत्र' या नांवानें प्रसिद्ध असें एक स्थळ आहे, तेथें १८ दिवस त्यांचें युद्ध झालें. त्यासच 'भारती युद्ध' असें ह्मणतात. उभयपक्षांकडील योद्धे जिवावर उदार होऊन मोठ्या निकरानें परस्परांशीं लढले. शेवटीं सत्यप्रिय पांडव ह्यांच्या पक्षाकडे कौरवांपेक्षां सैन्य सुमारें दीडपट कमी होतें तरी श्रीकृष्णकृपेनें त्यांचा जय झाला. तरी दोन्ही पक्षांचाही नाश फार झाला. युद्धार्थ रणांत आलेले बहुतेक लोक प्राणास मुकले. राहतांपैकीं नांव घेण्यासारखे पांडवपक्षाकडे सात, व कौरवपक्षाकडे तीन, मिळून दहा पुरुष जिवंत राहिले. त्या लढाईस दोन्ही पक्षांमिळून एकंदर १८ अक्षौहिणी ह्मणजे सुमारें ४० लक्ष सैन्य जमा झालें होतें. त्यांची तंम्याच्यापायीं राखरांगोळी झाली. ही कथा हिंदूंच्या महाभारत पुराणांत व पांडवप्रताप ग्रंथांत सविस्तर वर्णिली आहे. रावण तरी काय, केवढा पराक्रमी, शहाणा व संपत्तिमान्! त्या लंकाधीशानें आपल्या पराक्रमानें पृथ्वीवरील सर्व राजे जिंकून सगळी पृथ्वी पादाक्रांत केली. त्यानें इंद्रादि सर्व देवांचाही पराभव करून त्यांस आपल्या बंदिखान्यांत टाकिलें. आणि त्यांस आपलीं हलकीं व नीच कामेंही करण्यास लाविलें. अशाप्रकारें तो उन्मत्त व मदांध होऊन अनन्वित कर्मे करण्यास प्रवृत्त झाला. अयोध्यापती श्रीरामचंद्र पितृआज्ञेस्तव आपली पत्नी

सीतादेवी हिच्यासहित अरण्यवास भोगीत होता. सीतादेवी अत्यंत रूपवान असल्यामुळें तिला पाहतांच रावण मोहित झाला. आणि त्याच्या मनांत तिजविषयीं पापवासना उत्पन्न झाली. तो मोठा शहाणा व विद्वान असल्यामुळें त्यानें वेदांचीं खंडें केलीं. एवढा तो ज्ञानसंपन्न, पराक्रमी आणि संततीनें व संपत्तीनें परिपूर्ण होता तरी तो कामवासनेनें व्याप्त झाल्यामुळें अगदीं वेडा बनला. तेव्हां त्यानें कपटरूप धरून रामचंद्र आश्रमांत नसतां कपटानें सीतादेवीस हरण करून तिला लंकेंत नेऊन ठेविलें. परधनावर व परस्त्रीवर वांकडी नजर ठेवणारास परमेश्वर लौकर शासन करितो त्या न्यायानें परमेश्वरानें मनुष्यांच्या व वानरांच्या हातून त्या रावणदैत्याचा सर्वस्वीं नाश केला. त्याची संतति फारच मोठी होती, ती सर्व लयास जाऊन त्याचा अगदीं कुलक्षय झाला. त्याचा धाकटा भाऊ बिभीषण या नांवाचा होता तो ईश्वरभक्त असल्यामुळें तो मात्र वांचला. रावणाच्या पश्चात् लंकेचें राज्य बिभीषणासच मिळालें. ही कथा रामायण ग्रंथांत व रामविजयांत विस्तारानें कथन केली आहे. सारांश भांडणानें कोणाचेंही कल्याण होत नाहीं, नाशच होतो. ह्या कथा प्राचीनकाळच्या आहेत. पण आलीकडील काळाकडे पाहिलें तरी भांडणाचा परिणाम नाशकारकच झाला अशीं उदाहरणें पुष्कळ घडलीं आहेत.

दिल्लीच्या बादशाही तक्तावर जे राजे बसले त्यांत औरंगजेब या नांवाचा एक बादशहा होऊन गेला, तो मोठा शूर व प्रतापी होता. त्यानें आपल्या पराक्रमानें दक्षिणेस रामेश्वरापासून उत्तरेस हिमालयापर्यंत, व पूर्वेस ब्रह्मपुत्रनदापासून

तों पश्चिमेस सिंधुनदापर्यंत हिंदुस्थान देशाचा सर्व भाग जिंकून त्याचा तो सार्वभौम सत्ताधीश झाला. तो स्वभावानें फार क्रूर व जुलमी असल्यामुळें त्याचा दरारा फार असे. परधर्मांतले लोक जुलमानें बाटवून त्यांस मुसलमानी धर्मांत आणण्याची त्याला फार हांव सुटली. सगळ्या धर्मांमध्यें शुद्ध व पवित्र असा काय तो महंमदीधर्म, त्याखेरीज इतर सर्व धर्म झूट. अन्य धर्मानें वागून एकनिष्ठेनें कितीही उत्तमाचरण करीत असले तरी ते सगळे लोक काफर अशी त्याची समजूत असे. सर्व धर्म मोडून टाकावे, आणि त्या त्या धर्मानुयायी लोकांस युक्तीनें किंवा जुल्मजबरदस्तीनें बाटवून पवित्र अशा मुसलमानी धर्मांत आणावें अशी त्याची फार इच्छा असे. व ती इच्छा पूर्ण करण्याकरितां जेव्हां जेव्हां प्रसंग सांपडे तेव्हां तेव्हां तो तसाच सक्तीनें वागत असे. एखाद्या परधर्मी राजाशीं लढाई करून त्याचा पराभव झाला ह्मणजे त्या राजास व त्याच्या मुत्सद्यांस कैद करून आणिल्यावर त्यांस महमदी धर्माचा स्वीकार करण्याविषयीं आग्रह करी. त्याप्रमाणें मुसलमान होण्यास ते कबूल झाले तर ठीकच. पण त्यांनीं नाकारल्यास त्यांजवर जुल्म होत असे. कोणी मुसलमान होत नाहीं ह्मटल्यास औरंगजेब त्याचा शिरच्छेद करण्यास तयार होई. त्याचा शिरच्छेद करण्यास नागवी तरवार घेऊन मारेकरी गर्दन काटावयास सिद्ध झाल्यावर एका हातानें शेंडी धरून व दुसऱ्या हातानें शीर काटण्यास तरवार उभारून त्यास विचारी कीं 'अद्याप मुसलमान होण्यास कबूल होशील तर जिवदान मीळेल आणि नाहीं ह्मणशील तर तुझें गर्दन छाटतों.' अशाप्रकारें जिवावर बेतली ह्मणजे

भीरु असत ते मुसलमान होण्यास निरुपायामुळें कबूल होऊन आपला जीव वांचवीत, पण जे स्वधर्मनिष्ठ व पूर्ण दृढनिश्चयी असत ते न डगमगतां जिवावर उदार होऊन स्वधर्माची कास कदापि सोडीत नसत; अशा पुरुषांची कत्तल होई. शिवाजी महाराजांचा पुत्र संभाजी यास इसवी सन १६८९ मध्यें औरंगजेबानें संगमेश्वराहून कैद करून पुण्यानजीक तुळापूर ह्या गांवीं आपल्या छावणींत आणिलें. तेव्हां त्याला आपल्यासमोर आणवून त्यास वर सांगितल्याप्रमाणें शिरच्छेद करण्याच्या स्थलीं बसविल्यावर अगदीं शेवटीं औरंगजेबानें विचारिलें कीं, "बोल, मुसलमान होशील तर तुला जिवदान देतों, नाहीं ह्मणशील तर आतांच गर्दन काटून तुझा प्राण घेतों. बोल लौकर काय तें." हें ऐकून त्या धर्मनिष्ठ संभाजीनें उत्तर दिलें कीं, "प्राण गेला तरी मी हिंदूचा मुसलमान होणार नाहीं." असा खडखडीत जबाब दिल्यावर औरंगजेबानें संतापून लोखंडाच्या सळया टोंचून प्रथम त्याचे डोळे फोडले, नंतर बकऱ्याचे आंगावरचें कातडें काढतात, त्याप्रमाणें त्याच्या आंगाचें कातडें सोलून काढलें. आणि मग त्याच्या शरीराचा तो मांसल गोळा झळझळीत निखाऱ्यांच्या ढिगावर टाकून जळत असतां लोखंडी सळयांनीं ढोसढोसून त्याचा प्राण घेतला. अशा प्रकारें हालहाल करून संभाजीस मारिल्यावर त्याची बायको 'येसूबाई व मुलगा शाहू' ह्यांस कैद करून दिल्लीस नेऊन अटकेंत ठेविलें. पंजाबाकडील शीख लोकांवर देखील धर्मांतर करून मुसलमानी धर्मांत ओढून आणण्याकरितां त्यानें अनेक वेळां बहुत जुलूम केले. अशी धर्म-

वेडानें त्यानें बहुत धुमश्चक्री मांडल्यामुळें पुष्कळ लोक बिथरले. आणि त्याची जुलमी सत्ता फेंकून देऊन त्याचा सूड उगविण्यास जिवावर उदार होऊन सिद्ध झाले. त्यामुळें अनेक ठिकाणीं बंडें होऊन मुसलमान लोकांच्या सत्तेस कीड लागत चालली. असें होतां होतां दक्षिणेकडील हिंदुधर्मी मराठ्यांनीं मोठ्या जोरानें लढून त्याचा पुष्कळ मुलूख हिरावून घेतला. त्याचप्रमाणें पंजाबाकडील शीख लोक संतापून आपल्या पंथाची वृद्धि केली, आणि दिल्लीच्या पश्चिमेकडील मुसलमान लोकांच्या राज्यास ग्रहण लावून त्यांनीं पंजाबांत आपलें राज्य स्थापन केलें. याप्रमाणें दक्षिणेकडून मराठ्यांचा व पश्चिमेकडून शीख लोकांचा आवेशानें जोराचा मार बसतां बसतां मुसलमानी राज्याची सत्ता कमी कमी होऊन शेवटीं तें राज्य लयास गेलें. तात्पर्य, धर्माच्या दुराग्रहानें तंटे उपस्थित करून भांडणें केल्याचा इतका भयंकर परिणाम झाला!!! ही गोष्ट आलीकडील काळची ह्मणजे दीडशें दोनशें वर्षांची असून इतिहासप्रसिद्ध असल्यामुळें आमचे प्रियकर मुसलमान बांधव ती अद्याप विसरले नसतील.

आतां चालू शतकांतलें ताजें उदाहरण पहा. अयोध्येच्या नबाबाचें राज्य दक्षिणेंतील निजामसरकारच्या राज्यासारखें मोठें होतें. तें मुसलमान जातीच्या घराण्याकडे चालत असून त्याची राजधानी 'लखनौ' शहरीं असे. पुष्कळ वर्षें तें राज्य सुरळीत चाललें होतें. पण लखनौ शहरांत प्रसिद्ध रस्त्यावर हिंदु लोकांच्या मारुतीचें प्रसिद्ध देवालय होतें. त्याचप्रमाणें त्या रस्त्यावर मुसलमानी धर्माच्या मशिदी होत्या. हिंदु लोकांची एकादी मिरवणूक मशिदीजवळून वाजत

गाजत चालली ह्मणजे मुसलमान लोकांनीं पुढें सरसावून हिंदूंस मारपीट करावी, त्याचप्रमाणें मुसलमानांची मिरवणूक मारुतीच्या देवालयाजवळून वाजत गाजत चालली ह्मणजे त्यांस हिंदु लोकांनीं अडथळा करावा. अशा कारणानें हिंदु व मुसलमानांमध्यें तंटेबखेडे व मारामाऱ्या नेहमीं होत. व तेथील इंग्लिश रेसिडेंटाकडेही त्याबद्दल बोभाटे जात. त्यामुळें असल्या दांडगाव्याच्या खबरा रेसिडेंटाच्या मार्फतीनें गव्हरनर जनरल साहेबांपर्यंत पोंचत असत. असें होतां होतां लार्ड डलहौसी साहेबांच्या कारकीर्दींत सन १८५४।५५ सालच्या सुमारास मिरवणुकीच्या संबंधानें अशीच हिंदु व मुसलमानांमध्यें एक मोठी मारामारी झाली. नेहमींच्या चालीप्रमाणें तिची खबर रेसिडेंट साहेबांच्या द्वारें लाट गव्हर्नर जनरल साहेबांकडे जाऊन थडकली. तेव्हां त्या गोष्टीबद्दल लाट साहेबांच्या कौन्सिलांत बरीच वाटाघाट झाली. शेवटीं लाट साहेबांनीं असा ठराव केला कीं, "लखनौच्या नबाबास राज्य करितां येत नसल्यामुळें त्याच्या मुलखांतील प्रजेवर फार जुलूम होतो. तो बंद करून प्रजेस सुरक्षित ठेवणें हें इंग्रज सरकारचें कर्तव्य आहे. ह्मणून लखनौच्या नबाबास पदच्युत करून तें राज्य इंग्रज सरकारच्या राज्यास जोडावें, आणि नबाब साहेबांस खासगी खर्चाकरितां नेमणूक करून द्यावी." हा लाट साहेबांनीं केलेला ठराव अमलांत आणण्याकरितां बरोबर मोठी फौज देऊन कर्नल औटराम साहेबांची लखनौकडे रवानगी केली. त्याप्रमाणें कर्नल साहेब लखनौस जाऊन पोंचतांच प्रथम नबाब साहेबांस धरून मोठ्या बंदोबस्तानें कलकत्त्यास त्यांची रवानगी

केली. त्यानंतर लखनौचें राज्य आपल्या ताब्यांत घेऊन त्याची इंग्रजी रीतीप्रमाणें सर्व व्यवस्था लाविली. तात्पर्य, तंट्याच्या पायीं एवढालीं मोठीं राज्यें सुद्धां पाहतां पाहतां व हां हां ह्मणतां लयास जातात. ह्याचा दंगा करणारांनीं नीट विचार करावा. वेडेपणानें हट्टास पेटून उगीच्या उगीच आत्मघात करून घेऊं नये, हें हात जोडून मागणें आहे.

बंगाल इलाख्यांतील बंगाल, बहार व ओरिस्सया प्रांतांच्या नबाबाचें राज्य मुसलमान घराण्याकडे होतें. त्याची राजधानी मुर्शिदाबाद शहरीं होती. इ. स. १७५७ त प्लासीच्या लढाईंत क्लैवसाहेबानें नबाबसाहेबांच्या राणीस व जांवयास अनुकूल करून घेऊन नबाबाचा पराभव केला आणि तें राज्य इंग्रजी अमलास जोडलें. ही गोष्ट चमत्कारिक नव्हे का ?

कलह ह्मटला ह्मणजे तो वाईट, त्यांत गृहकलह हा तर अत्यंत घातक मानला आहे. कापसाच्या राशीमध्यें अग्नी पुरून ठेविला ह्मणजे तो केव्हां पेटेल, व किती नाश करील ह्याचा नेम नसतो. तद्वत् गृहकलहाची बारीकशी ठिणगी घरामध्यें धुमसत असली ह्मणजे ती केव्हां भडकेल आणि किती अनर्थ करील ह्याचा सुमार कोणास करतां येणार नाहीं. प्रत्यक्ष अग्नीसुद्धां एखादे वेळ पुरेल, कारण तो निर्जीव असल्यामुळें पेटलेल्या ठिकाणीं व त्याच्या आजुबाजूस त्याजवर खूब पाणी शिंपडलें किंवा त्याजवर बारीक रेती टाकून दाबली, अथवा ओल्या झाडाच्या पानांसहित डाहळ्यांनीं त्यास झोडपलें ह्मणजे तो जास्त न भडकतां लौकरच विझतो. हे उपाय शहरांत पाण्याचे बंब आणून आपण नेहमीं करतों, आणि पेटलेलीं घरें जास्त भडकूं न देतां अग्निनारायणापासून बचावतों. उष्णकाळामध्यें जं-

गलांत नेहमीं वणवे लागतात. तेथें बंब नसतात, व पाणीही दुर्मिळच असतें. तेव्हां तेथें झाडांच्या डहाळ्यांचा, रेतीचा, मातीचा व धुरळ्याचा उपयोग करून जंगली लोक अग्निनारायणाची शांति करतात, ह्मणूनच जंगलाचें रक्षण होतें, ही गोष्ट शहरवासी जनांस आश्चर्यकारक वाटेल. तथापि जंगली प्रदेशांत ह्याच उपायानें सर्व लोक मोठ्या भागावर पसरलेल्या अग्नीचा थोड्या माणसांनीं अल्प कालांत पूर्ण पराभव करून आपल्या रानाचें रक्षण करितात. असो. मोठ्या खेदाची गोष्ट ही आहे कीं, हा कलह एखाद्या कुटुंबांत, ग्रामांत, राज्यांत, किंवा जातींत शिरला ह्मणजे तो थोर थोर लोकांची अब्रू घेतो. राजांचीं राज्यें नाहींशीं करून धुळीस मिळवितो. कुबेरासारख्या मोठाल्या धनाढ्यास लुटून त्यांस भिकेस लावतो. व गरीबगुरिबांच्या कुटुंबाची वाताहत करून त्यांस देशोधडीस हाकून देतो. किंवा कारागृहांत पोंचवून त्यांची फटफजिती करतो. ह्या कलहाग्नीच्या तापानें ह्या दुनयेंत आजवर जितके अनर्थ घडले आहेत त्याच्या एक शतांश देखील प्रत्यक्ष अग्निनारायणाकडून घडले नाहींत. प्रत्यक्ष अग्नी एखाद्या ठिकाणीं कोपून कोणतीही वस्तु जाळूं लागला ह्मणजे तो साक्षात् दिसूं लागतो. पण हा कलहाग्नी इतका प्रखर असून तो अदृश्य असतो. तो कोठें व केव्हां भडकणार आणि त्याचा भडिमार किती दूर पल्ल्यावर जाऊन पोंचणार हें कोणास कांहीं कळत नाहीं, त्याचें कारस्थान अत्यंत गुप्त व अगम्य असतें, ह्याचें उदाहरण आपल्यास दाखवितों.

पहा—प्रत्यक्ष पेशव्याच्या घराण्यांत सदाशिवरावभाऊ

व राघोबादादा ह्यांच्यामध्यें सामान्य गोष्टी बोलतां बोलतां कलहाची ठिणगी शिरली. त्या योगानें नानासाहेब (बाळाजी बाजीराव तिसरा पेशवा) ह्याच्यासमक्ष त्या दोघांची थोडीशी बोलाचाली झाली. बाळाजी बाजीराव पेशव्याच्या कारकीर्दींत रघुनाथरावदादा सेनापती असे. व सदाशिवरावभाऊ (चिमाजी आपाचा पुत्र व बाळाजी बाजीराव पेशव्याचा व रघुनाथरावाचा सख्खा चुलत भाऊ) हा दिवाणगिरीचा कारभार करीत असे. यामुळें लढाईवर किंवा नवे मुलुख जिंकून घेण्याकरितां स्वारीस जाण्याचा प्रसंग आला तर रघुनाथरावास जावें लागे. राघोबादादा मोठा शूर, साहसी व पराक्रमी निपजला. त्याचा बाप पहिला बाजीराव हा मेल्यावर उत्तर हिंदुस्थानांतील सर्व स्वाऱ्यांवर रघुनाथरावच मुख्य सेनापती असे. त्यानें अनेक लढाया मारून शत्रूंस 'दे माय धरणी ठाय' असें करून सोडलें. उत्तर हिंदुस्थानांतील मोठा प्रदेश मराठ्यांच्या राज्यास त्यानेंच जोडला. पुष्कळ ठिकाणचे राजे जिंकून त्यांस आपले मांडलिक केलें. व त्यांजकडून खंडणीही येऊं लागली. उत्तर हिंदुस्थानांत राघोबादादाचा दरारा फार बसला. त्याणें काबूलच्या सरहद्दीपर्यंत जाऊन अटकेपर्यंत मराठ्यांचा अंमल बसविला. त्या वेळीं पंजाबांतील लाहोर शहर राघोबाच्या हातीं आलें. तें व त्या खालचा मुलूख संभाळण्याकरितां त्यानें तेथें आपला एक सुभेदारही ठेविला. एवढी मोठी मोहीम करून पुष्कळ मुलूख मिळविण्यास बहुत फौज ठेवावी लागली. ह्याला तीनचार वर्षें तिकडेसच राहवें लागलें द्रव्याचा खर्च फार लागला तो पुरा करण्यासाठीं कर्जही बरेंच झालें. वास्तविक पाहिलें अ-

सतां लढाईचे कामास आरंभ झाला ह्मणजे अतोनात खर्च करावा लागतो. तेथें अगोदर घरांत बसून केलेल्या अदमासाप्रमाणें चालतां येत नाहीं, यःकश्चित् कामाप्रीत्यर्थ हजारों रुपये खर्चावें लागतात. हें बाहेर हिंडणाऱ्या व प्रवास करणाऱ्या लोकांस अनेक वेळ कळून आलें आहे. घरांत चुलकोंबड्यासारखें बसून राघूसारखे बोलणारे बोलघेवडे असतात, त्यांना सांगितलें असतां खरें वाटत नाहीं. फार कशाला, आमचे राज्यकार्यधुरंधर, इंग्रज लोक मोठे शहाणे, जपून खर्च करणारे, पैपैपर्यंत हिशेब पाहणारे असे कुशल आहेत तरी लढाईचें तोंड लागलें ह्मणजे त्यांचीसुद्धां लढाईच्या खर्चापुढें मति मंद होते. ह्या लढाईच्या जगड्व्याळ खर्चापुढें तेसुद्धां अगदीं मेट्टयास येऊन हात टेंकतात. अबीसिनीयाची लहानशी लढाई झाली त्याप्रीत्यर्थ सात आठ कोटि रुपये गारत झाले. सन १८७७।७८ सालीं अफगाणिस्थानच्या शेरअल्ली अमीराशीं लढाई झाली त्यांत २०।२१ कोटि रुपयांचा फन्ना उडाला. सन १८९७ सालच्या बंडाची शांतता करण्याप्रीत्यर्थ ज्या लढाया झाल्या, त्यांत ५०।६० कोटि रुपये नवें कर्ज काढावें लागलें. असे शहाणे राज्यकर्ते जर ह्या लढाईच्या पायीं इतके जेरीस येतात तर रघुनाथरावास मागील अडचणीच्या व गैरसोईच्या काळांत फार खर्च लागला व कर्ज झालें तें गैरवाजवी नव्हतें. पण तें घरांत बसून गोष्टी सांगणाऱ्या सदाशिवरावभाऊंस कोठून कळणार? त्याला वाटलें कीं रघुनाथरावानें जरी मोठा प्रदेश जिंकून पेशव्यांच्या राज्यास जोडला, तरी खर्चाचें धोरण त्यास नीट ठेवितां आलें नाहीं. ह्मणूनच कर्ज झालें, असा

त्याचा ग्रह झाला. एके दिवशीं शनवारचे वाड्यांत सर्व मंडळी भोजनास बसली असतां पंक्तींत बोलतां बोलतां सहज स्वारींतल्या गोष्टी निघाल्या, तेव्हां "मी दोन तीन वर्षांत अमुक अमुक लढाया मारल्या, अमके अमके राजे जिंकले, अमुक राजांवर खंडणी बसविली, व अमका अमका प्रदेश आपल्या राज्यास नवा जोडला" इ. हकीकत रघुनाथरावानें सांगितली. ती ऐकून घरांत बसून चुरचुर बोलणारा सदाशिवराव यानें रघुनाथरावास असा प्रश्न केला कीं, दादा, ह्या मोठमोठ्या बहादुरीच्या गोष्टी तुह्मी सांगतां, त्याप्रमाणें तिकडून कांहीं पैका मिळवून आणलात का ! कीं कांहीं कर्जाचेंच ओझें डोक्यावर घेऊन आलां. तेवढें सांगा ह्मणजे तुमची बहादुरी काय ती कळेल. हें ऐकून रघुनाथरावानें सांगितलें कीं, आज दोन तीन वर्षें अनेक ठिकाणीं पुष्कळ लढायांचे प्रसंग आल्यानें खर्च अतिशय लागला. त्यामुळें ऐनजिन्नस द्रव्य बराबर आणतां आलें नाहीं, कांहीं कर्जच झालें आहे. पण मोठा मुल्ख मिळविला आहे; व खंडणीही बरीच बसविली आहे, त्याचें उत्पन्न दरसाल येणार आहे. त्या उत्पन्नांतून लौकरच कर्ज फिटेल, व पुढें बिनखर्ची आपल्यास बरीच मोठी रकम दरसाल मिळूं लागेल. हें रघुनाथरावाचें बोलणें ऐकून सदाशिवरावानें राघोबास शाबासकी द्यावयाची ती न देतां, उलट त्याची निर्भत्सनाच केली. तो ह्मणाला कीं, "बाहेर जाणारे लोक पराक्रमानें घरीं येतांना कांहीं कमाई करून आणतात, असा संप्रदाय आहे, पण तुह्मी कमाई न आणतां कर्जाचें टोपलें डोक्यावर घेऊन आलां. तेव्हां हा आंतबट्ट्याचा रोजगार नाहीं का झाला ?" तेव्हां रघुनाथरावास ह्या टोंचून बोललेल्या सदाशिवरावाच्या

भाषणाचा राग आला आणि तो ह्मणाला कीं, लढाईचे कामांत बाहेर काय काय अडचणी येतात हें घरांत बसणाऱ्या तुमच्या-सारख्या लोकांस काय समजणार? पण एवढ्यानें कांहीं झालें नाहीं. यापुढें स्वारीस जाण्याचा प्रसंग येईल तेव्हां तुह्मीच जा, आणि शहाणपणानें काय कमाई करून आणतां ती दाखवा ह्मणजे झालें. याप्रमाणें उभयतांची खडाजंगी उडाली. तेव्हां नानासाहेब ( बाळाजी बाजीराव पेशवा ) मध्यें पडून त्यानें दोघांस उपदेशाच्या चार गोष्टी सांगून शांत केलें. तेव्हांपासून रघुनाथराव व सदाशिवरावभाऊ ह्यांचीं मनें जरा परस्परांच्या विरुद्ध झालीं. नंतर लौकरच हैदराबादच्या निजामावर स्वारी करण्याचा प्रसंग आला, तेव्हां त्या लढाईवर जाण्याचें रघुनाथरावानें नाकारलें. ह्मणून सेनाधिपत्य स्वीकारून त्या मोहिमेवर सदाशिवराव गेला. तेथें सुदैवानें अल्पकालांत सदाशिवरावास जय मिळून लढाईचा खर्च, चौथाई, सरदेश-मुखी, व साहोत्रा ह्या हक्कांची निजामावर चढलेली बाकी निजा-मानें पेशव्यास देण्याचें कबूल करून तह केला. तेव्हां अर्थां-तच सदाशिवरावभाऊ फुरफुरला, आणि पुण्यास आल्यावर रघुनाथरावाला लक्षून त्याचा हिरमोड करण्याच्या हेतूनें मोठ्या गर्वानें बोलला कीं, "कां दादा, आह्मी अल्पकालांत लढाईंत जय मिळवून कर्ज न करितां पैका घेऊन आलों कीं नाहीं पहा. नाहींतर तुह्मी कोट्यावधि रुपये कर्ज करून र र करीत घरीं आलां तसें तर नाहींना झालें?" हें सदाशिव-रावाचें गर्वोक्तीचें व खोंचून बोललेलें भाषण ऐकून रघुनाथ-राव आपल्या मनांत खजिल होऊन उगीच बसला. यामुळें सदाशिवरावास फार आनंद होऊन स्वर्ग दोन बोटें राहिला

असें वाटून तो आपल्या शहाणपणाच्या घमेंडींत फुगून तुंद झाला. पण ईश्वराची करणी कांहीं विचित्र असते. त्याप्रमाणें थोडक्याच काळांत पंजाबावर ठेवलेल्या सुभेदारास मुसलमानांनीं हांकून लावलें, आणि त्याच्या ताब्यांतला पेशव्यांचा मुलूख त्याजकडून हिसकून घेतला, अशी खबर पुण्याचे दरबारीं येऊन धडकली. त्यामुळें अर्थातच तिकडे स्वारी करण्याचा प्रसंग आला. तेव्हां सदाशिवराव गर्वानें फुगलाच होता, तो डौलानें बाळाजी बाजीराव पेशव्यास ह्मणाला कीं, ह्या स्वारीवर मी व विश्वासराव जातों. रघुनाथरावाला येथेंच ठेवून घ्या. आणि माझें दिवाणगिरीचें काम त्याचे हातून घ्या ह्मणजे झालें. ह्या ह्मणण्यास बाळाजी बाजीरावानें रुकार दिला. त्यावरून सदाशिवरावानें मोठी कडेकोट तयारी केली. त्यानें आपल्या स्वारीबरोबर मोठा इतमामी सरंजाम घेतला. दरबाराकरितां एक मोठा भरजरी तंबू तयार करविला. त्याचप्रमाणें इतर सामानही पोक्त व मोठ्या भपकेदार डामडौलाचें घेतलें. स्वारींबराबर पुष्कळ बायकापोरें घेतलीं. त्याचप्रमाणें खोगीरभरती बाजारबुणगेंही फार घेतलें. त्याला वाटलें कीं, मुसलमान लोकांस मी हां हां ह्मणतां जिंकीन. व राघोबापेक्षां मोठा पराक्रम करून कर्ज न करितां पुष्कळ धनदौलत पुण्यास घेऊन येईन. अशा मनोराज्यांत दंग होऊन मोठ्या उत्साहानें पुष्कळ फौज घेऊन तो हिंदुस्थानाकडे स्वारी करण्यास चालता झाला. त्या बापड्याला लढाईचें मर्म काय ठाऊक? जसें कोणाकडे डौलानें मेजवानीस जावयाचें तसेंच हिंदुस्थानच्या मोहिमेवर जायचें असा त्याचा समज होता. 'जोंवरी पाहिलें नाहीं पंचानना, तोंवरि

जंबूक करी गर्जना.' ह्या वाक्याप्रमाणें सदाशिवराव मोठ्या घमेंडीनें बुंदेलखंडापर्यंत आला. शिंदे, होळकर, भोंसले इत्यादिकांस त्यानें अगोदरच निमंत्रणें पाठविलीं होतीं. त्याप्रमाणें तेही वाटेंत त्याला येऊन मिळाले. सदाशिवरावाच्या स्वारीबरोबर बाजारबुणग्यांतले जेवतेगण फार असल्यामुळें दररोज शिधासामुग्री व घासदाण्याचा खर्च फार लागे. व पुढें पुढें तर चंदीवैरण व शिधासामुग्री मिळण्याचीही पंचाईत पडूं लागली. व जवळची द्रव्याची पुंजीही सरत आली. तेव्हां सागरास गोविंदपंत बुंदेले, पन्याच्या छत्रसाल राजानें पहिले बाजीरावास दिलेल्या मुलखावर पेशव्यांकडील सुभेदार होता, त्याजकडून बरीच मोठी रकम घेतली. आणि त्याला सैन्यासहित आपल्या बरोबर घेऊन पुढें चालते झाले. ते एवढ्या मोठ्या सैन्यानिशीं व बाजारबुणग्यासारख्या भोजनभाऊ लटंबरासहित दिल्लीस जाऊन पोंचले. तों जवळचें द्रव्य अगदीं सरल्यामुळें खर्चाची पंचाईत पडूं लागली. स्वारीबरोबर मल्हारजी होळकर होता, तो पहिल्या बाजीरावाबरोबर अनेक स्वाऱ्यांत गेलेला होता. व रघुनाथरावाच्याही बराबर पुष्कळ मोहिमींवर जात असल्यामुळें लढाईचे कामांत व तत्संबंधीं सर्व व्यवस्थेंत तरबेज झाला असल्यामुळें त्यानें सदाशिवरावास फार उत्तम मसलत सुचविली. तो ह्मणाला कीं, आपणास लढाईवर जाणें आहे. तेथें कोणत्या वेळेस कसा प्रसंग येईल याचा नेम नाहीं. याकरितां मोठाल्या जड तोफा, बाजारबुणगें, व बायकापोरें हीं बराबर घेऊं नका. त्यांना पाठीमागें लावून सुरक्षित ठिकाणीं ठेवावयाची मी तजवीज करतों ह्मणजे आ-

पला खर्च कमी होईल. आणि प्रसंगीं मागें हटण्याची किंवा पळण्याची वेळ आली तर आपणास ह्या लटंबरास संभाळण्याची अडचणही पडणार नाहीं. हें कृपा करून ऐका. मी बाजीरावाचा शिष्या असल्यामुळें अनेक लढाया पाहिल्या आहेत. मी वृद्ध झालों तरी मला पक्कें स्मरत आहे कीं, बाजीराव साहेबांनीं १९।२० स्वाऱ्या हिंदुस्थानांत केल्या. व रघुनाथराव दादासाहेबांनीं तर अटकेपर्यंत मराठ्यांचे झेंडे नाचविले. अटकनदीचें पाणी आमच्या मराठ्यांच्या घोड्यांस पाजलें, तें कशाच्या बळावर ह्मणाल तर ह्या खाबू बाजारबुणग्यांच्या नादीं न लागतां केवळ सडेस्वारानिशीं निःसीम, शूर, व लढवय्ये लोक मात्र बरोबर होते, ह्मणून तें यश संपादन करतां आलें. आतांसारखा फुकटखाऊ माणसांचा घोटाळा बरोबर असता तर कांहीं झालें नसतें. पहा, विचार करा. खऱ्या लढाईचा प्रसंग पुढेंच आहे, तो केव्हां येईल हा नेम नाहीं. तो येईपर्यंत ह्या परमुलखीं आपणांस रहावें लागेल. लढाई झुंपल्यावर तरी किती दिवस चालेल हा तरी काय नेम आहे ? ह्याकरितां आपल्या लढाऊ सैन्यास पुरण्याजोगी भरपूर सामुग्री आपले जवळ असली पाहिजे. त्याचप्रमाणें खजिनाही मोठा पाहिजे. असलेलें सामान व पैका ह्या रिकामटवळ्या लोकांनीं खाऊन संपविला तर शिपायांस मग खुराक कोठून देतां देईल ? आतांच ह्या जगड्व्याळ खर्चामुळें आपल्या जवळची रोकड संपत आली आहे, व खाण्याचें सामान व चंदीवैरण दुर्मिळ होण्याचा रंग दिसत आहे. ह्याकरितां माझ्या विनंतीचा अव्हेर न करितां ह्या बाजारबुणग्या वगैरे लोकांस मी सांगतों त्या ठिकाणीं परत जाऊं द्या. मी

त्यांची सर्व प्रकारें चांगली सोय करीन. त्यांस कांहीं उणें पडूं देणार नाहीं. हे लोक परतले ह्मणजे आपण आजुबाजूस सरकण्यास मोकळे होऊं. मग शत्रूंस अनेक हुलकावण्या दाखवून त्यांचीं हाडें मोडण्यास सुलभ पडेल. इत्यादि अनेक प्रकारें मल्हारजी होळकरानें सदाशिवरावभाऊंस विनवणी करून सांगितलें. पण होणारासारखी बुद्धि. सदाशिवरावभाऊनें त्या पोक्त व लढाईंत कसलेल्या शूर मुत्सदी पुरुषाचें ह्मणणें मनास न आणतां उलट त्याचीच निर्भर्त्सना केली. त्याला सदाशिवराव ह्मणाला "तुह्मी धनगर, तुह्मांला काय समजतें? हें मेंढ्या राखण्याचें काम नव्हे." अशा उपमर्दाचें भाषण ऐकून मल्हारजी चुप बसला. करतो काय, सदाशिवराव लढाईच्या कामास नालायख आहे हें पूर्णपणें तो जाणत होता, तरी तो यजमान असल्यामुळें त्याच्यापुढें जास्त बोलतां येईना. "दैवस्य चित्रा गतिः" ह्या वाक्याप्रमाणें सदाशिवरावभाऊ वेडेचार करूं लागला. त्याप्रमाणें त्यांस लौकर फळेंही येऊं लागलीं. जवळचा खजिना अगदीं संपला. त्याची भर करण्याकरितां त्यानें दिल्लीस कित्येक अनन्वित कृत्यें करून पोक्त, जुन्या, व दूरदर्शी लोकांचीं मनें दुखविलीं. त्यामुळें तो सर्वांच्या मर्जीतून उतरला. पुढें तो सोनपतास गेला तेथें आपल्या बराबरच्या फालतु लोकांस राहण्याकरितां जी जागा योजिली होती, तिच्या सभोंवतीं मोठा रुंद व पुष्कळ खोल खंदक खणून त्याच्या आंत त्यानें बाजारबुणगें व फालतु लोक वगैरेस ठेविलें. आंत जाण्यायेण्यासाठीं खंदकावर लांकडी फळ्यांचा पूल केला होता. अशाप्रकारें बंदोबस्तानें कांहीं दिवस तो तेथें राहिला, पण जवळचा खजिना सरला; व खाण्याचें सामान अगदीं

खल्लास झालें. तेव्हां आतां लौकर लढाई सुरू करून काय होईल तें होऊं द्यावें, अथवा अन्नावांचून उपाशीं मरावें अशी वेळ आली. तेव्हां निरुपायास्तव मुसलमान शत्रूंशीं लढाई सुरू केली. तेव्हां प्रथम कांहीं वेळ जय मिळण्याचीं चिन्हें दिसत होतीं. पण मुसलमान लोकही मोठ्या आवेशानें लढूं लागले. तेव्हां मराठ्यांच्या सैन्यानें कच खाऊन किंचित मागें पाय घेतला. हें पाहून विश्वासराव ऐन गर्दींत शिरला. त्यास गोळी लागून तो पडला. अशी खबर कळतांच सदाशिवराव घोड्यावर बसून मोठ्या आवेशानें लढाईच्या ऐन गर्दींत जाऊं लागला. त्यास शिंदे व होळकर हे अशा गर्दींत तुह्मी जातीनें जाऊं नका, जरा मागेंच राहून सैन्यास धीर देत रहा ह्मणजे बरें पडेल. असें अती आग्रहानें सांगत असतां त्यांचें न ऐकतां तो आपला हेका करून ऐन गर्दींत घुसला. आपल्या सैन्यास उत्तेजन येण्यासाठीं भिऊं नका, मारा, तोडा, इत्यादि मोठ्या जोरानें ओरडून सूचना देत देत जो पुढें गेला तो दिसेनासा झाला. विश्वासराव पडून मरणोन्मुख झाल्यामुळें त्यास रणांतून उचलून मागें आणल्यामुळें लढाईंत झुंजणाऱ्या लोकांचें धैर्य खचलेंच होतें, त्यावर सदाशिवरावाचाही पत्ता लागेनासा झाल्यामुळें मराठ्यांच्या सैन्यांत एकच हाहाकार झाला. हें पाहून शत्रूंनीं मोठ्या निकरानें जोराचा मारा सुरू केला. त्यामुळें मराठ्यांच्या सैन्याचा मोड होऊन तें पळूं लागलें. हें पाहतांच त्यांनीं पाठलाग सुरू केला, तेव्हां जो भयंकर परिणाम झाला तो प्रसिद्धच आहे. त्यांत शिंद्याचे अनेक खासे पुरुष, इब्राहिमखान गार्दी, सागरच्या राजघराण्याचे मूळपुरुष गोविंदपंत बुंदेले, इत्यादि अनेक पुरु-

षांची व लढाईंत लढणाऱ्या शूर पुरुषांपैकीं जे हातीं लागले त्या सर्व लोकांची शत्रूंनीं कत्तल केली. आणिं मराठ्यांकडील बाजारबुणगें, व बायकापोरें जेवढीं शत्रूंस सांपडलीं त्या सर्व पुरुषांस गुलाम केले, व बायकांस दासी केल्या. याप्रमाणें सोनपतच्या लढाईचा परिणाम झाला. लढाईंतून निघून जे कांहीं थोडे लोक पळत होते, त्यांचा पाठलाग शत्रूंचे स्वारांनीं करून त्यांतील बहुतेकांचे भाले टोंचून प्राण घेतले, आणि त्यांच्या मारांतून जे कांहीं फारच अल्प लोक निसटले, ते भीक मागत अत्यंत संकटानें पुण्यास रडत आले. त्या लढाईंत १ लक्ष लोकांची प्राणहानि झाली. व हजारों महाराष्ट्रमनुष्यें दास व दासी झालीं!!!

ही लढाईची अत्यंत दुःखकारक वार्ता ऐकून बाळाजी बाजीराव पेशव्याची कंबर खचली. या लढाईचेपायीं पेशव्यांकडील दोन अडीच लाख मनुष्यांचा व कोट्यावधि रुपये किंमतीच्या मालमत्तेचा नाश झाला. बाळाजी पेशव्याचा वडील मुलगा विश्वासराव, व चुलतबंधु सदाशिवरावभाऊ, हे पेशव्यांच्या कुळांतले खासे पुरुष ठार झाले. त्याचप्रमाणें मोठाले प्रतापी, शूरवीर, व रणधीर पुरुषांचा नाश झाला. तेणेंकरून बाळाजी बाजीराव पेशव्यास अत्यंत दुःख झालें. त्यानें सर्व ऐषआराम व राज्योपभोगांचा त्याग केला. त्यानें आपला राहता शनवारचा वाडाही सोडला. आणि उदासवृत्तीनें पर्वतीवर जाऊन आयुष्याचे दिवस अति दुःखानें तो कंठूं लागला. त्यास कांहीं गोड लागेना, व स्वस्थ झोंपही येईना. तो चिंताग्रस्त होऊन दिवसेंदिवस क्षीण होऊन अगदीं थकत चालला. असें होतां

होतां तो सहा महिन्यांत मरण पावला. सोनपतच्या लढाईवर दक्षिणेंतील महाराष्ट्र लोकांचाच भरणा फार होता. त्या सर्वांची प्राणहानि झाल्यामुळें सगळा महाराष्ट्र देश एकदोन वर्षें रडत होता, तशांत नानासाहेब (बाळाजी बाजीराव) मेल्यामुळें अधिकच कल्होळ झाला. ह्या सोनपतच्या लढाईमुळें मराठ्यांच्या सत्तेस व शहाणपणास धक्का बसून जो कमीपणा आला, तो शेवटपर्यंत कधीं भरून आलाच नाहीं. गृहकलहानें केवढा नाश होतो, व धक्का बसतो, हें यावरून लक्षांत येईल. बाळाजी बाजीराव मरण पावल्यावर त्याचा पुत्र माधवराव बल्लाळ हा पेशवाईच्या गादीवर बसला. तेव्हां तो अल्पवयी केवळ १६।१७ वर्षांचा होता. या कारणानें पेशवाईचा सगळा कारभार रघुनाथराव करीत असे. माधवरावाचा व रघुनाथरावाचा स्वभाव भिन्न असल्यामुळें त्या दोघांचें पटेनासें झालें. शिवाय निजामाशीं चाललेल्या लढाईंत रघुनाथरावाच्या हातून मोठी चूक झाल्यामुळें त्याजकडील कारभार माधवरावानें काढून घेतला. आणि शनवारवाड्याचे दक्षिणेस (हल्लीं बिनिवाल्याचा वाडा आहे त्या जाग्यावर) खासगीवाल्याचा वाडा होता त्यांत रघुनाथरावास नजरकैदेंत ठेविलें. माधवराव अल्पवयी होता, तथापि जात्या मोठा शूर, बुद्धिमान्, न्यायी, दूरदृष्टी, दृढनिश्चयी, उद्योगी व प्रजापालक होता. त्याच्या कारकीर्दींत रयतेवरील वेंठबेगार बंद झाली. न्यायनिष्ठुरता वाढली. मोठे विद्वान व न्यायी असे प्रसिद्ध जे रामशास्त्री प्रभुणे माहुलीकर, यांस न्यायाधीश नेमिल्यामुळें प्रजेस उत्तम न्याय मिळूं लागला; पण महाराष्ट्र लोकांच्या दुर्दैवामुळें माधवरावासारखें रत्न त्यांस फार दिवस लाभलें

नाहीं. त्यास क्षयाची भावना झाली. त्याचा जोर होतां होतां शेवटीं त्यानें ११ वर्षें पेशवाईचें राज्य करून आपल्या वयाच्या २८ व्या वर्षी पुण्यापासून १० मैलांवर थेऊर मुक्कामीं देह ठेविला. असला बहुगुणसंपन्न व प्रजापालक प्रभु भर उमेदींत मरण पावल्यामुळें पेशव्यांच्या सर्व प्रजेस फार खेद झाला. सर्व लोक फार हळहळले. त्याची पत्नी साध्वी रमाबाई ही सती गेली. माधवरावास पुत्र नसल्यामुळें त्याचा धाकटा भाऊ नारायणराव यास पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं. नारायणराव हा अल्पवयी व साधा पुरुष होता. ह्मणून माधवरावानें आपल्या मरणकालीं आपल्या चुलत्यास (राघोबादादास) बोलावून आणिलें, आणि पदर पसरून सांगितलें कीं, दादा, नारायणराव लहान असून फार साधाभोळा आहे, याकरितां आतां आपण मागील गोष्टी मनांत न आणतां कृपा करून मोकळ्या मनानें नारायणरावाचा सांभाळ करा. तुह्मी पोक्त, आह्मांस वडील व बहुतकाळ पेशवाईच्या राज्याचे आधारस्तंभ आहांच. यास्तव मनांत कोणताहि किंतु न ठेवितां ईश्वरास स्मरून हा राज्यशकट चालवा. इत्यादि अनेक प्रकारें राघोबाची विनवणी करून नारायणरावाचा हात दादासाहेबांच्या हातांत दिला, आणि पुनः बोलला, दादा, नारायणरावाला अंतर न देतां त्याचा सर्वस्वीं सांभाळ करा, असें ह्मणून त्यानें प्राण सोडला. माधवरावाचें उत्तरकार्य झाल्यावर सर्व मंडळी पुण्यास आली. नंतर चालीप्रमाणें नारायणरावास सातारच्या राजाकडून पेशवाईचीं वस्त्रें मिळून नारायणराव पेशव्यांच्या गादीवर बसला. आणि लागलीच त्या भोळ्या नारायणरावानें राघोबाची कैदेंतून मोकळीक करून त्यास आपल्या शेजारीं शनवारच्याच वाड्यांत

पगार आतांचेआतां द्या असा बहाणा करून मोठ्यानें आरडत नारायणरावावर वार करण्यास सरसावला. हें पहातांच दगा आहे असें समजून आपला प्राण वांचविण्याकरितां जवळच्याच खोलींत राघोबा पूजा करीत बसला होता त्याकडे जाऊन दीन मुद्रेनें "दादा, मला वांचवा" असें ह्मणून नारायणरावानें त्याला मिठी घातली. पण जिवावर उदार झालेला सुमेरसिंग त्याचे मागें होताच. त्यानें राघोबाला साफ सांगितलें कीं, तूं ह्याला सोडणार नाहींस तर तुलाही मारतों. असें ऐकतांच राघोबानें नारायणरावाला पलीकडे लोटून आपण शेजारच्या गच्चीवर निघून गेला. राघोबाच्या बसण्याच्या खोलींत त्यांची पूजेची गाय होती तिच्या पोटाखालीं नारायणराव प्राणरक्षणार्थ जाऊन पालथा पडला हें पाहून त्याचा स्वामिभक्त हुजऱ्या चापाजी टिळेकर जवळ होता त्यानें मालकाचा प्राण वांचावा ह्मणून तो जलदी करून नारायणरावाच्या पाठीवर जाऊन पालथा पडला! इतकें झालें तरी त्या दुष्ट राक्षसानें मोठ्या जोरानें त्या बिचाऱ्या गाईवर वार केला त्या योगानें ती गाय, चापाजी टिळेकर व नारायणराव ह्या तिघांच्याही शरीरांचे तुकडे झाले. नंतर आणखी वार करून त्या सर्वांचे जीव घेतले. काय भयंकर कृत्य हें!!! 'स्त्रीबुद्धिः प्रलयंगतः' ह्या वाक्याप्रमाणें त्या दुष्ट आनंदीबाईच्या कृतीनें हा एवढा अनर्थ झाला. ही ब[illegible]मी हां हां ह्मणतां सगळ्या शहरांत पसरली, ते[illegible]हा काय पुसतां जिकडे तिकडे एकच हाहाकार उडाला. शनवारच्या वाड्याजवळ अतिशय गर्दी झाली. पण दरवाज्यास आंतून कडी असल्यामुळें वाड्यांत कोणाचा प्रवेश होईना. तेव्हां मानाजी

फाकड्यानें मोठ्यानें ओरडून सांगितलें कीं, लौकर दरवाजा उघडा नाहीं तर दरवाजा फोडतों. असें बोलून दरवाजा फोडण्यास सुरवात केली. तेव्हां कोणी दरवाजा उघडला. मग प्रमुख मंडळी आंत शिरून प्रथम मारेकऱ्यांस पकडलें, आणि मग नारायणरावाचा खून झाला असें दृष्टीस पडलें. पण करतात काय? त्यांचा अगदीं निरुपाय झाला. नंतर नारायणरावाच्या प्रेतास दहन करण्याकरितां स्मशानांत नेलें. तो सर्व विधि आटपल्यावर आणि नारायणरावाचें क्रियाकर्म संपल्यावर नारायणरावास पुत्र नसल्यामुळें राघोबा पेशव्यांच्या गादीवर बसला. राघोबानें हें घोर कृत्य केलेलें पाहून सर्वांच्या डोळ्यांत तो खुपूं लागला. पुढें कांहीं दिवसांनीं नारायणरावाची बायको गंगाबाई ही गरोदर आहे असें समजलें. तेव्हां जुन्या मुत्सदी मंडळीस कांहीं धीर आला. राघोबादादा गादीवर बसल्यावर टिपुसुलतानाशीं लढाई करण्याचा लौकरच प्रसंग आला. त्या मोहिमीवर जातीनें जाण्याचा राघोबानें निश्चय करून तयारी झाल्यावर तो कर्नाटकाकडे वळला. मग राघोबा पुण्यांत नाहीं अशी संधी पाहून जुन्या अमदानींतल्या कारभारी मंडळीनें राघोबाच्या विरुद्ध राज्यकारस्थान उभारण्याची गुप्त मसलत केली. तिचा बेतबात ठरल्यावर प्रथम नारायणरावाची बायको गंगाबाई गरोदर होती तिला युक्तीनें शनवारच्या वाड्याबाहेर काढून मेण्यांत बसवून लागलीच रातोरात तिला नेऊन पुरंदर किल्ल्यावर मोठ्या बंदोबस्तानें ठेविलें. नंतर कांहीं सैन्य जमवून त्याजवर हरिपंत फडके यांस मुख्य सेनापती नेमून दादासाहेबाचा पाठलाग करण्यास पाठविलें.

हरिपंताला चांगली मसलत देण्याकरितां त्याच्याबरोबर परशुराम भाऊ पटवर्धन व त्रिंबकराव मामा पेठे यांसही दिलें. नंतर हरिपंतानें जलदी करून राघोबादादास कोल्हापुरानजीक गांठिलें. आणि दादासाहेबाबराबर जी फौज होती त्यांतील मुख्य मुख्य पागे, पथकें, वगैरे लोकांस युक्तीनें वश करून फडक्यानें त्यास आपल्या गोटांत आणिलें. तेव्हां कांहीं तरी फितुरीचा दगा आहे, असें राघोबास वाटून तो फिका पडला. कारण दररोज थोडेंबहुत सैन्य दादाला सोडून परत जाई, व हरिपंतास मिळे. अशी त्याला बातमी लागली तेव्हां तर त्याचें धाबें दणाणलें. शेवटीं आपल्याकडील पुष्कळ सैन्य कमी झालें असें पाहून दुर्बल होत चालल्यामुळें टिपूवर जाण्याचा त्यानें आपला बेत रहित केला. आणि आपल्या स्वारीचा पंढरपुराकडे मोर्चा फिरविला, तरी त्याच्या पाठीवर हरिपंत फडक्याचा शह होताच. त्या वाटेमध्यें सांगोलें गांवाजवळ दादांच्या व हरिपंताच्या फौजेचा सामना झाला. त्या वेळीं परशुरामभाऊच्या जिवावर बेतली होती, पण शेरताटीच्या आश्रयानें त्याचा बचाव झाला. दादा पंढरपुरास दाखल झाल्यावर पंढरपुरापासून ३।४ मैलांवर कांसेगांव नांवाचें एक गांव आहे तेथें पुनः दोन्हीं सैन्यांची खडाजंगी झाली. त्यांत त्रिंबकरावमामा पेठ्यास वर्मी गोळी लागल्यामुळें त्रिंबकराव मरण पावला. पंढरपुरास कांहीं दिवस राहून दादानें कुच केलें. आणि तो होळकर, शिंदे, व रणजितसिंग यांजकडे मदत मिळविण्याच्या हेतूनें गेला. पण त्यास कोणाकडूनही मदत मिळाली नाहीं. हा त्याचा प्रयत्न फसल्यामुळें निरुपाय होऊन शेवटीं तो सुरतेस गेला, आणि इंग्रजाच्या आश्रयास

राहिला. इतक्यांत पुरंदर किल्ल्यावर गंगाबाई प्रसूत होऊन तिला पुत्र झाला. त्यामुळें राज्यकारस्थान रचणाऱ्या मुत्सदी मंडळीस व जुन्या पक्षाकडील सर्व लोकांस परमानंद होऊन, त्यांनीं फार मोठा उत्सव केला. पुत्राचें नांव सवाई माधवराव असें ठेविलें. माधवराव नारायण याचे नांवें पेशवाईच्या सनदा, शिक्कामोर्तब, आणि पेशवाईचीं वस्त्रें सातारचे राजाकडून आणून मोठ्या आनंदानें सवाई माधवरावास पेशव्यांच्या गादीवर बसविलें. माधवराव लहान बालक असल्यामुळें पेशवाईचा सर्व कारभार सखारामबापू व इतर प्रमुख मुत्सदी मंडळीच्या विचारानें बाळाजी जनार्दन भानू ( नाना फडणवीस ) हे करूं लागले. सवाई माधवराव २।३ वर्षांच्या वयाचे होण्याच्या सुमारास इंग्रजांनीं रघुनाथरावास मदत देण्याचें कबूल करून फौजेनिशीं पुण्यावर स्वारी करण्यासाठीं त्यास पाठविलें. त्याप्रमाणें तो मुंबईहून निघून बोरघाटच्या रस्त्यानें सह्याद्रिपर्वत चढून पुण्याच्या नजीक सुमारें २० मैलांवर वडगांवीं आला. तेथें रघुनाथरावाकडील फौजेस सवाई माधवरावाच्या सैन्यानें गांठलें. तेव्हां उभयपक्षांची मोठी लढाई झाली. त्यांत रघुनाथरावाकडील फौजेचा पूर्ण पराभव झाल्यामुळें इंग्रजांनीं रघुनाथरावाचा पक्ष सोडून त्याला पेशव्यांच्या स्वाधीन केलें. आणि आपलें सर्व सैन्य परत मुंबईस नेलें. याप्रमाणें रघुनाथरावाच्या सर्व कारस्थानाचा शेवट झाला. ठीकच आहे. अनर्घ्यराघव नाटकांत एके ठिकाणीं ह्मटलें आहे, त्याचें तात्पर्य. आर्या—

न्यायें वागे त्यातें होति पशु-पक्षिही सहाकारी ॥
जातां अपथें सोडी, बंधूही त्रासुनि मनीं भारी ॥

रघुनाथरावास पेशव्यांच्या स्वाधीन करतेवेळेस इंग्रजांनीं सांगितलें होतें कीं, "रघुनाथरावाच्या मर्जीस येईल त्या ठिकाणीं त्याला ठेवून त्याच्या खासगी खर्चास पुरेशी नेमणूक करून द्यावी." त्याप्रमाणें दादाला विचारितां त्यानें अहमदनगर जिल्ह्यांतील कोपरगांव येथें गोदावरी नदीच्या तीरीं राहण्याची इच्छा दर्शविल्याप्रमाणें त्याला तेथें राहण्याची परवानगी देऊन त्याच्या खर्चास पुरेशी मोठी नक्त नेमणूक करून दिली. त्याप्रमाणें रघुनाथराव स्नानसंध्या करीत अखेरपर्यंत तेथेंच राहिला. रघुनाथरावास फार दिवस संतति न झाल्यामुळें त्यानें एक दत्तक घेतला होता. त्याचें नांव अमृतराव असें ठेविलें, पण त्यानंतर कांहीं कालानें त्याला लागोपाठ दोन पुत्र झाले. त्यांमध्यें बाजीराव वडील आणि चिमाजीआपा धाकटा होता. रघुनाथराव वृद्ध होऊन वारल्यावर त्याच्या दोन्ही पुत्रांस जुन्नराजवळील शिवनेरी किल्ल्यांत नेऊन ठेविलें. सवाई माधवरावाची कारकीर्द २१ वर्षें चालली. तेवढ्या काळांत पेशव्यांचें राज्य सुरळीत चाललें. उत्तर हिंदुस्थानांत महादजी शिंद्यानें मराठ्यांचा पुष्कळ दरारा बसवून दिल्लीदरबारांत सुद्धां मराठ्यांचें मोठें वजन वाढविलें. दिल्लीदरबारांतून वजीरीचीं वस्त्रें व नालकी आणून तीं मोठ्या समारंभानें महादजीबावानें सवाई माधवरावास दिल्लीपतीच्या तर्फे अर्पण केलीं. एक वेळ हैदराबादच्या निजामाच्या दरबारांत मशीर उल्मुल्क नांवाचा वजीर असतां त्यानें पेशव्यांच्या दरबाराची थट्टा करून सोंगें आणिलीं अशी खबर पेशव्यांच्या वकिलानें लिहून कळवितांच निजामावर स्वारी करण्याचें ठरून खर्ड्यांच्या मुक्कामीं पेशवा व

निजाम यांचें युद्ध झालें. त्या लढाईवर सवाई माधवराव पेशवे व नाना फडणवीस हे जातीनें गेले होते. त्या लढाईंत निजामाकडील पक्षाचा पूर्ण पराभव झाल्यामुळें निजाम जेरीस येऊन त्यानें तहाचें बोलणें लाविलें. त्या तहामध्यें उन्मत्त-पणानें पेशव्यांचीं सोंगें आणविणारा जो मशीर उल्मुल्क त्यास पेशव्यांच्या स्वाधीन करून लढाईचा खर्च पेशव्यांस निजामानें द्यावा असें ठरलें. येणेंप्रमाणें ही मोहीम आटोप-ल्यानंतर पेशवेसरकारची स्वारी मोठ्या आनंदानें पुण्यास परत आली. एकंदरीनें सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत पेशव्यांच्या राज्यावर कोणत्याही प्रकारचें संकट आलें नाहीं. सवाई मा-धवरावाच्या सुदैवानें नाना फडणवीस उत्तम शहाणा कार-भारी मिळाल्यामुळें मराठ्यांचा राज्यशकट सुयंत्र चालला होता. पण 'दैवस्य चित्रागतिः' ह्या वाक्याप्रमाणें सवाई मा-धवरावास अनिष्ट ग्रह आल्यामुळें दैवयोग प्रतिकूळ होऊन त्यास चित्तभ्रम झाला. आणि त्यायोगानें त्यानें शनवारच्या वाड्यांतील तिसऱ्या मजल्यावरून एकाएकीं चौकांत उडी टाकिली. ती हौदांतील कारंजावर पडल्यामुळें माधवरावास फार मोठी दुखापत झाली. त्याच वेदनेनें व्याकुळ होऊन सवाई माधवरावाचा अंत झाला. त्या वेळीं एवढा शहाणा नाना फडणवीस होता तरी तो चुकला. त्यामुळें मराठी राज्यवैभवास तो सर्वस्वीं मुकला. सवाई माधवरावास पुत्र नसल्यामुळें आतां पेशव्यांच्या गादीवर कोणाला बसवावें ही त्यास चिंता प्राप्त झाली. माधवरावानें उडी टाकल्या-वर तो २।३ दिवस जिवंत होता, तेव्हांच त्याच्या मांडी-वर दत्तक द्यायला पाहिजे होता, पण आकस्मिक आलेल्या

संकटामुळें नाना फडणवीस घाबरला. ह्मणून माधवराव जिवंत असतां त्याच्या मांडीवर दत्तक देण्याची फार जरूर आहे, ही कल्पना त्याला सुचली नाहीं. होणारासारखी बुद्धि होते त्याला तो काय करतो? पुढें माधवराव मरण पावल्यावर दत्तक घेण्याची किती आवश्यकता होती हें नानाच्या ध्यानांत आलें. पण ती योग्य वेळ निघून गेल्यामुळें नानाचा निरुपाय झाला. आतां पुढें काय करावें हा नानास मोठा घोर लागला. पण माधवरावाच्या सुतकांत कांहींच करतां येईना ह्मणून मृताचें उत्तरकार्य संपल्यावर नानानें दरबारची त्या वेळीं असलेली मुत्सदी मंडळी आपलीशी करून त्यानें माधवरावाच्या चौदाव्या दिवशीं शनवारच्या वाड्यांत मोठा दरबार भरविला. दौलतराव शिंदा आपल्या मोठ्या फौजेनिशीं त्या वेळीं पुण्यांत होता, त्याचा सासरा सर्जेराव घाटगा हा शिंद्याचा कारभार पाहत असे. दौलतराव शिंदा अल्पवयी असल्यामुळें त्याजकडे बाजीरावानें गुप्तपणें बाळोजी कुंजराच्या द्वारें 'मला पेशव्यांच्या गादीवर बसवाल तर मी तुह्मांस दोन कोट रुपये देईन' असें बोलणें लाविलें. तें द्रव्यलोभानें मोहित होऊन शिंद्यानें कबूल केलें. महादजीच्या वेळेपासून नाना फडणविसाचें शिंद्याशीं वांकडें असल्यामुळें तो दंश शिंद्याचे मनांत आधींपासून होताच, तशांत सवाई माधवराव मेल्यामुळें व बाजीरावाकडील मोठें आमिष आयतेंच पुढें आल्यामुळें शिंदा अगदीं भाळला. आणि त्यायोगानें नानाचा सूड उगविण्यास तो सिद्ध झाला. दौलतराव शिंदा पुण्यांत असल्यामुळें दरबारांत येण्याचें निमंत्रण करणें भाग पडलें,

ह्मणून नानानें त्याला दरबारास बोलाविलें. ठरलेल्यावेळीं सर्व मंडळी शनवारच्या वाड्यांतील दरबारी दिवाणखान्यांत येऊन आपापल्या जागीं बसली. दौलतराव शिंदे आणि सर्जेराव हेही येऊन दाखल झाले. तेव्हां कामास आरंभ झाला. नाना फडणविसांनीं प्रथम असा उपक्रम केला कीं कैलासवासी शिवाजी महाराजांनीं प्रथमारंभीं मोठें साहस व पराक्रम करून मराठ्यांचें राज्य महाराष्ट्रांत स्थापन केलें. त्यांच्या पश्चात् संभाजी महाराजांच्या अव्यवस्थितपणामुळें राज्यावर मोठें संकट गुदरून १७।१८ वर्षें त्याला ग्रहण लागलें होतें. पण त्याचा शाहू महाराजाच्या विनयवृत्तीनें व सौजन्याच्या वागणुकीनें मोक्ष होऊन पुनः साताऱ्यास मराठ्यांची गादी स्थापित झाली. त्यास कै० बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव, व बाळाजी बाजीराव पेशवे यांनीं साह्य होऊन अत्यंत राजनिष्ठेनें मराठ्यांच्या गादीची सेवा केल्यामुळें मराठ्यांच्या राज्याचा विस्तार वाढला. त्यानंतर थोरले माधवराव साहेबांनींही आपल्या शहाणपणा[illegible], नीतीनें, व प्रामाणिकपणानें यथान्याय वागून पेशव्यांच्या गादीचें महत्व सोनपतच्या लढाईमुळें जरी कमी झालें होतें तरी पुनः पूर्ववत् त्याची महती वाढविली. पण आपल्या सर्वांच्या दुर्दैवामुळें ते अल्पायु होऊन मरण पावल्यावर नारायणराव साहेबांस पेशव्यांची गादी मिळाली. पण त्यांचे चुलते राघोबादादा ह्यांस राज्यलोभ उत्पन्न होऊन त्यांनीं सुमेरसिंगाच्या हातून नारायणरावाचा खून करविला, हें सर्व आपण जाणतच आहां. त्या वेळीं मृत पेशव्याच्या घराण्यांतला कोणी पुरुष नसल्यामुळें राघोबादादांनीं पेशव्याची गादी बळकावून जुन्या कारकीर्दींतल्या मुख्य मुख्य लोकांची व

मातुश्री गंगाबाईची अगदीं धूळधाणी करण्याचा घाट बनवून आणिला होता, परंतु परमेश्वरास राघोबाचा कृतघ्नपणा खपला नाहीं, ह्मणूनच गंगाबाईसाहेब गरोदर होत्या त्या प्रसूत होऊन पुत्ररत्न प्रसवल्यामुळें पुनः बाळाजी बाजीराव पेशव्याच्या वंशाकडे गादीचा अधिकार आला. त्या वेळीं काय काय संकटें आलीं, व त्यांचा परिहार करण्यास कोणकोणते गुप्त प्रयत्न करावे लागले हें जाणणारे आजच्या दरबारांत कांहीं गृहस्थ आहेत त्यांस ती वेळ आठवत असेलच. 'सत्यमेव जयते' ह्या वाक्याप्रमाणें सत्याचा जय होऊन असत्याचा पराभव झाला. आणि राघोबादादांनीं पेशव्यांच्या गादीवर जें मोठें काहूर उभारलें होतें तें सर्व विरघळून त्यांस पेशव्यांच्या गादीवरील पुरुषाच्या अंकित होऊन रहावें लागलें. कै० नारायणरावसाहेबांचे पुत्र सवाई माधवरावसाहेब जन्मल्यापासून त्यांच्या सुदैवानें मरणकालापर्यंत पेशव्यांच्या गादीवर कोणतेंही संकट आलें नाहीं. त्यांच्याच भाग्यानें आमचे कै० महादजीबावा शिंद्यांसारखे पराक्रमी शूर पुरुष पेशव्यांच्या राजघराण्याचे मुख्य स्तंभ असल्यामुळें त्यांनीं उत्तर हिंदुस्थानांत मोठाले पराक्रम करून दिल्लीच्या बादशाही दरबारांत देखील मराठ्यांच्या गादीचें मोठें महत्व वाढविलें. हें तर सर्व जाणतच आहेत. पण त्या वेळचेच आपण असून आज किती संकटांत पडलों आहों हें सांगण्याची गरज नाहीं. आमचे रणधीर, शूर व मोठे मुत्सदी महादजीबावा शिंदे हे अगोदरच स्वर्गारोहण करण्यास चालते झाले. आणि त्यांच्या मागून आपले पेशव्याच्या गादीचे स्वामी सवाई माधवरावसाहेब आकस्मिक रीतीनें तिसऱ्या मजल्यावरून खालच्या चौकांतील हौदांतल्या कारं-

ज्यावर पडल्यामुळें त्यांस फार मोठी दुखापत झाली. त्यांस पुत्र नाहीं ह्मणून ते २।३ दिवस जिवंत असतां त्यांच्या मांडीवर दत्तपुत्र देऊन त्याला पेशव्यांच्या गादीवर बसविणें अत्यंत इष्ट होतें. व ही गोष्ट अनेक वेळ पेशव्यांच्या गादीचे हितचिंतकांच्या मनांतही आली होती. तथापि सवाई माधवराव साहेब अगदीं तरुण २१ वर्षांच्या वयाचे असून ते परमेश्वरकृपेनें जगतील अशी सर्वांस उमेद वाटत होती, त्यामुळें तसली अशुभ गोष्ट ते जिवंत असतां कोणाच्यानें बोलवेना. ह्मणूनच आजचा हा प्रसंग सर्वांस विचार करण्याकरितां योजिला आहे. कदाचित् कोणी ह्मणतील कीं, पहिल्या बाजीरावसाहेबांचे नातू ह्मणजे रघुनाथराव दादासाहेबांचे पुत्र बाजीरावसाहेब व चिमाजीआपा हे हयात असून बरेच मोठे झालेले आहेत, त्यांपैकीं बाजीरावसाहेब ज्येष्ठ असल्यामुळें त्यांस पेशव्यांच्या गादीवर बसवावें ह्मणजे झालें. ही गोष्ट मला माहीत आहे. व त्याला विशेष अपवाद किंवा दुर्निवार अडचणी नसत्या तर तसें करणें ओघानें व हक्कानें आपण सर्वांनीं मोठ्या आनंदानें केलें असतें. पण आपल्या दुर्दैवानें तसें करण्यास फार अडचणी आहेत त्याही विदित करतों. बाजीरावाचे वडील रघुनाथरावदादा व मातुश्री आनंदीबाई यांस आपण जाणतच आहां. थोरले माधवरावसाहेब थेऊर मुक्कामीं अगदीं मरणोन्मुख झाले त्या वेळीं राघोबादादांस त्यांनीं पुण्याहून मुद्दाम थेउरास बोलावून नेलें. आणि दादास पदर पसरून व हात जोडून सांगितलें कीं, दादा, आतां मी अगदीं थोड्या वेळाचा सोबती असल्यामुळें विनवून सांगतों कीं, माझ्या पाठीमागें

नारायणरावास पेशवाईच्या गादीवर बसवालच. पण तो अजून लहान आहे. त्याचा स्वभाव भोळा असल्यामुळें त्यास डावपेंच कळणार नाहींत. राज्य ह्मटलें ह्मणजे त्याजवर अनेक शत्रूंचा डोळा असतो. जरा न्यून पडलें कीं, ते लागलीच त्याजवर कावळ्यासारखी झडप घालून त्याच्या आंगाचे तुकडे तोडण्यास टपलेलेच असतात. त्यांचें युक्तीनें व शहाणपणानें निवारण करून त्यांवर मोठी जरब रहावी असें करणें फार कठीण आहे, हें आपण पूर्णपणें जाणतच आहां. पेशव्यांच्या गादीचें मोठें महत्व आपणच वाढविलें. शत्रूंचीं हाडें मोडून त्यांस आपणच नरम करून सोडलें. दिल्लीस मोठी जरब बसविली. आणि त्याच्याही पलीकडे अफगाणिस्थानच्या सरहद्दीपर्यंत जाऊन तेथें मराठ्यांचा भगवा झेंडा आपणच उभारलात. मराठी फौजेच्या घोड्यांस अटक नदीचें पाणी आपणच पाजलेंत. असलें शौर्य, एवढा पराक्रम, व दीर्घकाळपर्यंत श्रम करून आपण मराठ्यांच्या राज्याचा विस्तार वाढविलात, हें मला ठाऊक आहे. पण आज असा प्रसंग आला आहे कीं, नारायणराव गादीवर बसणार त्याला हें कर्म काय ठाऊक? त्याला राज्यकारभाराचा चांगला अनुभव येऊन राज्यकार्यधुरंधरपणा येण्यास बरींच वर्षें लागतील. यास्तव आपण मागें होऊन गेलेल्या सर्व गोष्टी विसरून आमच्या नारायणाचें पुत्रवत् पालन करा. आतां आपल्या घराण्यांत तरी काय, तो तुह्माला, आणि तुह्मी त्याला आहांत, यास्तव कोणताही किंतु पोटांत न बाळगतां ह्या पेशव्यांच्या गादीचें आपण रक्षण करा. आपण सरळपणानें वागून नारायणावर प्रेमाची पाखर घालाल तर उभयतांचेंही कल्याण

होईल, व मराठ्यांच्या राज्याचा लौकिक व वैभव वाढेल. ह्मणून शेवटीं विनंती करतों कीं, आपण नारायणास अंतर देऊं नका, हें पुनः पदर पसरून मागणें मागतों, त्याची मला भिक्षा द्या. असें माधवरावसाहेबांचें शेवटचें भाषण ऐकून दादासाहेबांनीं तें सर्व मान्य केलें. आणि तें निष्कपट आहे असें दाखविण्याकरितां त्यांनीं श्रीशंकरावरील बिल्वपत्रही उचलून दिलें. त्यावरून माधवराव साहेबांची खात्री होऊन लागलीच त्यांनीं नारायणरावाचा हात धरून तो दादांच्या हातांत दिला. नंतर माधवरावसाहेब लौकरच शांत झाले. त्यांची पत्नी रमाबाईसाहेब ह्या सती गेल्या. त्यांचें उत्तरकार्य झाल्यावर नारायणरावसाहेब यांस पेशवाईचीं वस्त्रें मिळून ते पेशव्यांच्या गादीवर बसले. नंतर थोडक्याच दिवसांनीं दादासाहेबांनीं नारायणरावाचा सुमेरसिंगाच्या हस्तें खून करविला, हें आपण जाणतच आहां. अशा निर्दयपणानें आपल्या सख्ख्या पुतण्याचा घात करणारे जे रघुनाथरावदादा त्यांचेच पुत्र बाजीरावसाहेब व चिमाजीआपा होत. हें एक कारण, व दुसरें कारण असें आहे कीं, बाजीरावसाहेबांची जन्मपत्रिका व कुंडली चांगल्या ज्योतिषी लोकांस दाखवून त्यांचे ग्रह राज्यावर बसण्यास कसे आहेत, हें विचारिलें. त्यावरून त्यांनीं त्या पत्रिकेचें चांगलें परीक्षण करून सांगितलें कीं, 'बाजीराव पेशव्यांच्या गादीवर बसल्यास त्याच्या हातून पेशव्यांची गादी समूळ नष्ट होऊन मराठ्यांचें राज्य बुडेल.' असे त्याचे जन्मकाळचे ग्रह आहेत. यास्तव या कारणाचाही आपणास नीट विचार केला पाहिजे. आपण सर्व मराठ्यांच्या

गादीचे हितचिंतक व रक्षक असल्यामुळें बाजीरावसाहेबांस पेशव्यांच्या गादीवर बसविणें इष्ट किंवा अनिष्ट आहे हें जाणून काय करणें तेंच केलें पाहिजे. बाजीरावसाहेब पेशव्यांच्या वंशांतले औरस पुरुष आहेत ह्मणून त्यांस गादीवर बसविलें पाहिजे असा आग्रह धरणें युक्त नाहीं. तर पेशव्यांची गादी कायम राहून तिला बळकटी कशी येईल हेंच मुख्यत्वेंकरून पाहिलें पाहिजे. त्या दृष्टीनें पाहिलें तर बाजीरावसाहेब पेशव्यांच्या गादीवर बसण्यास नालायक दिसतात. ह्मणून त्यांस वर्ज करून पेशव्यांच्या गादीवर बसण्यास सर्व प्रकारांनीं जो पुरुष योग्य ठरेल त्यास कै० सवाई माधवराव साहेबांच्या पत्नीच्या मांडीवर दत्तक देऊन त्याला पेशव्यांच्या गादीवर बसवावें. आणि त्याचें सर्वांनीं मनोभावानें साह्य करून मराठ्यांच्या गादीचें रक्षण करावें अशी माझी सर्वांस विनंती आहे. पेशव्यांच्या कुळांतली औरस संतति असतां त्यांस सोडून दुसऱ्या परक्या कुळांतला पुरुष आणून पेशव्यांच्या गादीवर बसविण्याची ही नवी चाल कां पाडावी ? असा कोणी आक्षेप घेतील त्यांच्या समजुतीकरतां मागील पन्नास साठ वर्षांचा मराठी राज्यांतला दाखला आमचे परमपूज्य जे कै० शाहू छत्रपती महाराज यांचाच दाखवितों तो पहावा, ह्मणजे आज जें आपण करणार तें अनुचित नसून मागल्या वहिवाटीप्रमाणेंच हें कृत्य आहे, त्याहून अगदीं भिन्न नाहीं, असें दिसून येईल. शाहू छत्रपती महाराज हे सन १७४९ सालीं मरणोन्मुख झाले, तेव्हां त्यांस पुत्र नसून आतां आपल्या मराठ्यांच्या गादीवर कोणास बसविलें असतां मराठ्यांच्या गादीचें संरक्षण होईल, हा विचार त्यांच्या मनांत येऊन ते असा पुरुष

कोण आहे हें पाहूं लागले. परंतु मराठ्यांचे गादीचें रक्षण करण्याजोगा लायक पुरुष त्यांच्या लक्षांत येईना. तेव्हां त्यांनीं फार पोक्त विचारानें दूर दृष्टी देऊन असा विचार केला कीं, नालायक अशा मनुष्याच्या हातीं ही मराठ्यांच्या राज्याची सत्ता देऊन आपण देह ठेवून गेल्यास हें राज्य बुडेल. याकरितां माझ्या वंशाचें नांव कायम राहण्याकरितां कोणी तरी मराठ्यांच्या कुलांतला पुरुष आपण दत्तक घ्यावा, आणि आपलें नांव त्याच्या योगानें कायम राहील असें करावें. पण मराठी राज्य चालविण्याचा पूर्ण अधिकार पेशव्यांच्या कुळांतील बाजीराव बल्लाळ पेशव्यांचे पुत्र हल्लीं बाळाजी बाजीराव हे आपले पंतप्रधान असून ते मोठे पराक्रमी आणि राजनिष्ठ आहेत, त्यांच्याच हवालीं राज्याचीं सर्व सूत्रें करावीं, हेंच मराठ्यांच्या गादीचें संरक्षण करण्यास उत्कृष्ट साधन आहे. असें समजून त्यांनीं मोठ्या उदारबुद्धीनें बाळाजी बाजीराव पेशव्यास आपल्याजवळ बोलावून त्यास मराठ्यांच्या गादीचें संरक्षण करण्याचा बोध करून आपली शिक्केकटार व मोर्तब बाळाजीपंताच्या हवालीं केलीं, आणि त्यास माझ्या दत्तकाचा व त्याच्या पुढील वंशाचाही मानमरातब माझ्याप्रमाणेंच राखीत जा; अशी आज्ञा करून त्यास पुढील सर्व व्यवस्था करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें लागलीच त्यांनीं सुचविलेल्या पुरुषास महाराजांच्या मांडीवर दत्तक देऊन तें काम पुरें केलें. नंतर लौकरच शाहूमहाराज शांत झाले. त्यांच्या पत्नीनें सहगमन केलें. पुढें महाराजांच्या दत्तकाच्या खर्चास योग्य नेमणूक देऊन त्यांचा मानमरातब पूर्ववत् ठेवून महाराजांच्या आज्ञे-

प्रमाणें बाळाजी बाजीराव सर्व राज्यकारभार आपूमुखत्यारीनें करूं लागले, ती वहीवाट आजपर्यंत अव्याहत चालली आहे. प्रत्यक्ष शाहूमहाराजांनीं मराठे जातीचा वृथाभिमान न धरितां केवळ मराठ्यांच्या गादीचा अभिमान मनांत बाळगून परजातीचे ब्राह्मण बाळाजी बाजीराव पेशवे यांचे हवालीं आपल्या मराठ्यांच्या गादीची पूर्ण सत्ता दिली. तेंच तत्व या वेळीं आपण मनांत धरून वागलों तर आपल्याकडे कोणत्याही प्रकारें दोष येणार नाहीं. शाहूमहाराजांचेंच आपण अनुकरण केलें असेंच होणार आहे. हें सर्व मनांत वागवून मी सर्वांस पुनः विनंती करून सांगतों कीं वर सांगितलेल्या कारणांवरून बाजीरावसाहेब किंवा चिमाजीआपा हे दोघेही पेशव्यांच्या गादीवर बसविण्यास निरुपयोगी आहेत, ह्मणून दुसरा एखादा सुलक्षणी पुरुष ज्याचे योग पेशव्यांच्या गादीवर बसण्यास अनुकूळ असतील असा पाहून त्याला कै० माधवराव पेशव्यांच्या पत्नीच्या मांडीवर दत्तक देऊन हें मराठ्यांचें राज्य चालवावें, असें मी सुचवितों. याप्रमाणें नाना फडणविसांनीं फार उपयुक्त व अनेक सुविचारांनीं परिपूरित असें भाषण करून जमलेल्या दरबारी मंडळीस मत विचारिलें, त्यावरून पुष्कळ थोर थोर मुत्सद्यांनीं नानाचे ह्मणण्यास रुकार देऊन आपली संमति दिली. परंतु पेशव्यांच्या गादीवर अनिष्ट ग्रहांची वक्रदृष्टी झाल्यामुळें ते नानाफडणविसाचें शहाणपण कसें चालूं देणार? त्यांनीं ती नानाची सयुक्तिक मसलत हाणून पाडण्याकरितां दौलतराव शिंद्याच्या अंगांत संचार करून त्यास पुढें करून त्याच्या तोंडून असें वदविलें कीं, "पेशव्यांच्या

कुळांत औरस पुरुषसंतति असून दुसऱ्या कुळांतला पुरुष जर तुह्मी पेशव्यांच्या गादीवर बसवाल तर त्याला आह्मी मुजरा करणार नाहीं." असा खडखडित जबाब देऊन नानाफडणविसाची अत्यंत शहाणपणाची व बिकट प्रसंगास योग्य अशी मसलत होती ती हाणून पाडल्यार दौलतराव शिंदा लागलाच उठून आपल्या गोटांत चालता झाला. शिंदा फौजबंद पुण्यांत असल्यामुळें त्याच्या मताविरुद्ध वागण्याची नानास छाती होईना. यामुळें त्याचा अगदीं निरुपाय झाला. बाजीरावास गादीवर बसविण्याच्या संबंधानें बाळोजी कुंजराच्या मार्फतीनें शिंद्याशीं चाललेल्या मसलती, कारस्थानें व बाजीरावानें शिंद्यास देऊं केलेलें द्रव्याचें मोठें आमिष पाहून शिंदा त्यास भाळला. ह्या सर्व गोष्टी नानाफडणविसास गुप्तपणें आधींच कळल्या होत्या. त्यावरून शिंदा बाजीरावास पेशव्यांच्या गादीवर खास बसविणार अशी नानाची पक्की खात्री झाली. तेव्हां नानानें असा विचार केला कीं, दत्तक घेण्याची आपण केलेली मसलत फसली, ती सिद्धीस जात नाहीं. आणि बाजीरावास पेशव्यांच्या गादीवर बसविण्याचें यश शिंदा घेणार. त्यामुळें आपण दोहींकडूनही फसले जाणार, त्यापेक्षां आतां बाजीरावास गादीवर बसविण्याचें यश तरी कां घालवावें ? आपणच बाजीरावाला गादीवर बसविणें हेंच आतां करणें युक्त आहे. असा पोक्त विचार करून त्यानें लागलीच परशुराम भाऊ पटवर्धन यांस शिवनेरच्या किल्ल्यावर पाठवून बाजीरावास पुण्यास आणविलें. आणि मग मोठ्या सन्मानानें सुमुहूर्तावर बाजीरावास पेशव्यांच्या गादीवर बसविलें. बाजीराव

गादीवर बसल्यावर १।२ वर्षें नाना फडणवीस त्याचा कारभारी होता. पण बाजीरावाचा स्वभाव मोठा संशयी व अविश्वासु असल्यामुळें त्याचें नाना फडणविसाशीं जमेना. शेवटीं शिंद्याकडून नानास कैद करवून अहमदनगरच्या किल्ल्यांत ठेविलें. इतकें झाल्यावर शिंद्यांनीं दोन कोट रुपयांचा बाजीरावास तगादा लाविला. त्या रकमेची फेड करण्याकरितां अनेक प्रकारें पैका जमा करण्याचा बाजीरावानें झपाटा चालविला. त्या गर्दींत बहुत लोकांचे सरंजाम इनामगांव जमिनी वगैरे उत्पन्नें विनाकारण जप्त केलीं. त्यामुळें बाजीरावास बहुत लोक प्रतिकूळ होत चालले. शिवाय राज्यकारभाराकडे व प्रजापालनाकडे लक्ष न देतां खासगी शिल्लक वाढविण्याचा बाजीरावास फार नाद लागला. तो पुरा करण्याकरितां आपल्या पदरच्या जाहगीरदार वगैरे फौजबंद लोकांचे सरंजाम व नेमणुका तो भडाभड हिसकून घेऊं लागला. त्या योगानें त्याचा फौजफांटा कमी कमी होऊन त्याच्या जवळ शहाण्या, अनुभवी, इमानी, खानदानी व पोक्त अशा मनुष्यांचा दुष्काळ पडूं लागला. आणि त्यांच्या बदला शागिर्दपेशे, हुजरे व पाणके अशा हलक्या लोकांचा भरणा वाढत जाऊन त्यांची त्याजवळ चहा होऊं लागली. तेव्हां अर्थातच ते हलके व नीच लोक मालकाच्या हिताहिताची पर्वा न करतां मर्जीमाफक बोलून होस हो देऊं लागले. अशा रीतीनें बाजीरावशाहींत अव्यवस्था माजत चालल्यामुळें पेशवाईतील जुन्या खानदानीच्या पिढीजाद इमानी लोकांची वाताहत झाली. शिवाय बाजीरावाची खासगी वर्तणूकही फार निंद्य असल्यामुळें त्याला त्याच्या राज्यांतले सर्व लोक

पाण्यांत पाहूं लागले. शेवटीं शिंदे, होळकर, गाइकवाड, नागपूरकर भोसले, आणि पटवर्धनादि थोरथोर सरदार व फौजबंद लोकांनीं त्रासून बाजीरावाचा संबंध तोडला, त्यामुळें तो अगदीं निराश्रित पडला. याप्रमाणें त्याचें आपसांतील सर्व लोकांशीं वैर वाढलें. असें असतां गायकवाडाकडून हिशेब समजून देण्यास इंग्रज सरकारच्या शिफारसीनें आलेल्या गंगाधर शास्त्री पटवर्धनाचा त्रिंबकजी डेंगळ्याच्या द्वारें बाजीरावानें पंढरपुरास खून करविला. अशा अनेक प्रकारें दुष्कृत्यांची कमाल करून शेवटीं आपल्या दोस्त इंग्रजसरकाराशीं सन १८१८ सालीं बाजीरावानें युद्ध आरंभिलें. त्यांत बाजीरावाचा पूर्ण पराभव होऊन तो पुणें शहर सोडून दिव्याच्या घाटानें पळत सुटला. त्याचा पाठलाग करीत इंग्रजी फौज मागें लागली. बाजीराव पळत पळत बऱ्हाणपुरच्या पलीकडे चांदणी रेलवे स्टेशनानजीक अशीरगड नांवाचा मोठा पहाडी किल्ला सातपुड्यांत आहे, त्याच्या खालीं पांढरकवडा ह्या गांवीं त्याच्या सैन्याचा तळ पडला. त्याचा बेत अशीरगडच्या आश्र्यास जाण्याचा होता. तो पाठीस लागलेल्या इंग्रजी फौजेच्या मुख्याधिकाऱ्यास कळतांच त्यानें जलदी करून कांहीं सैन्य पाठवून किल्ल्यावर जाण्याचा मार्ग रोखून धरला. आणि कांहीं इंग्रेज सैन्य पाठीमागें होतेंच. अशा रीतीनें बाजीराव इंग्रजी सैन्याच्या अगदीं कैंचींत सांपडल्यामुळें निरुपाय होऊन अखेरीस त्यानें हात टेंकिले. आणि मग तह करण्याची त्यानें इंग्रज अधिकाऱ्यास विनंती केली. त्या वेळीं बाजीरावाजवळ सल्ला घेण्याजोगीं जुन्यापैकीं मुत्सद्दी शहाणीं माणसें कोणी नसल्यामुळें व्यंकटराव या नांवाचा एक सामान्य

कानडा ब्राह्मण जवळ होता, त्याच्या द्वारें बाजीरावानें इंग्रज सरकाराशीं तह केला. तोच पेशव्याचा शेवटला तहनामा होय. त्या तहनाम्यांत "बाजीरावानें पेशव्यांच्या गादीवरील आपला हक्क सोडून दिला. कोणाशीं आंतून गुप्त मसलत करणार नाहीं. कोणाशीं कांहीं जरूरच पडल्यास इंग्रज सरकारी अधिकाऱ्यांच्या मार्फतीनें पत्रव्यवहार करीन असें कबूल केलें. बाजीरावाच्या खासगी खर्चास दरसाल आठ लक्ष रुपये इंग्रज सरकारानें हिस्सेरशी प्रमाणें महिन्याचें महिन्यास द्यावे. आणि सोईस वाटेल अशा भागीरथी नदीच्या तीरीं राहण्यास इंग्रजांनीं बाजीरावास मोकळीक द्यावी." अशीं तहनाम्यांत मुख्य कलमें होतीं. याप्रमाणें पेशव्यांच्या गादीचें व मराठी राज्याचें बाजीरावाच्या हातून वाटोळें झाल्यावर बाजीरावास त्याच्या इच्छेवरून ब्रह्मावर्तास इंग्रजी फौजेनें नेऊन पोंचविलें. तेथें १८१८ पासून १८५० इसवी सालापर्यंत बाजीरावानें वास करून तो १८५० त मरण पावला. अशा रीतीनें मराठ्यांची गादी व पेशवाई बुडाल्यामुळें दक्षिणेंतील महाराष्ट्र लोकांची किती हानि व दुर्दशा झाली आहे, तिचा आपण अनुभव घेतच आहों. एवढा अनर्थ व इतकी धूळधाणी होण्यास मुख्य कारण पाहिलें तर अज्ञान, व त्यायोगानें आपसांतील तंटेबखेडे व वैर होय. यास्तव आमच्या हिंदुमुसलमान बांधवांनीं नीट विचार करून निष्कारण तंटे बखेडे उकरून हाणामाऱ्या करण्याचें व परस्परांत वैर वाढविण्याचें अजून तरी सोडून द्यावें अशी प्रार्थना आहे. यादवांचें कुळ फार श्रेष्ठ त्यांचा पराक्रम काय सांगावा? त्यांची संपत्ति फारच मोठी असे. त्यांची द्वारका नगरी

सुवर्णाची होती अशीं पुराणग्रंथांत वर्णनें आहेत. या कुळांत प्रत्यक्ष श्रीकृष्ण अवतरले असें तें कुळ श्रेष्ठ होतें, तथापि त्यामध्यें यःकश्चित कारणानें आपसांत कलह वाढून एकमेकांत मारामाऱ्या सुरू झाल्या. त्या मारामारीच्या योगानें सगळे यादव मेले, आणि त्या कुळाचा अगदीं निर्वंश झाला. हिंदु व मुसलमान हे आर्य भूमातेचींच लेंकरें असल्यामुळें त्या उभय जाती एकमेकांचीं भावंडें होतात. त्यांनीं गृहकलहानें ईर्षेस पेटून परस्परांशीं तंटे व मारामाऱ्या करणाऱ्या लोकांचे शेवट कसे दुःखास्पद झाले आहेत हें नीट विचार करून पहावें ह्मणजे सध्यां चाललेल्या हिंदु व मुसलमानांच्या भांडणांचा परिणाम किती भयंकर होण्याचा संभव आहे तें कळून येईल. याकरितां उभयतांनीं नीट विचार करावा अशी त्यांस हात जोडून प्रार्थना आहे. याविषयीं अर्वाचीन कवी काय ह्मणतात तें पहा—

गाणें भाऊबंदकी–( चाल लावणीची. )

( ह्या गाण्यांत भाऊबंदकीच्या भांडणाचे परिणाम किती वाईट होतात हें दर्शविलें आहे. )

भाउबंदकी भांडुनि झाला कोण सुखी कां आठवितां ॥
कौरव अवघे लयास गेले इतरांची मग काय कथा ॥
धृतराष्ट्राचे शंभर मुलगे राष्ट्र केवढें किति थोरी ॥
भीष्म कर्ण हे शूर वीर ते करिती ज्याची सरदारी ॥
राज्यविभागी असून पांडव कौरव भरले व्यर्थ भरीं ॥
करुनि लढाया प्राणा मुकले यांत मिळविलें काय तरी ॥
बांधव मेले वैभव गेलें फार दुर्दशा खरोखरी ॥

इतिहासानें भारत भरलें सांगावें तरि कोठवरी ॥
चाल वेगळी–जरि देते कौरव पांच तया गांव ॥
तरि कशास बुडतें कौरव हें नांव ॥ कां प्रसिद्ध होते पांडव ते देव॥
विदुरें कृष्णें बहुत बोधिलें दुर्योधन नाहीं वळला ॥
कळला भवला परिणाम पुरा अखेर ह्मणाति प्रभुसत्ता ॥ १ ॥
पुराणांत दृष्टांत असे बहु बघणाराला आढळती ॥
भाउबंदकी महाघातकी दुष्ट अशी चित्ता कळती ॥
किती नाश जाहला हिजमुळें बघून चित्तीं तळमळती ॥
प्रसंग असला कधीं न येवो ह्मणून सज्जन हे पळती ॥
असे उघड दाखले असुनिहि भलत्याची कां मति वळती॥
पुनः पुनः फसतात मूर्ख ते निश्चय त्यांचे डळमळती ॥
चाल–राघोबादादा शूर पेशवे कसे ॥ कां झालें त्यांचें
जगांत साऱ्या हसें ॥ स्त्री भाउबंदकीसाठीं त्यांवर रुसे ॥
प्रभु नारायणराव मारिले आनंदीनें ह्याकरितां ॥
पुण्यांतुनी पाऊल निघालें तोटा कुठला ह्यापरता॥२॥
थोर थोर तरि किती घराणीं गेलीं कैशीं रसातळा ॥
संभाजीनें माता वधिली[1] पहा कसा दिवटा पुतळा ॥
चुलत्या अल्लाउदिनें वधुनि[2] दोष लाविला आत्मकुळा ॥
नाम मात्र राहिलें पहाना इतिहासामधिं पडताळा ॥
भाउबंदकी आणुनि चित्तीं भावाचा कापिती गळा ॥
कर्में ऐसीं करुनि लाविती भाळीं अपकीर्तीचा टिळा ॥
चाल–भूपती असे हे किती निपजले पहा ॥
ह्या हिंदुस्थानीं किती जाहले शहा ॥ हें समजुनि उमजुनि

---

१ ही गोष्ट १६८० मध्यें घडली. २ ही १२९५ त घडली.

सुविचारानें रहा॥भाउबंदकी प्रसंग टाळा कशास दुःखें अनुभवितां, सांप्रत तर हा स्पष्ट येतसे कोडतांत अनुभव पुरता ३

आपसांतली समजुत टाकुनि व्यर्थ किती जण तणतणती॥
तंटे करुनि वकील आणिक बारिस्टर आणा ह्मणती ॥
छापील कागद भत्ता भरणें द्रव्याला लागे खणती ॥
अखेर होती पूर्ण भिकारी शीरें तयांचीं भणभणती ॥
भाउबंदकी भांडत असतां सज्जन मूर्खांमधिं गणती ॥
फिर्यादींची अपिलाची ह्या पहा किति होते गणती ॥
चाल—न्याय तो दूर धन खर्चा पहिल्यानें ॥ दादही न लागे अर्जी लिहिल्यानें ॥ मारावा खुशाल नहि[1]ला दहिल्यानें
निष्कांचन कां होतां कांहो संसारालागिं मुकतां ॥
बाळकृष्ण कवि सविनय पुसतो व्यर्थ असे कैसे भ्रमतां॥४॥

एक हिंदुस्थानी कवी काय ह्मणतो पहाः—

अंग्रेजी अदालत. ( कुंडलीय )

बलपौरु[2]ख हनुमानसम । धनकुबेर समजान ।
बुद्धि विनायक सम रहे । सबगुनकलानिधान ।
सबगुनकलानिधान । मान अपमान न माने ।
आयुर्बल चिरंजीव । मुनिलोमै[3]स समजाने ।
कहे तिलोकी यार । करे अंग्रेज कचेरी ।
छोडे घरकी आस । मास बारोंकी फेरी ।

---

१ बलाढ्यानें दुर्बळास. २ पुरुषार्थ, पराक्रम. ३ लोमेश ऋषी.

## भाग ४ था.

## हिंदु व मुसलमान लोक परस्परांशीं दांडगाई व मारामाऱ्या वगैरे करतात, त्यापासून कोणास कांहीं लाभ होतो किंवा हानि होते?

आपसांत तंटे माजवून वैर वाढल्यास त्याचा किती भयंकर परिणाम होतो, हें वरील अनेक उदाहरणांवरून मित्रांच्या लक्षांत आलेंच असेल. 'हातचें कांकण पहाण्यास आरसा नको.' भांडणानें हानि होते हें सांगण्यास ज्योतिषी किंवा भविष्यकार नको. ज्यास बुद्धि आहे, व विचार करण्याचें सामर्थ्य आहे, त्या सर्वांस ही गोष्ट सहज कळण्याजोगी आहे. असें असतां हिंदु व मुसलमान लोक अजून कां उमजत नाहींत, हें मोठें आश्चर्य आहे. आमचे हिंदु व मुसलमान बांधव मूर्ख व अशिक्षित नाहींत. उभयवर्गामध्येंही बहुश्रुत विद्वान, धर्मनिष्ठ, पोक्त, अनुभवी, उद्योगी, सन्मान्य, परोपकारी व पापभीरु असे लोक आहेत, हें मी जाणतों. त्या सर्वांस मी अनन्यभावें प्रार्थना करून विनवितों कीं, बाबांनो, हिंदु व मुसलमान वगैरे सर्वांनीं एकदिल होऊन आज ज्या गोष्टी अवश्य करण्याजोग्या आहेत त्या टाकून ह्या तंटे करण्याच्या फंदांत कां पडतां? आधींच दुर्दैवानें आपणा उभयतांस किती नाडलें आहे, हें तुह्माला समजत नाहीं का? आपण पूर्वी कोणत्या स्थितींत होतों, त्या आपली आज काय दशा झाली आहे हें जाणत नाहीं का? ज्यांचे पूर्वज राज्यसुख भोगीत होते, त्यांचे वंशज तुह्मी

आह्मी असून सर्वस्वीं पराधीन होत्साते हलक्या अन्नवस्त्रास देखील महाग झालों ह्याची लाज नाहीं का वाटत ? तुमचा विचार कोठें गेला ? तुह्मी आपला सगळा अभिमान, सगळें बळ, सगळा वेळ, आणि सगळें चातुर्य आपसांत तंटे व मारामाऱ्या करण्यांतच खर्च करणार काय ? असली यादवी कृति तुमचा सर्वस्वीं नाश करील. तुमच्या घरादाराचें वाटोळें करून त्याजवर नांगर फिरवील. तुमचीं बायकापोरें उघडीं व निराश्रित पाहून धायधाय रडत फिरवील. परके लोक छी थू करून तुह्मांस नीच मानतील. तुमचा वोज नाहींसा होऊन तुमच्यावर कोणी भरंवसा न ठेवितां आपल्या जोड्याजवळ देखील उभे करिनासा होईल. ही गोष्ट अद्याप तुमच्या मनांत कशी भरत नाहीं हें महदाश्चर्य आहे. असो. आजवर होऊन गेल्यागोष्टीचा शोक करणें व्यर्थ आहे, तरी पुढील बचावासाठीं त्यापासून आपणास बोध करून घेणें हें शहाणपण होय, यास्तव आतां उभयपक्षांनीं शांत व्हावें. आपसांतील यादवीचा त्याग करून एकमेकांतलें वैर टाकावें, आणि सुविचारानें व ऐक्यानें वागून कल्याणाच्या मार्गास लागावें, हेंच उत्तम होय. जरा डोळे उघडून पहाल तर आज बाहेर काय चाललें आहे, त्यायोगानें उद्योगी, दीर्घदृष्टी, शहाणे व दृढनिश्चयी असे परकी लोक मोठ्या हिमतीनें झटून सर्व कामांत पुढें कसे सरसावताहेत, आणि आपण आळशी, हालमस्त व वृथाभिमानी होऊन वेडेपणाच्याच कृति करीत बसल्यामुळें कसे मागें हटत चाललों आहों हें स्पष्ट दिसून येईल. आतां ज्ञानसूर्य उगवून फार वेळ झाल्यामुळें सर्वत्र प्रकाश पसरला आहे. असें असतां

तुह्मी अज्ञानाच्या धुंदींत मग्न होऊन अद्याप लोळत कसे पडलां! उठा, डोळ्यांस पाणी लावून सावध व हुशार व्हा, ह्मणजे ज्ञानसूर्याच्या प्रकाशानें आतां आपण काय करावें, आणि कसें वागावें हें तुह्मांस नीट कळूं लागेल. मी तुमच्यांतलाच असून तुह्मा सर्वांचा हितचिंतक असा गरीब देशबांधव आहें; ह्मणून तुमची हानि झालेली पाहिली, किंवा ऐकिली ह्मणजे मला अत्यंत वाईट वाटतें. आणि तुह्मांस लाभ झालेला पाहिला किंवा ऐकिला ह्मणजे परमानंद होतो. असा मी तुमचा हितचिंतक गरीब सेवक आहें. तरी तुमचें सर्वकाळ, सर्व ठिकाणीं व सर्व कृत्यांत कल्याण होऊन तुह्मांस यशप्राप्ति व्हावी असें मी चिंतीत आहें; ह्मणून अशा गरीब सेवकाच्या विनंतीचा अव्हेर न करितां तुह्मीं चांगला विचार कराल अशी फार आशा आहे, ती पूर्ण करणें आपणांवरच आहे.

आपलें पूर्ववैभव नष्ट होऊन गेलें तरी ज्या इंग्रजी राजसत्तेखालीं आज आपण आहों ते लोक फार शहाणे, उद्योगी, धारिष्टवान, प्रजापालक, दयाळू, सुधारणेच्छू, व्यवहारज्ञ व दूरदृष्टि असल्यामुळें आपणांस पुष्कळ सुख होत आहे, आपल्या जीवाची व मालमत्तेची इंग्रजी राज्यांत कोठें भीति राहिली नाहीं. प्रामाणिकपणानें कोणताही उद्योग केला तरी कोणाचा प्रतिबंध होत नाहीं. व तशा उद्योगानें कितीही धन संपादन केलें तरी कोणी सरकारी अधिकारी किंवा दुसरा एखादा बलाढ्य जबरदस्तीनें तें लुटून नेईल ही भीति नाहीं. दुष्टांचें शासन व सुष्टांचें पालन इंग्रजी राज्यांत सर्व ठिकाणीं उत्तम प्रकारें होत आहे. इंग्रजी राज्य झाल्यानें पूर्वीपेक्षां व्यवहारा-

च्या सोई किती जास्त वाढल्या आहेत ? नवनव्या उद्योगांचा फैलाव किती वेगानें होत आहे, सर्वत्र ज्ञानप्रसारार्थ विद्यालयें, वर्तमानपत्रें व छापखाने वाढत आहेत. जुन्या ग्रंथांचा जीर्णोद्धार होऊन नवनव्या विषयांवर अनेक पुस्तकांचा भरणा किती वेगानें वाढत आहे, ह्याचा विचार केला तर पन्नास वर्षांपूर्वी या हिंदुस्थान देशाची व त्यांतील लोकांची जी स्थिति होती ती बदलून आतां तिला अगदीं निराळें स्वरूप येत आहे असें दिसून येईल. अपराध्यांस शिक्षा करून सर्वांच्या हक्कांचें रक्षण करण्यासाठीं न्यायाचीं कोर्टें स्थापिलीं आहेत. त्यायोगानें श्रीमंतांपासून गरीबांपर्यंत सर्वांस न्याय मिळण्याचें चांगलें साधन झालें आहे. सडका, पूल, धर्मशाळा, रेलवे, कालवे, पोस्टखातें, विद्यालयें, आगबोटी, दवाखाने व तारायंत्रें इत्यादिकांची वृद्धि व सुधारणा होत असल्यामुळें व्यवहारास फार सौकर्य आलें आहे. कापसाच्या सुताच्या व कापडाच्या गिरण्या, रेशमी कापडाच्या गिरण्या, चामडीं तयार करण्याच्या गिरण्या, कागदांच्या गिरण्या, व अनेक प्रकारचीं भांडीं आणि टांचण्या, सुया, खिळे, व चुका इत्यादि तयार करण्याच्याही गिरण्या सुरू झाल्यामुळें नव्या प्रकारच्या उद्योगांचें शिक्षण इकडील लोकांस मिळत आहे, त्या योगानें जे दृढ उद्योगी, बुद्धिमान व चतुर पुरुष असतील त्यांना आपल्या करामतीनें पुढें सरकण्यास मार्ग खुला होत आहे. कोळशाच्या खाणी व सुवर्णाच्या खाणी शोधून त्यांत पुरून ठेवलेलें धन बाहेर काढण्याचाही उद्योग मोठ्या झपाट्यानें चालला आहे. असे अनेक नवनवे उद्योग इंग्रजी राज्यामुळें आपल्या देशांत सुरू झाले, हें आपलें केवढें भाग्य आहे ?

ह्याचा विचार केला ह्मणजे आतां आपणांस काय केलें पाहिजे, कशा रीतीनें वागलें पाहिजे व एकजुटीनें वागून कोणत्या उद्योगांत शिरलें असतां आपलें कल्याण होईल, हें लक्षांत येण्याजोगें आहे. यास्तव मित्रांनो, आतां आडमार्ग सोडून द्या, आणि सडकेच्या मार्गानें चाला, ह्मणजे तुमचें कल्याण होईल ह्यांत संशय नाहीं.

जन त्रिविध आहे, त्यानें कोणास बरें ह्मटलें नाहीं, ही गोष्ट नेहमीं मनांत धरली पाहिजे. ताज्या घोड्याला गोमाशा झोंबतात त्याप्रमाणें आपला चालता काळ असला ह्मणजे सोयरेधायरे, इष्टमित्र वगैरे कसला तरी गणगोताचा संबंध जोडून खायला जुडतात. पण आपणास पडता काळ येऊन विपत्ति प्राप्त झाली ह्मणजे मग कोणी पुसेनासे होतात, हें सर्वांच्या नित्य अनुभवास येत आहे. आपसांत तंटे माजविणाऱ्या हिंदुमुसलमान मित्रांस ह्याचा चांगला प्रत्यय येत असेल यांत भ्रांति नाहीं. कारण होळीचे होळकर बिचाऱ्या अज्ञान गरीब लोकांस भर देऊन पुढें लोटतात, आणि आपण नामानिराळे होऊन मागें सरतात. त्याचें प्रायश्चित्त गरीब लोकांसच भोगावें लागतें. खेडेगांवीं काय, आणि शहरांत काय, कळ लावणारे कळीचे नारद थोडे तरी असतातच. त्यांना तंटे माजवून त्यांची मौज पाहण्याची व साधेल तर त्यांत आपलीं पोटें जाळण्याची फार हौस असते, यामुळें ते नेहमीं छिद्रें शोधीत असतात. त्यांच्या उद्योगानें तंटा वाढायचा तो न वाढतां आपसांत मिटला तर त्यांची शिकार फसते, तेव्हां त्यांस अत्यंत दुःख होतें. एखाद्या गांवांत किंवा शहरांत मोठी सांथ येऊन पुष्कळ लोक मरूं लागले ह्मणजे

दहनाकरितां लांकडें, गोंवऱ्या विकणारांस व क्रियाकर्म सांगणाऱ्या कारटे लोकांस फार हर्ष होतो, आणि चांगली हवा होऊन मृतांची संख्या कधीं कमी झाली ह्मणजे त्यांस फार दुःख होतें. मग ते काळास देखील शिव्या देऊं लागतात. तोच प्रकार आमच्या गांवकुटाळ कळलाव्या नारदमुनींचा आहे. 'दुर्जनं प्रथमं वंदे, सज्जनं तदनंतरं.' ह्या वाक्याप्रमाणें त्यांस नमस्कार असो. ह्या गांवकुटाळांचा उद्योग छिद्रें शोधण्याचा असतो हें वर सांगितलें; त्या योगानें ह्या मुनींस राजकीय, सामाजिक, व्यावहारिक व अगदीं खासगी अशा गोष्टींतील देखील छिद्रें तारायंत्रानें कळतात. ते जातीनें कफल्लक असतात तरी मोठ्या राजास पदच्युत करण्याचें, धनाढ्यास भिकारी बनविण्याचें, मोठ्या अब्रूदार व कुलीन पुरुषांची फटफजिती करण्याचें, बलाढ्यास निर्बल करून टाकण्याचें व पवित्र अशा पतिव्रतांस भ्रष्ट करण्याचें सामर्थ्य त्यांच्या अंगीं असतें. एखादा कलह माजविण्याचा ह्यांनीं घाट घातल्यावर एका पक्षाची मंडळी भिऊन मागें सरूं लागली, किंवा पुढील परिणाम ओळखून पड घेऊं लागली, तर हे बुवा लागलेच पुढें होऊन सांगतात कीं, तुह्मी भितां कां ? मीं तुमच्या पाठीवर आहें. आज मी जें करीन तें होईल. सरकारदरबार तर माझ्या अगदीं मुठींत आहे, हें तुह्मी जाणतच आहां. असें असतां भागूबाईसारखे भिऊन तुह्मी पड खाल तर त्यांत तुमची नाचक्की होईल. लोक तुह्मांला भेंकड ह्मणतील. जनांत तुमची निंदा होऊन बोज कमी होईल. इत्यादि अनेक प्रकारांनीं हे नारदमुनी पडत्या पक्षास भर देऊन ईर्षेनें पुढें सारतात. उसाचें कांडें एकदां फिरल्या चरकांत

सांपडलें ह्मणजे त्याचा सगळा रस गळून त्याचें चिपाड झाल्याखेरीज बाहेर पडत नाहीं. त्याप्रमाणें ह्या मुनीमहाराजांनीं एकदां कलहाग्नि पेटविला ह्मणजे त्या वणव्यांत सांपडणाऱ्या लहान थोर सर्व लोकांची राखरांगोळी झाल्याखेरीज सुटका होत नाहीं. कदाचित् एखादे स्थळीं अग्नि विझण्याचा रंग दिसला तर हे महाराज त्याजवर तेल ओतून वारा घालण्यास जवळ उभेच असतात. सगळा गांव जळाला तरी मारुती आपला गांवाबाहेरच ! त्याप्रमाणें हे प्रतापी व विघ्नसंतोषी बुवा दुरून मौज पाहायला तयारच असतात. शहाण्या पुरुषांनीं असल्या कलिपुरुषांच्या वाऱ्यास देखील उभें राहूं नये. हिंदु व मुसलमानांत आजवर जे तंटे झाले त्यांत दांडगाई व मारामारी करणारे लोक पोलिसानें पकडले, तरी त्यांतले खरे सूत्रधार अलिप्तच राहिले असतील. कारण ते सक्षात् रंगभूमीवर न येतां पडद्यांतून सूत्रानें बाहुलीं नाचवून नामानिराळे राहतात, ह्मणून ते कदापि हातीं लागत नाहींत. एखाद्या पोलीसबहाद्दरानें त्यांस पकडण्याचा घाट घातलाच तर ते एखादा छूमंतर सोडून त्या बहाद्दराचीच मान गळाला गुंतवितात. अशी त्यांच्यांत करामत असल्यामुळें त्यांच्या वाटेस कोणी जात नाहीं. आपसांत होणाऱ्या बहुसमाजाच्या दांडगाईत दोन्ही पक्षांकडचेही लोक पुष्कळ जमतात. त्यामुळें अल्पस्वल्प कारणावरून प्रथम बाचाबाची सुरू होऊन हुमरीतुमरी होते, त्या वेळीं कलिपुरुष जवळ असल्यास तें प्रकरण तितक्यावर मिटूं न देतां संतापलेल्या लोकांस चढ देऊन हातघाईवर नेतात. अशा रीतीनें एकदां मारपीट सुरू झाली ह्मणजे दोन्ही पक्षां-

कडील लोकांस भान राहीनासें होतें. जें काय हातांत सांपडेल त्या पदार्थानें एकमेकांस बडवीत सुटतात. रागाच्या आवेशांत मनुष्याच्या हातून होणारीं कृत्यें अनन्वित झालीं तर नवल काय? त्या वेळीं मनुष्य देहभानावरच नसतो. यामुळें आपण काय करतों, त्या कर्माचा परिणाम काय होईल, हें त्यांच्या लक्षांतच रहात नाहीं. आजवर जेथें जेथें हिंदु व मुसलमान लोकांत तंटे होऊन मारामाऱ्या झाल्या त्यांत कोणाचीं डोकीं फुटलीं, कोणाच्या हातापायांस इजा झाली, कित्येकांस बेदम मार बसल्यामुळें दवाखान्यांत जावें लागलें; अशा इजा झाल्या. त्या व्यक्तीव्यक्तींचें वांकडें असल्यामुळें बुद्धिपुरःसर करण्यांत आल्या असें नाहीं. केवळ रागाच्या आवेशांत कांहीं तरी होऊन गेलें, व कोणास तरी दुखापत झाली. फार कशाला, एखाद वेळ घरांतील मुलांच्या किंवा बायकांच्या हातून अज्ञानामुळें एखाद्या पदार्थाचा नाश झालेला पाहून, किंवा अन्य कारणानें घरांतल्या कर्त्या पुरुषास राग आला तर तो रागाच्या संतापानें खवळून लाल होतो, हातपाय आपटून डोळे फिरवितो, ओठ चावतो, आणि तामस प्रकृति असल्यास तो त्या आवेशांत पिसाळून पिशाच्याप्रमाणें बनून जें कांहीं हातांत सांपडेल त्या पदार्थानें ह्मणजे काठीनें, भांड्यानें, गंधाच्या खोडानें, व प्रसंगीं लोखंडाच्या बत्त्यानें सुद्धां बायकापोरांस बडवीत सुटतो. कोणी सोडवायाला गेलें तर त्याला देखील त्याच्या माराचा प्रसाद मिळतो. प्रत्यक्ष घरांतल्या माणसाशीं रागाच्या भिरकांडींत मनुष्याच्या हातून जर असें दुर्वर्तन होतें, तर समुदायाच्या संकेतानें एखादें कृत्य करण्यास मनुष्यें प्रवृत्त झालीं ह्मणजे मग काय काय अनन्वित

कृत्यें करतील ह्याचा ताळमेळ राहत नाहीं. तशांत त्यांजवर मंत्र फुंकणारे गारुडी जवळ असल्यास मग तर पुसूंच नये. असा प्रकार घडून येण्यास उशीर लागत नाहीं. मारामारीच्या योगानें जे लोक पोलीसच्या हातीं सांपडून संकटांत पडले आहेत, त्यांनीं विचार करून पहावा ह्मणजे वर लिहिल्या तऱ्हेनेंच त्यांच्या हातून कृति घडल्या असतील असें ध्यानांत येईल.

दंगाधोपा न होऊं देतां लोकांत शांतता राखणें, प्रजेच्या जीवाचें व मालमत्तेचें संक्षरण करणें हें पोलिसाचें व सरकारी अधिकाऱ्याचें मुख्य काम आहे. कोणाच्याही हातून कसल्याही कृतीनें पोलिसाच्या मुख्य कामास व्यत्यय येऊं लागला ह्मणजे त्यांस उग्र स्वरूप धारण करावें लागतें. सामोपचारांनीं व तोंडच्या दाबदडपीच्या धाकांनीं लोक शांत झाले तर बरें, पण पिसाळलेले लोक त्यास जुमानीनातसे होऊन भडकूं लागल्यास त्यांस ताळ्यावर आणण्याजोगे कडक उपाय योजल्याखेरीज चालत नाहीं. आपसांत होणाऱ्या तंट्यास व मारामारीस कोणच्या ठिकाणीं व केव्हां आरंभ होणार हें अगोदर कळण्याचा संभव फार कमी असतो, यामुळें त्या सर्वत्र ठिकाणीं पहिल्यापासून पोलीसच्या लोकांस राहतां येत नाहीं. तंटा सुरू होऊन [illegible]लबा होऊं लागला, किंवा धोपटाधोपटीस आरंभ झाला, ह्म[illegible]जे जवळपासच्या पोलिसांस खबर कळते, तेव्हां ते लागलीच [illegible]च्याचे जागीं येऊन थडकतात. त्या वेळीं सामोपचारानें बोला[illegible]ली बंद होऊन गर्दी मोडली तर ठीकच. नाहीं तर त्यांस [illegible]राधरी सुरू करावी लागते. प्रथम कोणाकडून आगळीक झा[illegible]ी,

हें त्या वेळीं कळण्याचा संभव नसतो. ज्याला विचारावें तो नाहीं नाहींच ह्मणणार. यामुळें त्या ऐन गर्दींत जो सांपडेल त्याला पकडून पोलीसचौकींत नेऊन अडकविणें भाग पडतें. पोलिसाची एकदां धरपकड सुरू झाली ह्मणजे बहुधा गर्दी लौकर मोडते. मग धरलेल्या लोकांत वास्तविक अपराधी कोण आहेत, ह्याचा मुद्दा पत्ता लावून खरे आरोपी असतील त्यांस माजिस्ट्रेटासमोर उभे करतात, आणि बाकीच्यांस सोडून देतात. अशा धरपकडींत निरपराधी लोक देखील कधीं कधीं गुंतले जातात. असा पोलिसास दोष देऊन कित्येक लोक त्याचे नांवें खडे फोडतात, पण विचार करून पाहिलें तर पोलिसानें तरी काय करावें ! तें अंतर्ज्ञानी नाहीं. आणि तंटे करणारे लोक मारामाऱ्या सुरू करतांना आह्मी अमक्याचें डोकें फोडणार अशी पोलिसास वर्दी देऊनही जात नाहींत. अशा निरुपायानें एखादा निरपराधी मनुष्य पोलिसाच्या हातून पकडला गेला, आणि खरा अपराधी पोलिसच्या हातून निसटून गेला, तर त्या खऱ्या अपराध्यानें प्रामाणिकपणासाठीं पोलिसाकडे हजीर होऊन सांगावें कीं, अमका मनुष्य तुह्मी धरला आहे तो निरपराधी असल्यामुळें त्यास सोडा, आणि मी अपराधी आहें ह्मणून मला धरा. असें खरेपणानें लोकांनीं वर्तन केल्यास पोलिसचे लोक व अंमलदार भलत्याला उगीच कशासाठीं पकडतील? पोलीस हें कोणत्याही मनुष्याचें शत्रू नाहीं. तें सुकृतीचें रक्षक व दुष्कृतीचें शासक आहे. यामुळें जेथें ज्या व्यक्तीच्या हातून अपराध झाल्याचा सुगावा लागतो, त्या लोकांस पकडून न्यायाधीशापुढें त्यांस नेणें भाग पडतें. गुन्हे

पकडणारें पोलीसच जर न्याय करणारें असतें, तर त्याच्या हातून जास्त चुका होण्याचा संभव होता, हें समजूनच सरकारानें न्यायाचें काम पोलिसाकडे न ठेवितां तें अगदीं वेगळ्या मनुष्यांकडे ठेविलें आहे. ह्मणून तेथें चुक्या होण्याचा संभव कमी असतो. तरी असल्या घोंटाळ्याच्या प्रकरणांत कांटेतोल न्याय होणें दुर्घट असतें. कारण प्रजेचें संरक्षण होण्यासाठीं सर्वत्र शांतता राखणें हें सरकारचें मुख्य काम आहे, त्याचा ज्या कृतींनीं भंग होतो, अशा मोठ्या कलागती व मारामाऱ्या बंद करणें व त्या पुनः न होऊं देण्याचा लोकांस धाक दाखविणें हें फार अगत्याचें आहे. तसें करण्यासाठीं एखाद्या प्रकरणांत न्यायाधीशास जोरानें छडी उगारावी लागते, ह्मणून त्याला लोक जुलमी ह्मणतात. पण सामान्य व्यवहारांत देखील वचक रहाण्याकरितां जरबेचे प्रयोग केल्याखेरीज चालत नाहीं, असा अनुभव आहे.

विद्याशाळेंतील एखादा मास्तर शांतवृत्तीचा असला तर पोरें त्याला जुमानीनातशीं होतात. कांहीं कारणानें जरा तो वर्गाच्या बाहेर पडला कीं पुरे, पोरें लागलाच मोठा गलबा करून एकमेकांशीं दांडगाई सुरू करतात, असा प्रकार चालू झाल्यावर मास्तर क्लासांत येतात, आणि कोणी गलबा केला ही चौकशी करूं लागले असतां सर्वच मुलें नाहीं नाहीं ह्मणतात. त्यामुळें खरा दंगेखोर छपला जातो. पण असला प्रकार घडणें शाळेच्या शिक्षणास हानिकारक असल्यामुळें, विद्यार्थ्यांनीं पुढें तरी असें करूं नये ह्मणून मुलांस स्मरण राहण्यासाठीं कठोर उपाय करावा लागतो. ह्मणून मास्तर वर्गांत उभा राहून मुलांस उद्देशून बोलतो कीं ‘मी जरा बाहेर गेलों

तेवढ्या वेळांत माझे पाठीमागें तुह्मी मोठा गलबा करून दांडगाई सुद्धां आरंभिली, असें असून कोणी कबूलही करीत नाहीं, सबब तुह्मा सर्वांस पुनः असें न करण्याची आठवण रहावी ह्मणून थोडासा खाऊ देतों.' असें ह्मणून प्रत्येक मुलास सरसकट एकेक दोनदोन छड्या अधिक उण्या जोरानें लगावतो. त्यामुळें मुलें मनांतल्यामनांत कुरकुरतात. पण तसें केल्याखेरीज मास्तरास दुसरा मार्गच नसतो. ही गोष्ट बहुतेक वाचणाऱ्यांस अनुभवानें माहीत असेलच. अशा कृतीबद्दल आपण मास्तरास नांवें ठेवीत नाहीं. तर मग एखाद्या घोंटाळ्याच्या प्रकरणांत निरुपायामुळें पोलिसाकडून किंवा माजिस्ट्रेट वगैरे न्यायाधीशांच्या हातून जरबेसाठीं असा प्रकार घडल्यास त्यांच्या नांवानें काय ह्मणून दगड फोडावे? मोठ्या मारामारीच्या प्रसंगीं बेफाम होऊन अनन्वित कृति करणाऱ्या लोकांस ताळ्यावर आणण्यासाठीं जेव्हां धरपकड सुरू होते, तेव्हां पोलिसाकडून व त्याचा न्याय करतांना माजिस्ट्रेट वगैरे न्यायाधीशांकडून जरा जोराचा कोर्डा उडाला तर आवेशानें झोटिंगपाच्छाई करूं इच्छिणाऱ्या लोकांनीं काय ह्मणून रडावें? आपण मागला पुढला विचार न पाहतां मनःपूत वागतांना जर कोणास भ्यालों नाहीं तर पोलिसाचे धक्केबुक्के व माजिस्ट्रेटाचे फटकारे खाण्यास मागेंपुढें केलें तर कोण सोडील? दांडग्या लोकांप्रमाणेंच सरकारी अमलदार लोक थोडें उग्ररूप धारण करून न वागतील तर हीं मारकीं उर्मट माणसें कदापि ताळ्यावर यावयाचीं नाहींत. ह्मणून जशास तसें होणें समयोचित आहे. यास्तव आमच्या हिंदु व मुसलमान बांधवांनीं चांगला दूरवर विचार करून असले घात-

कारक दांडगाईचे प्रकार आतां सोडून द्यावे. इतक्याउपर ते न समजतील तर त्यांना ताळ्यावर आणणारे सरकारचे अनेक पंचाक्षरी असल्या भूतपिशाचांस मुक्ति देण्याचें साहित्य घेऊन तयार बसलेच आहेत. ते कदापि सोडणार नाहींत. हें खूप समजून रहावें. कोणी कोणी ह्मणतात कीं सरकारी अधिकारी मुसलमानांची तरफदारी करतात. पण त्या भरवशावर कोणीं विश्वासूं नये. कारण अपराध करणारा सख्खा भाऊ किंवा प्रत्यक्ष बाप असला तरी भीड मुरवत न धरितां त्यास पकडतात, आणि खेंचीत नेऊन पोलीसचे लोक त्याला चौकींत अडकवितात. नंतर माजिस्ट्रेट वगैरे न्यायाधीशांपुढें त्यास उभें करून त्याजवर गुन्ह्याच्या शाबिदीचा पुरावा देतात, असें आपण नेहमीं पाहतों. तर मग सरकार किंवा सरकारी अधिकारी आमच्या पक्षाचे कैवारी आहेत, असें मानून बेफाम वागणें हें पतंगानें दिव्यावर उडी टाकण्यासारखें आहे; ह्याचा विचार आमच्या मित्रांनीं करावा अशी प्रार्थना आहे.

पोलीसच्या अधिकाऱ्यांस व न्यायाधीशांस दंगे करणाऱ्या लोकांशीं प्रसंगोपात्त निष्ठुरपणानें वागण्याचा प्रसंग येतो, त्या वेळीं निरुपायानें ते कठोरपणा करतात, एवढ्यावरून ते मुसलमानांचा किंवा हिंदूंचा द्वेष करतात असें होत नाहीं. कारण ते कोणाचा द्वेष करते तर जेथें असले प्रकार घडत नाहींत तेथल्या हिंदु किंवा मुसलमानांचा सूड उगवून त्यांणीं समाचार घेतला असता, पण तसें कोठेंही दिसून येत नाहीं. त्या अर्थी ते अमक्याचे कैवारी अगर तमक्याचे द्वेषी असा त्यांवर आरोप करणें हें अगदीं असमंजसपणाचें

काम होय. आपलें कुरूप असलें तर आरशांत तसेंच दिसतें, ह्मणून आपण आरशावर रुसत नाहीं, त्याप्रमाणें आपल्याच कृतीचा योग्य मोबदला पोलीसच्या अधिकाऱ्यांकडून किंवा न्यायाधीशाकडून मिळाला तर त्यांजवर रुसणें किंवा रागावणें व्यर्थ होय. त्यांच्या हातून आपला अपमान व बेअब्रू होऊं नये अशी इच्छा करणारांनीं आपल्याकडून होत असणाऱ्या दुष्कृतीचा त्याग करून कोणास उपद्रव न देतां सुमार्गानें वागण्याचा निश्चय करावा, ह्मणजे ह्या इंग्रजी अमलांत कोणाकडूनही उपद्रव किंवा छल होणार नाहीं.

हिंदु व मुसलमान हे सरकारचे दोन हात आहेत, ह्मणून एक अधिक व एक उणा असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. जे गैरचालीनें वागून कायद्याच्या हुकुमाची पायमल्ली करूं पाहतात, त्यांचा पोलीसमार्फत तपास करून तेच पकडले जातात, व त्यांणीं केलेल्या दुष्ट कृत्यांचा बारकाईनें शोध करून त्यांजवरील आरोपाची शाबिदी होण्याजोगीं प्रमाणें व पुरावे जमा करितात, आणि मग त्यांना चौकशीकरितां न्यायाधीशापुढें उभे करतात. वास्तविक पाहिलें तर असा प्रकार होत असून आपल्या कृतीचा विचार न करितां उगीच त्यांना नांवें ठेवणें हें मूर्खपणाचें काम होय. लोकांच्या जीवांच्या व मालमत्तेच्या रक्षणाकरितां पोलीस, पोलीसचे अधिकारी व न्यायाधीश यांच्या सरकारानें नेमणुका केल्या आहेत. ते आपलें काम योग्य रीतीनें बजावतात ह्मणून आपण त्यांना नांवें ठेविलीं तर त्यांत आपलेंच नुकसान होईल, हें विचार करून पाहणारांस सहज दिसण्याजोगें आहे. आपल्या आंगच्या हस्तपादादि एखाद्या अवयवास रोग

होऊन तो औषधोपचारांनीं बरा होण्याची आशा न राहतां अवयव सडत चालला तर डाक्टर लोक त्याला कापून काढतात, ह्मणून डाक्टर हे आपले वैरी आहेत असें कधीं न मानतां ते प्राणरक्षण करणारे आहेत असेंच आपण मानतों. त्याचप्रमाणें पोलीस किंवा न्यायाधीश आमच्याच वर्तनाप्रमाणें मन निष्ठुर करून कठोरपणा धारण करतात, ह्मणून ते आपले वैरी किंवा अहित करणारे होत असें कदापि मानणें प्रशस्त होणार नाहीं. कारण घरामध्यें आपलींच लहान मुलें आपसांत परस्परांशीं भांडून एकमेकांच्या मानेवर बसूं लागलीं तर त्यांच्याच कल्याणासाठीं आपण त्यांजवर छडी उगारतों, व प्रसंगोपात्त दोन चमक्या देखील लगावतों, ह्मणून आपण त्यांचे वैरी समजले जात नाहीं. तीच कृति पोलिसाची व न्यायाधिशांची असते, असें विचारानें पाहणाराच्या लक्षांत येईल. या सर्व वर्णनावरून दंगे करण्यापासून कोणासही यत्किंचित् लाभ नसून फारच मोठी हानी होते असें दिसून येईल. ह्मणून तसला घातक मार्ग लोकांनीं सोडावा अशी प्रार्थना आहे.

---

## भाग पांचवा.

### विनंति.

आमच्या दयाळू सरकारास, न्यायाधिशांस व पोलीसच्या मोठ्या अधिकाऱ्यांस हात जोडून विनंती आहे कीं, अपराधी लोकांस आपण कायद्याच्या धोरणानें पकडतां, कैदेंत ठेवितां, न्यायाच्यावेळीं पुराव्यानें अपराध शाबीद होईल त्या मानानें लहान मोठ्या शिक्षाही देतां हें सर्व ठीक आहे.

त्याबद्दल मी आपणांस नांव ठेवणार नाहीं, व कोणींही ठेवूं नये अशी माझी समजूत आहे. पण माझी विनंती अशी आहे कीं. दोघांची गैरसमजूत होऊन ज्याला त्याला आपला पक्ष खरा व दुसऱ्याचा खोटा असें वाटत असतें. यामुळें परस्परांची चांगली समजूत न पडतां तंट्यावर धांव जाते. दिवाणी असो किंवा फौजदारी असो, जेवढे तंटे सरकारापर्यंत जाऊन पोंचतात त्यांचा उगम अशा प्रकारानेंच झालेला असतो असें आढळतें. तंट्याची मजल एकदां सरकारदरबारापर्यंत जाऊन पोंचली ह्मणजे दोन्ही पक्ष ईर्षेस पडतात, मग न्यायाच्या दरबारांतले दलाल कुळाची लायखी पाहून आपली तुंबडी भरण्याकरितां त्यांस भर देऊन चढीस लावितात. त्या योगानें दोन्ही पक्षांचा फार खराबा होऊन भिकेस लागण्याची वेळ येते, किंवा जवळचें द्रव्य जाऊन लोकांत छी थू झाली ह्मणजे देशत्यागही करावा लागतो. ह्या तंट्याचे पायीं अशीं उदाहरणें घडलेलीं अनेक वेळ दृष्टीस पडतात. इंग्रज सरकारच्या छायेखालीं राहणाऱ्या सधन व अब्रूदार लोकांची अशा रीतीनें दुर्दशा होऊं देणें हें सरकारास व सरकारी अधिकाऱ्यांस देखील लांछनास्पद आहे. याकरितां आपसांतील तंट्याबखेड्याची सरकारी अमलाच्या जबरदस्तीनें नव्हे, पण मित्रत्वाच्या व प्रजावात्सल्याच्या नात्यानें कांहीं तरी निराळी तजवीज करून हिंदु व मुसलमान लोकांत पडलेली तेड मिटवून टाकावी, ह्मणजे लोकांवर सरकारचे महदुपकार होतील. मध्यप्रदेश इंग्रज सरकारच्या ताब्यांत असून तो मुंबई इलाख्याच्या हद्दीस लागलेला आहे. त्यामध्यें १८ जिल्हे असून त्यांतही हिंदूंची व मुसलमानांची

वस्ती सर्व ठिकाणीं आहे, तथापि तेथील सरकारचे लहान मोठे अधिकारी लोकांजवळ ममतेनें, प्रजावात्सल्यानें, व फार सावधगिरीनें वागत असल्यामुळें तेथें हिंदु व मुसलमानांचे तंटे आजवर कधीं झाले नाहींत. तिकडील जबलपूर डिव्हिजनपैकीं सागर, दमो, व जबलपूर हे जिल्हे तर वायव्यप्रांताच्या सरहद्दीस लागलेले असल्यामुळें तिकडील दांडग्या मुसलमान वस्तीच्या लोकांशीं त्यांचा संबंध असून वायव्यप्रांतांतील हिंदु व मुसलमानांत होणाऱ्या दंग्यांच्या बातम्या वारंवार त्यांच्या कानावर येत असतांही, मध्यप्रदेशांतील सरकारी अधिकाऱ्यांच्या उत्तम व्यवस्थेमुळें त्यांनीं तिकडे दंगा होऊं दिला नाहीं; हें तेथल्या अधिकाऱ्यांस अत्यंत भूषणास्पद आहे. आमचे मुंबई इलाख्यांत जे सरकारी अधिकारी आहेत त्यांनीं मनावर घेतल्यास हिंदु व मुसलमान लोकांत होणारे तंटे बंद करण्यास फार काळ व बहुत श्रम नकोत. तें काम हां हां ह्मणतां होण्याजोगें आहे. पहा, हिंदुस्थानच्या गव्हर्नर जनरल साहेबांनीं व इलाख्याच्या गव्हर्नरांसारख्या श्रेष्ठ अधिकाऱ्यांनीं कृपा करून हिंदु व मुसलमानांत होणारे तंटे युक्तीनें मिटवून टाकण्याचा प्रयत्न केल्यास तें काम अल्प कालांत सहज होण्यास काय अशक्य आहे? कारण सरकारच्या मुख्य अधिकाऱ्यांचा कल पाहून त्यांच्या मर्जीच्या धोरणानें हाताखालचे कामगार व प्रजेंतील प्रमुख लोक वागत असतात. ह्मणून व्हाइसराय साहेबांनीं हे तंटे आपसांत युक्तीनें मिटविण्याबद्दल इलाख्याच्या सरकारास आपली इच्छा दर्शविली तर इलाख्याचे गव्हर्नर साहेब, त्यांचे कौन्सिलदार, डिव्हिजनचे कमिशनर, जिल्ह्याचे कलेक्टर

व डेप्युटी कमिशनर, तसेच तालुक्याचे मामलेदार व तहशिलदार, पोलीस सुपरिंटेंडेंट, पोलीस इन्स्पेक्टर, आणि चीफ कॉन्स्टेबल वगैरे सर्व सरकारी अधिकारी हे आपापलीं वजनें व भिडाभाडा खर्चून दोन्ही पक्षांतील प्रमुख लोकांच्या मदतीनें हे तंटे सहज मिटवून चांगलें यश संपादन करितील ह्यांत संशय नाहीं. सध्या आपल्या हिंदुस्थान देशाचें स्वामित्व लार्ड एलगिन् साहेबांकडे आहे, त्यांची ह्या देशांतील रयतेवर मेहरनजर आहे, ह्मणूनच त्यांनीं जंगलखात्या संबंधीं अलीकडे जो ठराव प्रसिद्ध केला आहे, त्यांत रयत लोकांस पुष्कळ सवलती दिल्या आहेत. त्याचप्रमाणें मध्यप्रदेशांतील जमिनीची दुसऱ्या खेपेची मोजणी होऊन दरठरोती झाली, त्यांत सरकारानें उत्पन्नापैकीं दरशेंकडा ६९ रुपये आपलेकडे घेऊन फक्त शेंकडा ३९ रुपये मालगुजारास देण्याचें ठरविलें होतें, त्यांत फेरबदल करून दरशेंकडा ६० रुपये सरकारानें घ्यावे, व ४० रुपये मालगुजार लोकांस द्यावे, असें लार्ड साहेबांनीं ठरविलें आहे. या गोष्टींवरून लार्ड एलगिन् साहेबांची रयतेवर दयार्द्रदृष्टि आहे असें स्पष्ट दिसतें. तेव्हां अशा थोर महात्म्या पुरुषांनीं आपल्या रयतेमध्यें क्षुल्लक कारणांवरून आपसांमध्यें वारंवार तंटे होऊन मारामाऱ्या होतात, त्यायोगानें हिंदु व मुसलमान बांधवांत वैर वाढून उभयतांचाही मोठा तोटा होतो, तो टाळण्याची इच्छा धरून उभयतांचा आपसांत समेट करून देण्याचें मनांत आणिल्यास त्यांना कोणता पक्ष नाहीं ह्मणेल? दोन्ही पक्षांतील लोक लार्ड साहेबांच्या ह्मणण्यास अत्यादरानें मान्य होऊन ते सांगतील त्याप्रमाणें वाग-

ण्यास संतोषानें तयार होतील हा पूर्ण भरंवसा आहे. " नखानें तोडतां येण्याऱ्या वस्तूवर मोठ्या कुऱ्हाडीचा जोरानें घाव घालणें हा युक्तीचा व शहाणपणाचा मार्ग नव्हे " हें सर्व कबूल करतील. ह्मणून माझ्या विनंतीप्रमाणें हिंदुस्थानच्या मुख्य सरकारानें व इलाख्यांच्या सरकारांनीं युक्तीच्या मार्गानें प्रयत्न सुरू केल्यास कोणाची धरपकड करण्याची, मार खाण्याची व देण्याची आणि पोलिसास अनिवार होऊन शांतता करतां येईनाशी झाली ह्मणजे लष्करी लोक व तोफखाना आणून उभा करण्याची, कधीं कधीं जरूर पडते, तसला भयंकर प्रसंग कधींही येणार नाहीं, अशी मला खात्री आहे. ज्या गांवांत किंवा शहरांत असले तंटे होऊन जुलूमजबरी किंवा मारपीट होते, त्याबद्दल आरोपींस धरून त्यांजवर खटले करण्यांत येतात. तशा प्रसंगीं कधीं कधीं निरपराधी व निरुपद्रवी लोकही त्यांत घुसडले जातात, असें आलीकडे सरकारच्याच न्यायाधिशांच्या लक्षांत आल्यावरून, त्यांनीं येवल्याचे व पुण्याचे खटले सोडून दिले. कारण तशा घालघुसडींत गरीब व निरपराधी लोकांचा न्यायाच्या चरकांत चुराडा होतो हें सरकारचे खरे न्यायाधीश समजून आहेत. पण कधीं कधीं कायद्याच्या हुकुमापुढें त्यांचा निरुपाय होऊन पुराव्याच्या मानानें त्यांस कठोरपणा करावा लागतो. असल्या मारपिटीचे खटले निकालास लागले तरी तेवढ्यानें लोकांची सुटका होत नाहीं. त्याबद्दल गांवच्या सर्व लोकांस सरसकट प्रायश्चित निराळेंच भोगावें लागतें. वायव्यप्रांतांतील अजीमगड जिल्ह्यांतील हिंदु व मुसलमान ह्यांच्यामध्यें सन १८९३ सालीं मारामारी

झाली, त्यावरून तेथें शिक्षेदाखल जादा पोलीस ठेवण्यांत आलें, त्याबद्दल तीस हजार रुपये खर्च नुसत्या हिंदु लोकांकडून घेण्याचा ठराव झाला. मुंबई इलाख्यांतल्या नाशिक जिल्ह्यांतील येवलें गांवीं १८९४ सालीं हिंदु व मुसलमानांत तंटे व मारामाऱ्या झाल्या, ह्मणून तेथेंही जादा पोलीस ठेवण्यांत आलें, त्याप्रीत्यर्थ सात, आठ हजार रुपये त्या गांवच्या सर्व लोकांवर कर बसविला. तात्पर्य हिंदु व मुसलमानांतील तंटे सौम्य उपायांनीं बंद करण्याचा सरकारानें व सरकारी अधिकाऱ्यांनीं प्रयत्न न केल्यास ही तंट्याची आग लौकर न विझतां अधिकाधिक पसरत जाईल, ही मोठी भीति आहे. आणि तसें झालें असतां नेहमीं सरकारास व लोकांस बहुत त्रास होणार आहे. ही तंट्याची आग अशीच धुमसत राहिली तर हिंदु व मुसलमानांमध्यें अधिकच वैर वाढून भलत्याच वेळेस आकसानें ते बेफाम होऊन मारपीट करतील. तेव्हां पोलिसाकडून धरपकड सुरू होऊन उभयपक्षांकडील लोक न्यायाच्या चरकांत गुंतून द्रव्यास व अब्रूस नागवले जातील, आणि मग 'मेलेल्या माणसास काठ्यांनीं धोपटण्याप्रमाणें' त्या गांवावर जादा पोलीस ठेवून त्याचा खर्च लोकांकडून सरकार चोपून वसूल करील. अशा रीतीनें रयत लोक नाडले गेले ह्मणजे अर्थातच ते सरकारच्या नांवानें मनांत चरफडतील, व शिव्याशापही देतील. याशिवाय एकंदर लोकांतील स्वस्थता कमी होऊन देशांतील शांतता नष्ट होऊं लागेल, हें इंग्रजी राज्याच्या स्थैर्यास व जरबेस हानिकारक आहे. सरकारानें हें सर्व ध्यानांत आणून वरील विनंतीप्रमाणें हिंदुमुसलमानांत होणारे तंटे मि-

टवून टाकण्याचा कांहीं तरी सौम्य उपाय लौकर योजावा अशी प्रार्थना आहे.

पर्जन्यकाळीं चार महिने मुंबईचे गव्हर्नरसाहेब व सेनापतिसाहेब पुण्यास असतात, त्याचप्रमाणें कौन्सिलदार, सेक्रेटरी, कमिशनर, कलेक्टर, त्यांचे असिस्टंट्, व पोलीस सुपरिंटेंडेंट इत्यादि सर्व अधिकारी पुण्यांत असतां लोकांमध्यें दंगे व्हावे हें फार आश्चर्यकारक आहे. पुण्यांत इतके अधिकारी व कायमची लष्करी मोठी छावणी बसलेली असून एकवेळच नव्हे, पण लागोपाठ तीन वेळ भरदिवसा पुणें शहरांत दंगे झाले, हें सरकारी अधिकाऱ्यांस लांछनास्पद नव्हे का? इंग्रज सरकारच्या राज्यांतील मोठाल्या अधिकाऱ्यांस राज्यकारभार चांगला करतां येत नाहीं, असें ह्मणण्याचें साहस न करितां, सामोपचारांनीं बोध करून युक्तीनें शांतता करण्याचें त्यांच्यामध्यें सामर्थ्य नाहीं किंवा इच्छा नाहीं असें ह्मणणें भाग पडतें. नागव्या तरवारीनें हवा त्याजवर पाहिजे तेव्हां वार करणें सोपें आहे, पण तसले रक्तस्रावांचे प्रसंग युक्तीनें टाळून अगदीं बंद करणें हें फार कठीण व खऱ्या शहाणपणाचें काम आहे. तें वेळेवर जो करील त्यालाच दयाळू, मुत्सदी, व जनहितकर्ता असें सर्व लोक ह्मणतात. यास्तव तसलें सुयश मिळविण्याचा सरकारानें व सरकारी अधिकाऱ्यांनीं प्रयत्न करावा, अशी विनयपूर्वक प्रार्थना आहे.

प्रजेमध्यें परस्परांत तंटे होऊन हातघाईवर मजल जाण्याचा रंग दिसल्यास तसें न होऊं देण्याचे उपाय करावे अशी राजनीति आहे. साम, दान, दंड आणि भेद असे प्रकार प्रसिद्धच आहेत. तंटे करण्यास जे दोन पक्ष उभे राहतात

त्यांच्या हातून ह्या उपायांची योजना होणें शक्य नाहीं. तसले सामोपचार परस्थांनीं केले तर दोन्ही पक्षांसही मान्य होतात. साधारण व्यवहारांत देखील सर्व ठिकाणीं असाच प्रकार घडत असतो. दोन व्यक्तींची बोलाचाली किंवा मारामारी जुंपली ह्मणजे तिसरा मनुष्य मध्यें पडून उभयतांस बोधाच्या गोष्टी समजून सांगतो, तेव्हां त्यांचा तंटा मिटून दोघेही शांत होतात. सरकारांत जे लोक फिर्यादी घेऊन जातात त्यांचा हेतु असा असतो कीं, दोन्ही पक्षांचें ह्मणणें तिसऱ्यानें ऐकून घेऊन उभयतांस निस्पृहतेनें न्यायाचा मार्ग दाखवावा, ह्या तत्वास अनुसरून सरकारानें व सरकारी अधिकाऱ्यांनीं दोन्ही पक्षांकडील शहाणे, समजूतदार, पोक्त व लोकमान्य अशा गृहस्थांच्या साह्यानें खवळलेल्या हिंदु व मुसलमान लोकांचें ह्मणणें काय आहे तें नीट समजून घ्यावें, आणि मग दोन्ही पक्षांकडील प्रमुखांच्या विचारानें कोणत्या लोकांनीं कसकसें वागावें ह्याबद्दल नियम ठरवावे. अशा प्रकारें सरकारी अधिकाऱ्यांसमक्ष दोन्ही पक्षांच्या समजुतीनें जे नियम ठरतील ते उभयपक्षांकडील प्रमुख लोकांच्या सह्यांनिशीं सरकारांत ठेवावे, आणि त्यांच्या प्रती सर्व ठिकाणच्या वर्तमानपत्रांतून छापून प्रसिद्ध कराव्या. आणि उभयपक्षांतील लोकांमध्यें फुकट वांटाव्या. अशा युक्तीच्या उपायानें हे तंटे लौकर बंद होतील अशी आशा आहे. ह्मणून आतां विलंब न लावितां सरकारानें कृपा करून एवढें पुण्य लौकर संपादावें अशी प्रार्थना आहे.

पुण्यांतले हिंदु व मुसलमान लोक शहाणे, राज्यकार्यधुरंधर, प्रसंगावधानी, स्वकार्यदक्ष, उद्योगी, राजनिष्ठ, लोकसुधारणा करण्याविषयीं उत्सुक, एका जुटीनें चालणारे, कस-

लाही बिकट प्रसंग आला तरी न घाबरतां योग्य कामांत धैर्यानें पुढें पाऊल टाकणारे व जातीनें द्रव्याची, अकलेची व श्रमांची घस सोसून परोपकार करणारे असे बहुगुणसंपन्न आहेत, अशी बहुत कालापासून कीर्ति गाजत आहे, ती आतां नुसती नामशेष होऊन राहिली आहे असें नाहीं. त्याबद्दल मागचे दाखले तर पुष्कळच दाखवितां येतील, पण आज तशा प्रकारच्या गुणांनीं अनेक कृति मूर्तिमंत चालल्या आहेत त्याचें प्रत्यक्षप्रमाण दाखवितों, ह्मणजे वाचणाऱ्यांची खात्री होईल. सन १८५७ सालीं उत्तरहिंदुस्थानांत शिपायांनीं केलेल्या बंडाची धामधूम माजली, तेव्हां पुणें शहराबद्दल बाहेरगांवच्या लोकांस फार भीति वाटत होती. पण पुण्याच्या राजनिष्ठ लोकांनीं आपल्या चित्ताची चंचळता न होऊं दिल्यामुळें कांहींएक गडबड झाली नाहीं. त्याचप्रमाणें त्या वेळीं लोकांच्या भाग्यानें पुण्यास जिल्ह्याचे जे सरकारी अधिकारी होते, तेही दयाळू, चतुर व मुत्सद्दी होते. डंकन डेव्हिडसनसाहेब पुण्याचे कलेक्टर व डिस्ट्रिक्ट माजिस्ट्रेट होते. त्याचप्रमाणें रा०ब० नाना मोरोजी हे हुजूर डेप्युटी माजिस्ट्रेट असून त्यांजकडे पुणें शहरचे फौजदारी खटले निकालास लावण्याचा अधिकार असे. ह्या दोन्ही सुज्ञ अधिकाऱ्यांनीं उगीच कोणाचा वहीम धरिला नाहीं. लुच्चे लोकांच्या मुठींत सांपडून आपले कान हलके होऊं दिले नाहींत. ह्मणून इतर जिल्ह्यांप्रमाणें 'साप साप ह्मणून उगीच्या उगीच जमीन धोपटली गेली' तसा प्रकार पुण्यांत बिलकुल घडला नाहीं. हलक्या कानाचे व छांदिष्ट किंवा खुनशी कामगार त्या वेळीं पुण्यांत असते तर मनास येईल त्या लहान मोठ्या लोकांस

एकदम धरून तोफेच्या तोंडीं देऊन उडवितां आलें असतें. पण त्या वेळच्या थोर अधिकाऱ्यांनीं रयत लोकांचा बिलकुल छळ केला नाहीं. ते कामगार मागेंच निघून गेले. पण त्यांची सुकीर्ति अद्याप जिवंत आहे. असो. पुण्यांतले हिंदु व मुसलमान लोक एकजुटीनें वागल्याचें एक ठळक उदाहरण आहे तें पहा. बडोद्याचे मल्हारराव गायकवाड यांजवर विषप्रयोग केल्याचा आरोप आल्यावरून त्यांस कैद केलें. आणि त्यांची कमिशनमार्फत चौकशी करण्याचें त्यावेळचे गव्हर्नर जनरल लार्ड नार्थ ब्रुक साहेब यांनीं ठरविलें. ही खबर ऐकतांच पुण्याच्या लोकांनीं फार त्वरा करून मोठी जाहीरसभा भरविली. त्या सभेचे अध्यक्ष नबाब अलिमर्दाखान साहेब होते. त्या सभेंत पुष्कळ भाषणें होऊन शेवटीं असें ठरलें कीं, मल्हाररावांची चौकशी नुसत्या युरोपियन लोकांपुढें न होतां त्या कमिशनांत मल्हाररावांच्या बरोबरीचे असे थोर थोर नेटिव गृहस्थ असावे. व त्या कमिशनांतील नेटिव आणि युरोपियन यांची संख्या समसमान असावी. शिवाय मल्हाररावसाहेब पुष्कळ वर्षें कारागृहांत असून तेथून जे सुटले ते राज्यावरच बसले यामुळें त्यांना राज्यकारभार करण्याचें शिक्षण अगदींच मिळालें नाहीं. ह्मणून सरकारानें त्यांजवर मेहरनजर ठेवावी. अशा प्रकारचे सभेंत ठराव होऊन तशा मजकुराचा एक मोठा अर्ज तयार केला होता, त्याजवर अध्यक्ष या नात्यानें नबाबसाहेबांची सही घेऊन तो अर्ज हिंदुस्थानसरकाराकडे लागलीच रवाना करण्यांत आला. त्याचा योग्य विचार होऊन सभेच्या सूचनेप्रमाणें सर्व व्यवस्था करण्यांत आली. कमिशनामध्यें एकंदर ६ गृहस्थांच्या

नेमणुका झाल्या, त्यांपैकीं तीन मोठ्या हुद्याचे, पोक्त असे युरोपियन होते, व ३ श्रेष्ठ असे नेटिव गृहस्थ होते, त्यांचीं नांवें–जयाजीराव शिंदे अलिजाबहादर, जयपूर संस्थानचे महाराज, व राजा सर दिनकरराव राजवाडे. याप्रमाणें एकंदर सहा असामींचें कमिशन बसून चौकशी झाली. यावरून प्रसंगीं पुण्यांतील हिंदु आणि मुसलमान एकमतानें वागून देशहिताचीं कामें करितात, असें दिसून येईल.

दक्षिणेंतील लोकांमध्यें ऐक्यभाव वाढून लोकहिताचीं कामें यथाकालीं करतां यावीं याच उद्देशानें 'पुणें सार्वजनिक सभा' स्थापन करण्यांत आली आहे. तिचे सर्व सभासद लोकांनीं निवडून दिलेले आहेत. त्यांत हिंदु, मुसलमान, पारशी, यहुदी व युरोपियन इत्यादि सर्व जातींचे अनेक धंद्यांचे व निरनिराळया धर्मांचे असे लोक आहेत. त्या सभेच्या द्वारें अनेक चांगलीं कामें होतात.

मुंबईसरकारांत किंवा हिंदुस्थानसरकारांत नवे कायदेकानू अगर ठराव होऊं लागले ह्मणजे त्याबद्दल कायद्याचे मसुदे सरकारी ग्याझिटांत छापून प्रसिद्ध झाले ह्मणजे सभा त्यांचें बारीक रीतीनें परिक्षण करिते, आणि त्यांत जे दोष दिसतील ते काढून टाकण्याबद्दल सरकारास विनंती करते. त्यायोगानें लोकांचें ह्मणणें काय आहे, व त्यांस कायकाय अडचणी येण्याचा संभव आहे तें लोकांस व सरकारास स्पष्ट कळूं लागतें. ह्या पुणें सार्वजनिक सभेपासून लोकांस व सरकारास नेहमीं हा [illegible] लाभ होत असतो. अशा रीतीनें सरकारास मदत करण्याचा क्रम सभेच्या हातून नेहमीं चालू राहिला आहे. ही सभा केवळ राजकीय संबंधाच्याच विषयाची चर्चा

करून स्वस्थ बसते असें नाहीं. प्रसंगोपात्त लोकांवर खासगी रीतीचीं संकटें येऊन ते अडचणींत पडले तर तीं निवारण करण्याचा ही सभा यथाशक्ति प्रयत्न करते. सन १८७२ सालीं खानदेशांत अतिशय पर्जन्यवृष्टि होऊन गिरणा नदीस मोठा पूर आला. त्या योगानें नदीकिनाऱ्याचे बहुत गांव व जमिनी वगैरे वाहून गेल्यामुळें खानदेशांतील लोकांचें अतिशय नुकसान होऊन ते महत्संकटांत पडले. हें ऐकतांच पुणें सार्वजनिक सभेनें मोठी जाहीरसभा भरवून त्या लोकांच्या साह्यार्थ वर्गणी जमविण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यास बरेंच यश येऊन एकंदर चार पांच हजार रुपये जमा झाले. ते खानदेशच्या कलेक्टर साहेबांच्या मार्फत शेतकरी लोकांस देण्यांत आले.

दक्षिणेंतील कांहीं जिल्ह्यांत मारवाडी वगैरे सावकार लोकांच्या कर्जामुळें शेतकरी लोक फार नाडले गेले, सबब त्यांच्या बचावाचा कांहीं तरी उपाय योजावा, ह्मणून पुणें सार्वजनिक सभेचे मूळ उत्पादक, कैलासवासी रावबहादुर सदाशिव बल्लाळ गोवंड्ये व गणेश वासुदेव जोशी, ( सार्वजनिक काका ) हे मुद्दाम कलकत्त्यास जाऊन आनरेबल होप साहेब त्या वेळीं हिंदुस्थानसरकारचे एक कौन्सिलदार होते, त्यांस भेटले. आणि दक्षिणेंतील गरीब शेतकऱ्यांची विपन्न स्थिति त्यांस कळविली, त्यावरून सन १८७९ सालीं शेतकऱ्यांचे संबंधाचा निराळा कायदा होऊन तो पुणें, सातारा, अहमदनगर, व सोलापूर ह्या चार जिल्ह्यांस लागू केला. काकांच्याच प्रयत्नानें पुण्यास व इतर ठिकाणीं लवादकोर्टें स्थापन झालीं, तें काम पुण्यांत उत्तम

प्रकारें चाललें आहे. स्थानिक स्वराज्याबद्दल लोकांस जास्त अधिकार देऊन लोकलफंड व मुनिसिपालिव्यांचे सभासद निवडण्याचा अधिकार लोकांस देण्याचें लार्ड रिपनसाहेब गव्हर्नर जनरल यांनीं मनांत आणून तारीख १८ मे सन १८८२ रोजीं एक ठराव इंडियाच्या सरकारी ग्याझिटांत प्रसिद्ध केला. ती गोष्ट इलाख्यांच्या सरकारांस मान्य होईना, ह्मणून पुणें सार्वजनिक सभेनें आपल्या पदरचे हजारों रुपये खर्चून मुंबई इलाख्यांतील कर्नाटक, गुजराथ व महाराष्ट्र ह्या तिन्ही भागांतील १८ जिल्ह्यांत आपले एजंट पाठविले. आणि हा नवीन हातीं येणारा अधिकार लोकांच्या हातांत कायम राहण्याकरितां काय केलें पाहिजे, व कशा रीतीनें हुशारी धरून वागलें पाहिजे, हें तेथल्या लोकांस समजून देण्याकरितां मोठाल्या शहरीं व तालुक्याच्या व मुनिसिपालिव्यांच्यां गांवीं पुष्कळ लोकांची सभा भरवून सभेच्या एजंटांनीं सविस्तर माहितीनें भरलेलीं अशीं भाषणें केलीं. त्या योगानें लोकांस हा विषय बराच समजूं लागला, व नवीन व्यवस्थेच्या संबंधानें १८८४ सालीं जे कायदे झाले, त्यांची अमलबजावणी होतांना सभेच्या उद्योगाचा लोकांस फार उपयोग झाला. ह्या वाटाघाटीचा सर्व योग कै० सिताराम हरि चिपळूणकर त्या वेळचे पुणें सार्वजनिक सभेचे सेक्रेटरी ह्यांनीं जमवून आणिला. चिपळूणकर हे मोठे शहाणे व मुत्सदी होते. त्यांनीं त्या वेळीं मुंबईचे गव्हर्नर सर जेम्स फर्गुसनसाहेब व त्यानंतर लार्ड रेसाहेब, कौन्सिलदार पील साहेब, व सेक्रेटरी न्यूजंटसाहेब इत्यादि थोरथोर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा स्नेह संपादन केल्यामुळें त्यांच्या अनेक वेळ

गांठी भेटी होऊन खासगी पत्रव्यवहारही सुरू झाला. त्या योगानें रयतेच्या किंवा इतर सार्वजनिक कामाच्या संबंधाचे ठराव अगर कायदे करण्याच्या वेळीं चिपळूणकरांस कळवून त्यांची ते सल्ला मसलत घेत असत. यामुळें कित्येक मोठ्या महत्वाचीं कामें देखील तोंडातोंडी बोलून तीं उलगडून घेण्याची संधि सांपडत असे. इतर मुनिसिपालिट्यांपेक्षां पुण्याच्या मुनिसिपालिटींत जास्त कमिशनर निवडण्याचा व अध्यक्ष निवडण्याचा पुण्याच्या लोकांस जो अधिकार मिळाला तो तरी सितारामपंतांच्याच प्रयत्नानें मिळाला. सितारामपंत चिपळूणकर व गणेश वासुदेव जोशी हे ह्या वेळेस जिवंत असते तर सरकारी अधिकाऱ्यांच्या व दोन्ही पक्षांतल्या प्रमुख लोकांच्या सहाय्यानें प्रयत्न करून हिंदु व मुसलमान लोकांमधील तंटे मिटवून दोघांची एकी यापूर्वींच होऊन गेली असती. असो.

पुण्याच्या लोकांस स्वतंत्रतेची व विद्येची फार गोडी असल्यामुळें न्यू इंग्लिश स्कूल, नेटिव इन्स्टिट्यूशन, पुना सिटिस्कूल, नूतन मराठी विद्यालय, फीमेल हायस्कूल, व फर्ग्यूसन्‌कॉलेज, त्याचप्रमाणें न्यू इंग्लिश स्कुलास जोडलेलें सर्व सोईनीं परिपूर्ण असें बोर्डिंग इत्यादि विद्याप्रसाराच्या संस्था व सोई स्वतंत्रपणें नेटिवांनीं स्थापन केल्या असून त्यांचीं कामें सुयंत्रपणें उत्कृष्ठ चाललीं आहेत. यांपैकीं कित्येक संस्थांची स्थापना करणारे कै० विष्णुशास्त्री चिपळूणकर व प्रिन्सिपाल वामन शिवराम आपटे हे अकालीं मरण पावले तरी त्यांच्या बरोबरीची दुसरी मंडळी हयात आहे. त्यांनीं स्वतःच्या फायद्याकडे दृष्टी न देतां केवळ जनहितार्थ हें विद्यादानाचें अत्यंत भूषणास्पद काम मोठ्या मेहनतीनें ख-

पून उत्तम प्रकारें चालविलें आहे. मुंबई इलाख्यांतील सर्व विद्यालयांत न्यू इंग्लिश स्कूल व फर्ग्यूसन कॉलेज ह्या संस्था पहिल्या प्रतीच्या गणिल्या जात आहेत. हें कॉलेज स्थापन होऊं लागलें तेव्हां नेटिवांस कसें चालवितां येईल याबद्दल कै० तेलंगांसारख्या थोर थोर गृहस्थांस देखील फार भीति व काळजी वाटत होती. पण आमच्या आपटे, आगरकर व गोळे इ० सर्व मंडळींनीं अत्यंत परिश्रम करून ह्या संस्था उदयास आणिल्या. आणि नेटिव लोकांमध्यें किती कर्तबगारी व स्वातंत्र्याभिमान आहे, तें कृतीनें मूर्तिमंत सिद्ध करून दाखविलें. याबद्दल त्यांची स्तुति करावी तितकी शोभण्याजोगी आहे. दीर्घोद्योगी पुणेंकरांनीं कागद करण्याची गिरणी, रेशमाची व सुताची गिरणी, सुया व टांचण्या वगैरे करण्याचा कारखाना, पितळी पत्र्यांच्या वाट्या, तबकें व ताटें इत्यादि पात्रें तयार करण्याचा कारखाना, हीं कामें सुरू करून तीं उत्तम प्रकारें चालविलीं आहेत. आलीकडे डेक्कन बँक व मरकंटाईल बँक ह्यांची स्थापना झाली असून त्यांचींही कामें चांगलीं चाललीं आहेत. टौनहॉल, सार्वजनिक सभागृह ( जोशीहॉल ), पुणें नेटिव लायब्ररी, फर्ग्यूसन कॉलेज, व फीमेल हायस्कूल ह्या इमारती त्या त्या संस्थांच्या स्वतंत्र झाल्या असून त्यांस आतां चांगली बळकटी आली आहे, असें ह्मणण्यास फारशी भीति राहिली नाहीं. पुण्यामध्यें छापखाने पुष्कळ वाढले असून तेथें निघणाऱ्या वर्तमानपत्रांपैकीं कांहीं पत्रें विद्वान व शहाण्या लोकांच्या हातून चालत असल्यामुळें त्यांतील लेख मार्मिक असतात. पुण्याच्या लोकांची भाषा शुद्ध, सर्व कामांत स्वच्छता, टिपेनें

काम करण्याचें वळण, व्यवहारांत सभ्यपणानें व नोकीझोंकीनें वागण्याची ढब, पुण्याचे लोक स्वभावतः धीट, प्रसन्नमुख, चतुर, समयसूचक व कर्तृत्वानें आपलें तेज दुसऱ्यावर पाडणारे असे आहेत. असल्या गुणिजन सूज्ञ हिंदु व मुसलमानांची जेथें मोठी वस्ती आहे, अशा सुखवस्तु लोकांच्या वस्तीवर कोणातरी दुष्टाची दृष्ट पडली असावी, ह्मणूनच हिंदु व मुसलमानांत तंटे सुरू झाले यांत संशय नाहीं. कोणी करील तर याला उपाय अगदीं सोपा आहे. पहा सुस्वरूप, गोऱ्यागोमट्या व गुण दाखविणाऱ्या अशा मुलांस दृष्ट फार लौकर बाधते तेव्हां त्यांच्या माता मोठ्या भक्तीनें अशा दृष्टावलेल्या मुलांवरून मीठ, मोहऱ्या व मिरच्या ओंवाळून काढून त्यांचा चुलींतल्या अग्नीवर होम देतात, ह्मणजे दृष्ट उतरते. कधीं कधीं रस्त्यांत चालतांना मुलांस दृष्ट लागल्याचा आयांस भास होतो. तेव्हां आपल्याच तळपायाची माती बोटानें घेऊन ती मुलाचे कपाळास लावितात. त्याचप्रमाणें कपाळावर काजळाची तीट, व डाव्या गालावर काजळाचें गालबोटही लावितात. तेणेंकरून मुलांवर दुष्ट लोकांची नजर फिरली तरी दृष्टीची बाधा होत नाहीं. ह्याच समजुतीनें नवरदेवाच्या डोळ्यांस काजळ व काजळाचीं गालबोटें लावण्याची चाल आपणांत सर्वत्र ठिकाणीं चालू आहे. एखाद्या मातेस दया येऊन पुत्रवात्सल्यानें पुण्याच्या लोकांची कोणी लौकर दृष्ट काढील तर हटकून गुण येईल असा भरंवसा आहे. काम अगदीं सोपें आहे. पण तें मनांत विकल्प न आणतां खऱ्या भक्तिभावानें केलें पाहिजे, तरच गुण खास येईल. हा वरोपचाराचा तोडगा आहे, योग्यवाटल्यास एखा-

ह्या माउलीनें तो करून पहावा. ह्यापासून दोष वाढण्याची भीति नाहीं. फुलाबोलास गांठ पडून सुदैवानें आला तर गुणच येईल.

पुण्यांत हिंदु व मुसलमानांमध्यें तंटे होण्याचा संभव नसतां ते सुरू झाले, ह्यांत परमेश्वराचा संकेत कांहीं तरी वेगळा असावा असें दिसतें. कारण प्रसंग पडल्यास स्वार्थाचा त्याग करून परहितासाठीं उड्या घालणारे जे लोक ते आपसांत तंटे व मारामाऱ्या करण्याच्या फंदांत कधीं पडावयाचे नसतां, त्यांस अशी दुर्बुद्धि झाली, ह्यावरून असा तर्क होतो कीं, असलीं कृत्यें करणाऱ्यांस काय काय यातना भोगाव्या लागतात व त्यांचें कोणकोणत्या प्रकारानें किती नुकसान होतें ह्याचा स्वतः अनुभव घेऊन पहावा, आणि मग असले प्रकार पुण्यांत न होण्याविषयीं चांगला बंदोबस्त करून नंतर असले दंगे बाहेरगांवीं जेथें जेथें झाले असतील तेथें मुद्दाम कांहीं मुसलमान व हिंदु गृहस्थांनीं जाऊन तेथल्या लोकांस समजून सांगून पुनः असले तंटे व मारामाऱ्या न करण्याविषयीं त्यांस पुणेंकरांकडून बोध करवावा, असा ईश्वरी संकेत दिसतो. "पाण्यामध्यें मासा झोंप घेतो कैसा, जावें त्याच्या वंशा तेव्हां कळें" ह्या वचनाप्रमाणें आमच्या सूज्ञ पुणेंकर बंधूंनीं असल्या आपसांतील तंट्याचा स्वतः अनुभव घेऊन आपली खात्री करून घेतली आहे. तीच गोष्ट खरी असेल तर यापुढें पुण्यांतील तंटे अगदीं बंद पडतील, आणि हिंदु व मुसलमान बांधवांचें पुनः पुर्ववत् सख्य बनून येईल.

पुण्यास हिंदु व मुसलमानांचा व्यवहारामध्यें परस्परांचा संबंध फार निकट असल्यामुळें त्यांचें हिताहित एकमेकांवर

अवलंबून आहे. रेशमाचीं व जरतारीचीं वस्त्रें विणण्याचें काम पुण्यांत फार चालतें. तीं वस्त्रें विणण्याचें काम मुसलमान जातीचे मोमीन लोक करितात. आणि तीं त्यांजकडून खरेदी करून गिऱ्हाइकांस विकण्याचें काम कापडगंजांतले मारवाडी व बुधवार पेंठेंतले शिंपी वगैरे करितात. हीं बहुमोल वस्त्रें दरसाल लक्षावधि रुपयांचीं पुण्यांत मुसलमानांचे हातून तयार होत आहेत, आणि हिंदूंचे हातानें खपत आहेत. हिंदु व मुसलमानांचें लौकर सख्य न झाल्यास मुसलमान मोमीन लोकांचा हिंदु लोक संबंध तोडतील. त्या योगानें मोमीन लोकांचा धंदा बसेल. त्याचप्रमाणें पितळेचीं भांडीं ओतणारे व घडणारे मुसलमान कारागीर बरेच आहेत. त्यांचा माल मारवाडी व कांसार लोक घेतात, त्या गरीबांच्या उद्योगासही खो बसेल. पुण्यांत मुसलमान जातीचे बोहरी पुष्कळ असून ते प्रतिष्ठित व शांत वृत्तीचे व्यापारी आहेत, ह्मणून ते तंटे करण्याच्या फंदांत कधीं पडावयाचे नाहींत, पण मुसलमानांत व हिंदूंत पडलेला लढा लौकर न उलगडल्यास बोहऱ्यांच्याही धंद्यास मांद्य येईल. बुधवारच्या वाड्यासारखी मोठी इमारत उभी करण्यास लक्षावधि रुपये खर्च लागून शेंकडों माणसें अनेक वर्षें खपावीं लागलीं. तेव्हां ती उभारून रंगारूपास आली, पण दिवेसलईच्या एका काडीनें तारीख १३ मे सन १८७९ रोजीं तिची ३।४ तासांत राखरांगोळी करून टाकली. तात्पर्य वाईट करण्यास उशीर लागत नाहीं, पण चांगलें करण्यास फार काळ व बहुत श्रम करावे लागतात. कोणा दुष्टानें पुण्यांत प्रथम ही कलहाची आग पेटविली, तिचा ताप हिंदु व मुसलमानांस आणखी किती दिवस भोगावा

लागेल हें कळत नाहीं. एकानें केलेल्या दुष्कृत्यांचीं फळें जातीच्या सगळ्या लोकांस फार दिवस भोगावीं लागतात, ह्मणून असल्या आडमार्गांत सहसा कोणीही शिरूं नये हेंच उत्तम होय.

पुण्यांत हिंदु व मुसलमानांचे तंटे सुरू होऊन सहा महिने झाले. इतक्या कालांत तीनवेळ कटकटी झाल्या त्याबद्दल तंटेखोरांस थोडें फार प्रायश्चित्त मिळालें आहे. त्यामुळें दोन्ही पक्षांत पहिला जोराचा आवेश होता तो मुरून आतां बराच मऊपणा आला असावा. कारण एकदां आंगावरून जोरानें इंगा फिरला ह्मणजे सर्पासारखे दीर्घ द्वेषी प्राणी देखील नरम होतात. मग मनुष्यासारखे शहाणे प्राणी नरम झाले तर आश्चर्य काय? रागाचा पहिला झटका निघून गेल्या कारणानें व पोलिसानें व न्यायाधिशांनीं दंगेखोरांची कणीक बरीच मऊ केल्यामुळें त्यांस आतां थोडीबहुत उपरतीही झाली असेल. अशा प्रसंगीं त्यांजला तिऱ्हाईत लोकांनीं सुबोध करून वाटेवर आणण्याचे प्रयोग केल्यास ते चांगले लागू पडतील अशी आशा आहे. सन १८७७-७८ सालीं तुर्क व रशियन लोकांची लढाई जुंपून परस्परांकडील पुष्कळ सैन्याचा फन्ना उडूं लागला. हें मनुष्यघातक कृत्य पाहून बहुत लोकांस दया आली. सन १८७० च्या लढाईत जर्मनीनें फ्रान्साचा पराभव करून फ्रान्साकडील युरोपांतील राजकीय श्रेष्ठत्व जर्मनीच्या बादशहानें हिरावून आपलेकडे घेतलें. त्यावेळीं जर्मनीचे मुख्य प्रधान प्रिन्स बिस्मार्क होते. हे साहेब मोठे राजकारस्थानी व सगळ्या युरोपांत पहिल्या नंबरचे नांवाजलेले शहाणे होते. त्यांस इतर देशच्या कित्येक वकिलांनीं विनंती केली कीं, तुर्क व रशियन लोकांत

सुरू असलेल्या लढाईंत आपण मध्यस्ती करून ती लढाई मिटविण्याची कांहीं तरी लौकर तजवीज करावी. त्यावर त्या शहाण्या मुत्सद्यानें असें उत्तर दिलें कीं, ही लढाई नुकतीच सुरू होऊन दोन्ही पक्ष मोठ्या आवेशानें परस्परांशीं फार जोरानें लढताहेत. अशा वेळीं मध्यस्तीचा कांहीं उपयोग होणार नाहीं. यास्तव लढाई करतां करतां ते कांहीं कालानें थकून जेरीस आले ह्मणजे आपोआप नरम पडतील. तशा वेळीं त्यांजवर केलेल्या बोधाचा कांहीं उपयोग होईल, तशी वेळ येई तोंपर्यंत कोणी कांहीं न बोलतां स्वस्थ बसावें हेंच योग्य आहे. ह्या तत्वाचा आमचे पोक्त व अनुभवी पिढीजाद वैद्यलोक अनेक ठिकाणीं उपयोग करतात. एखाद्या मनुष्याची प्रकृति बिघडून त्यास मोठ्या जोरानें ज्वर येऊं लागला, तर चांगले वैद्य त्यांस तत्काळ औषध सुरू करीत नाहींत. ते असें सांगतात कीं, पहिल्या उमेदीच्या जोरांत ज्वर आहे तोंपर्यंत औषध दिलें तर तो त्याला न जुमानतां अधिक चवताळेल. ह्मणून कांहीं दिवस त्याला औषध न देतां आपोआप नरम पडूं द्यावा; तो नरम पडल्यावर दिलेल्या औषधानें रोग्यास लौकर गुण येईल. आमच्या घरांतील स्वयंपाक करणाऱ्या बायका देखील ह्या तत्वाचा उपयोग नित्य करीत असतात. पहा, भाकरीचें पीठ भिजविल्याबरोबर त्याच्या भाकरी थापीत नाहींत. कारण तशा कच्चेपणानें तें वठणीस न येतां त्याच्या भाकरी थापल्यास जागोजाग भेगा पडून भाकरी तडकते, ह्मणून आधणाच्या पाण्यानें पीठ भिजवितात. किंवा ओल्या पिठास अगोदर खूप जोरानें मळतात. अशा उपचारांनीं तें वठणीस येऊन नरम झालें ह्मणजे त्याच्या

भाकरी थापतांना फुटत नाहींत, व त्याची भाकरी रुचकरही लागते. गव्हांची कणीक जात्या चिकण आहे तरी तिला देखील अगोदर एकदोन तास भिजवून मुरवावी लागते. आणि मग तिला खूब जोरानें मळून तिंबवावी लागते. तेव्हां तिच्या रोट्या पाहिजेत तितक्या पातळ होऊन रुचकर लागतात. ह्या गोष्टी नित्य प्रचारांतील असल्यामुळें क्षुल्लक वाटतील, पण त्यांतील मुख्य तात्पर्य ध्यानांत धरण्याजोगें आहे. ह्या वरील तत्वाप्रमाणें पाहिलें तर हिंदु व मुसलमान लोकांचा पहिला जोराचा आवेश कमी झाल्यामुळें बरेच नरम होऊन ते आतां शुद्धीवरही आले असतील. यास्तव अशावेळीं त्यांजवर शांत होण्याचे उपचार कोणीं केले तर व्यर्थ न जातां पुष्कळ गुणाकारी होणार आहेत. ह्मणून आतां उपेक्षा न करितां व विलंब न लावतां हिंदु मुसलमानांचें भांडण मिटवून उभयपक्षांचें पूर्ववत् सख्य होईल अशा तजविजीचे उपाय सुरू करणें इष्ट आहे. पुण्यांतील हिंदु व मुसलमान लोक समजदार आहेत व त्या दोन्ही पक्षांत प्रतिष्ठित व पोक्त असे वजनदार लोकही बरेच आहेत, त्यांच्या विचारानें उभयपक्षांचा समेट करण्याचा घाट घातला असतां त्याचा अधिक उपयोग होईल.

पुण्याची सार्वजनिक सभा ही लोकांच्या कल्याणाकरितां स्थापन झालेली आहे. तिनें कोणत्याही जातीचा, उद्योगाचा व धर्माचा भेदाभेद न करितां सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या व उद्योगांच्या लोकांचा पुणें सार्वजनिक सभेंत समावेश केला आहे. कायदेकानूंच्या योगानें किंवा सरकारी नोकरांच्या हातून रयतेस कांहीं इजा होत असली तर ती दूर करण्याचा सभा उद्योग करिते इतकेंच नाहीं, तर सन १८७७–७८

सालीं दक्षिणेंत पडलेल्या दुष्काळाच्या प्रसंगीं ह्या सभेनें फार परिश्रम करून लोकांस मदत करण्याचें फार मोठें काम केलें आहे. यावरून ही सभा लोकांच्या अनेक प्रकारें कल्याणाच्या कामीं झटण्यास सिद्ध आहे, असें ठरतें. यास्तव आपसांतील भांडणानें प्रत्यक्ष पुण्यांतील लोकांस जी पीडा होऊन गैरसोय व हानि होत आहे, तिचेंही निवारण करण्याचे उपाय सभेनें मनापासून करावे, हें तिचें कर्तव्यच आहे. ह्मणून सभेच्या आरंभापासून अनुभवलेल्या, पोक्त व दयाळू सेक्रेटरीसाहेबांस, व अरमन रा. ब. अण्णासाहेब विष्णु मोरेश्वर भिडे यांस आणि नवीन विद्वान, ताज्या दमाचे, व सूज्ञ जाइंट सेक्रेटरीसाहेबांस हात जोडून विनंती आहे कीं, आपण पुणें शहरांतील अब्रूदार, लोकमान्य व शहाण्या अशा थोर व प्रमुख गृहस्थांची कमिटी नेमावी. तिजमध्यें आजवर पुण्यांत झालेल्या तंट्याशीं ज्यांचा बिलकुल संबंध नसून ज्यांना हिंदु मुसलमानांचे तंटे मिटावे आणि उभयपक्षांचें सख्य व्हावें अशी मनापासून इच्छा असेल अशा प्रकारचेच लोक त्या कमिटींत घ्यावे. त्यांत कांहीं पारशी, यहुदी व साधल्यास युरोपियन गृहस्थ असावे. शिवाय कांहीं गुजराथी, कापडगंजांतले मारवाडी, बुधवार पेंठेंतले कापडवाले शिंपी, भांडेआळींतले कांहीं कांसार, कांहीं मोमीन व कांहीं बोहरी इत्यादि मंडळी त्या कमिटींत योजावी. त्यांच्या बैठका बसतील त्यांत मुसलमानांपैकीं नवाब अलिमर्दाखान साहेब, व त्यांच्याचसारखे पोक्त पोक्त असे दुसरे कांहीं काजी व मौलवीही बोलवावे. जमल्यास व योग्य वाटल्यास पोलिस इनस्पेक्टर साहेबांसही निमंत्रण करावें. आणि तंट्याच्या प्रसंगीं रागाच्या तावांत होऊन गेलेल्या गोष्टीचा फारसा विचार व खल न

करितां परस्परांत तंटे होण्याचीं कारणें काय हीं प्रथम समजून घ्यावीं. आणि मग पुनः अशा कटकटी परस्परांत न होण्याकरितां काय उपाय योजावे, ह्याचा शांतपणें विचार करावा. ह्या चौकशीच्या व विचाराच्या वेळीं एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या कोणीं काढूं नये. सर्वांनीं शांतवृत्ति धारण करून कोणाचा पक्षपात न करतां केवळ न्यायबुद्धीनें हें कार्य करावें, ह्मणजे या कामांत सभेस खचित यश येईल. पुण्यांतल्या हिंदु मुसलमानांतले तंटे मिटविण्याविषयीं परिश्रम करून पुणें सार्वजनिक सभेनें तें यश संपादन केल्यास तिची सर्व लोकांत व सरकारांतही मोठी कीर्ति वाढेल. व तिजविषयीं सर्व लोकांमध्यें मोठी वाहवा होईल. व तिच्या कृतीविषयीं लोक जास्त प्रेम दाखवतील. यास्तव इतर कामें जरा बाजूस ठेवून सभेनें हें काम अगोदर अगत्यपूर्वक करावें अशी प्रार्थना आहे.

शेवटीं आमच्या हिंदु व मुसलमान बांधवांस हात जोडून अति विनयानें प्रार्थना करितों कीं, जेव्हां खरें शौर्य दाखवून पराक्रमानें आपलें रक्षण करण्याचा प्रसंग होता त्यावेळीं तुह्मी मेंढ्या बनलां, आणि आतां घरांत चुलीजवळ बसून बायकोस कोरडा दरारा व शौर्य दाखविण्याकरितां जसा पट्टा खेळावयाचा तशाप्रकारचीं कृत्यें आवेशानें करूं लागलां हें शहाणपण कुठलें? प्रसंग पाहून त्या काळास उचित असेल तसेंच माणसानें वर्तन केलें तर त्याला सुख होतें. आणि तसें न करितां अनुचित कर्म आचरण केल्यास त्याला दुःखाच्या व विपत्तीच्या डोहांत पडावें लागतें. हें न विसरतां पक्कें ध्यानांत धरा. आज तुमची धर्मावर श्रद्धा व भक्ति किती आहे, तुह्मी आपल्या धर्मशास्त्राप्रमाणें निष्ठापूर्वक किती वर्तन करितां, ह्याची साक्ष तुमचें मनच तुह्मांस

देईल. तुह्मी मोठे कर्मनिष्ठ, स्वधर्मपालक, व निःसीम भक्तिमान आहांत, हें दाखविण्याकरितां एकमेकांत भांडून मारामाऱ्याच करावयाला पाहिजेत असें नाहीं. तो प्रकार तुमच्या नेहमींच्या आचरणावरून लोक चांगला जाणत आहेत. याकरितां असला हा द्राविडी प्राणायाम करण्याचा प्रयास कोणीच करूं नये. हिंदूंस व मुसलमानांसही स्थाईक उत्पन्नें राहिलीं नसल्यामुळें दिनचर्येचा खर्च कसा भागवितां येईल, ह्या फिकिरींत आपण सर्व पडलों आहों. पोरेंबाळें भुकेनें व्याकुळ होऊन रडतांना पाहिलीं किंवा उपाशीं आहेत असें ऐकिलें ह्मणजे आपला जीव तिळतिळ तुटतो. अशा संकटाच्या वेळीं आपले उद्योगधंदे सोडून आपसांतील तंटे भांडत बसलों तर पुढें आपला व आपल्या कुटुंबांतील माणसांचा किती उन्हाळा होईल, ह्याचा स्वस्थ चित्तानें विचार करा, ह्मणजे कळून येईल. तुमच्यासारख्या शहाण्या लोकांस याहून अधिक सांगण्याची जरूर नाहीं. कारण तें सर्व तुह्मी जाणतच आहां. यास्तव आतां थंड व्हा, वृथाभिमान सोडा, कोणी तुमच्या हिताची गोष्ट सांगितली असतां तिचा अव्हेर न करितां स्वीकार करून त्याप्रमाणें वागण्याचा दृढनिश्चय करा. इंग्रज सरकार मोठें बलाढ्य असून फार शहाणें व चतुर आहे. यामुळें तुमची अक्कल किती, तुमच्यांत एकोपा किती, तुमच्यांत धाडस व शौर्य किती आणि तुमची शक्ति व एखाद्या कामाचा सतत पाठलाग करण्याचा दृढनिश्चय किती हें सर्व तें जाणून आहे. त्यांनीं आपल्या अकलेच्या जोरानें तुह्मांस मागेंच जिंकलें आहे, आणि आतां तर तुमच्या केंसा केंसाला गांठी देऊन तुह्मांस अगदीं जखडून टाकिलें आहे, तेणेंकरून

तुह्मी सध्यां किती पराधीन झालां आहांत हें मनांत आणा. वास्तविक अशी स्थिति प्राप्त झालेली. तुह्मी सर्व जाणत व अनुभवीत असतां हूडपणानें आपसांत लठ्ठालठ्ठी करून झोटिंगबादशाही माजवूं पहाल तर त्या योगानें सरकारचें कांहींच वांकडें न होतां तुमचा मात्र सत्यानाश होईल हें पक्कें ध्यानांत धरून ठेवा.

परमेश्वराच्या कृपेनें आज आपल्या देशांत इंग्रजी राजसत्तेच्या योगानें जिकडे तिकडे शांतता झाली आहे. हवा तो उद्योग करण्याची कोणास मनाई नसून त्याच्या अनुकूलतेच्या अनेक सोई वाढल्या आहेत. यामुळें आज उद्योगयुगच प्राप्त झालें आहे. अशा समजुतीनें वागून त्याचा अनेक प्रकारें कांहीं लोक चांगल्या रीतीनें उपयोग करून घेत आहेत. अशी सोन्यासारखी वेळ प्राप्त झाली असतां आपण भलत्याच छंदांत न पडतां योग्य उद्योगाच्या पाठीस लागावें हेंच नीट आहे. तुह्मी आपल्या आवडीप्रमाणें हवा तो धंदा केला तरी कोणाची मनाई नाहीं. शेतकी करणें असेल तर शिंदे व होळकरांच्या राज्यांत, रेवा संस्थानांत नागपूर इलाख्यांतील चांदा, बालेघाट, मंडला व सिवनी-छपारा इ० खालसा अमलांत, व छत्तिसगड डिव्हिजनांतील बस्तर, कांकेर, व कालाहंडी इ० सर्व संस्थानिकांच्या राज्यांत व जमीदार लोकांच्याही मुलखांत लक्षावधि एकर जमीन उत्तम पिकाऊ असतां लागण करण्यास माणसें नाहींत ह्मणून पडीत पडली आहे. तेथें साराही फार अल्प ह्मणजे दर एकरास चार आण्यांपासून तों पराकाष्ठा दीड रुपयापर्यंत पडत आहे. तिकडे जावें. क्रय—विक्रयाचा उद्योग व कारागिरी काम करणें असेल तर त्याच्याही सर्व

ठिकाणीं सोई झाल्या आहेत. तात्पर्य कोणताही उद्योग नेट धरून एकाग्रतेनें केला असतां त्यांत परमेश्वर यश देतो, आणि उडाणटप्पुपणा केल्यास समुद्रांत गेला तरी कोरडा ठणठणीतच राहतो. हें मुख्य तत्व ध्यानांत धरून सर्वांनीं आपआपल्या शक्तीप्रमाणें गोड वाटेल त्या उद्योगास लागावें. ह्मणजे संसाराचा गुजारा चांगला चालेल.

आतां आमच्या दयाळू इंग्रज सरकारास व त्याच्या लहान मोठ्या सर्व अधिकाऱ्यांस प्रार्थना आहे कीं, ईश्वरसत्तेनें आमच्या देशाचें राज्य तुमच्या हातीं आलें आहे, व प्रजापालन करून लोकांस सुखी ठेवण्याचेंही तुह्मी ब्रीद बाळगीत आहां. त्या अर्थीं विद्यार्थ्यांस धाकदरारा दाखविण्याकरितां शहाणा मास्तर आपल्या हातीं छडी घेतो, पण तिनें तो विद्यार्थ्यांस सहसा झोडपीत नाहीं. छडी मारून केलेला बोध विद्यार्थ्यांच्या कोंवळ्या मनांवर ठरत नाहीं. युक्तीनें गोंजारून ममतेनें केलेला बोध विद्यार्थ्यांच्या मनावर चांगला ठसून बसतो. शिवाय असल्या सौम्य उपचारांनीं विद्यार्थी न त्रासतां खुष राहतात. ह्मणून त्यांचा असल्या सूज्ञ मास्तरावर भरंवसा राहून प्रेम वाढतें. सरकारी अधिकाऱ्यांचे हातीं कायद्याची छडी दिली आहे, तिनें उठल्या बसल्या गरीब रयतेच्या पाठी फोडायच्या असा उद्देश नाहीं. तें आयुध फक्त धाक दाखविण्यापुरतेंच आहे असें समजायचें. सरकारी कामगारांनीं रयतेशीं जें वर्तन ठेवावयाचें तें शुद्ध ममतेचें—आपण आपल्या पुत्राशीं जें प्रेम ठेवितों त्याचप्रकारचें अकृत्रिम असलें पाहिजे. तरच अज्ञान व गरीब प्रजा संतुष्ट राहील. आणि ती सरकारी कामगारांशीं मोठ्या नेकीनें वागून त्यांच्या अर्ध्या वचनांत राहील. अशा प्रकारचे जे सरकारी कामगार रयतेशीं सरळपणा व उदारभाव दा-

खवितील त्यांनीं पाहिजे तें वाजवी का...
सुचविलें असतां, यत्किंचित् अनमान न का...
करतील. मुंबई इलाख्यांतील सर्व सरकारी कामदारा...
सुस्वभाव धारण करून रयतेशीं गोडीगुलाबीचें वर्तन सुरू
केल्यास त्यांचे हातून ह्या हिंदु व मुसलमानांच्या तंट्याचा
आपसांतल्या आपसांत लौकर समारोप होईल, इतकेंच नाहीं.
त्यांस दुसरीं कितीही बिकट कामें करण्याची सूचना केली
तरी हयगय न करितां ते राजीखुषीनें करतील यांत संशय
नाहीं. लार्ड रिपन साहेबांचे लोक किती आज्ञांकित झाले
होते, व ते स्वदेशीं परत गेले तेव्हां त्यांचा लोकांनीं केवढा
मोठा गौरव केला हें आमचे सूज्ञ सरकारी अधिकारी मनांत
आणून त्या धोरणानें वागतील तर रयत लोक आनंदांत रा-
हून सरकारी अधिकाऱ्यांचे दास बनतील. हें सर्व ध्यानांत
धरून योग्य वाटेल तसें करावें ही प्रार्थना आहे.

आतां अखेरीस आमच्या सूज्ञ हिंदु व मुसलम...
बांधवांस करद्वय जोडून प्रार्थना करतों कीं, इतका वे...
मीं आपणास जें काय सांगितलें, तें आपण जाणत ना...
ह्मणून सांगितलें असा अर्थ नाहीं. आपण मजपेक्षां सर्व
प्रकारें श्रेष्ठ व मला परम मान्य आहां, मी आपला अ-
त्यंत गरीब व अज्ञान किंकर असतां आपल्यांस इतकें
सुचविण्याचें धारिष्ट करण्याचें प्रयोजन एवढेंच कीं, हिंदु
अथवा मुसलमान यांतून एकाकडून जरी कांहीं कुरापत
उकरली जाऊन त्याची घासाघीस होतां होतां अखेरीस तं-
ट्यावर व मारापिटीवर मजल जाते, त्या वेळीं हिंदूंनीं मुसल-
मानांस मारलें, किंवा मुसलमानांनीं हिंदूंस बडविलें, तरी
तो गुन्हा मानला जाऊन आंत सरकारी अधिकाऱ्यांचा हात

ठिकाणीं सोई झाल[illegible] काय? लोकांत असा बखेडा माजला धरून एका[illegible]काम वाढतें, आणि त्यांची पोळी पिकते. मग आ[illegible]न मरोत, किंवा हिंदु फांशीं जावोत, त्याबद्दल आमच्या पोलिसास किंवा इतर सरकारी अधिकाऱ्यांस सुतक येत नाहींच, पण त्यांनीं आरोपींस पकडून त्यांजवर गुन्ह्याची शाबिदी करून दिली म्हणजे त्यांना शाबासकी मिळून त्यांची जास्त बढतीही होते. "दोघांचें भांडण तेथें तिसऱ्यास लाभ" म्हणतात तो हाच. ह्या तंट्याच्या पायीं तुमचीं डोकीं फुटतात, हातपाय मोडतात, तुम्हांस खेंच पकड करून पोलीस ओढून नेऊन अब्रू घेतात; आणि शेवटीं न्यायाधीश तुम्हांस द्रव्यदंडाच्या किंवा कैदेच्या शिक्षा देतात. इतके हाल व धिंडवडे सोसून तुम्ही मोकळे झालां तरी तुम्ही 'बदमाष' असा तुमच्या कपाळावर जो छाप बसतो, तो जन्मभर कायमच राहतो. माझ्या देशबांधवांची [illegible]की दुर्दशा होते हें पाहून मला अत्यंत दुःख वाटत आहे. [illegible] गोष्टीची मनांत चिंता उद्भवून ती नेहमीं जागत बसली [illegible]हे. त्यामुळें खाल्लेलें अन्न गोड लागत नाहीं. व पडून राहिलें तरी स्वस्थ झोंप येत नाहीं. हिंदु व मुसलमान बांधवांचे आपसांतले तंटे व त्यांचे दुःखकारक परिणाम हेच मनांत निरंतर घोळत आहेत. अशी माझी स्थिति झाल्यामुळें आपणांस अल्पबुद्धिनें विनंती करावी असें मनांत आल्यावरून हे दोन शब्द आपणापुढें ठेविले आहेत, तर ह्याचा नीट विचार करण्याची तुम्हांस परमेश्वर बुद्धि देवो, अशी त्याची प्रार्थना करून व ह्या लेखांत अज्ञानानें कोठें कांहीं प्रमाद झाला असल्यास त्याची क्षमा करण्याबद्दल सर्वांस विनंती करून आपली रजा घेतों.

---

C
226